इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – ११ ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

मंगळवार, ता. १२ मे २०२६ | वैशाख कृष्ण १० | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

## शेअर बाजारात मोठी घसरण

नवी दिल्ली,ता.११–

पश्चिम आशियातील वाढता तणाव, प्रस्तावित शांतता चर्चेचे पुन्हा एकदा पुढे ढकलले जाणे, कच्च्या तेलाच्या दरातील उसळी आणि जागतिक बाजारातून मिळालेल्या कमकुवत संकेतांमुळे सोमवारी देशांतर्गत शेअर बाजारात मोठी घसरण झाली.

दिवसभरातील प्रचंड विक्रीमुळे बाजारासाठी हा दिवस 'ब्लॅक मंडे' ठरला. दिवसभराच्या व्यवहारानंतर, सेन्सेक्स १.७० टक्क्यांच्या घसरणीसह आणि निफ्टी १.४९ टक्क्यांच्या घसरणीसह बंद झाला. परिणामी गुंतवणूकदारांचे सुमारे ५.६८ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले. दिवसाच्या व्यवहारात सेन्सेक्स तब्बल १,३७० अंकांनी घसरून खाली आला. अखेरीस तो १,३१२.९१ अंकांच्या घसरणीसह बंद झाला.

## ट्रम्प उद्या चीन दौऱ्यावर

वॉशिंग्टन,ता.११–



सुमारे नऊ वर्षांनंतर एखादा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष चीनच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी घोषणा केली की अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प १३ ते १५ मे दरम्यान चीनच्या दौऱ्यावर असतील. हा दौरा चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून होत आहे.

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष, होर्मुझ सामुद्रधुनीवरील वाढते संकट आणि (पान २ वर)

## पाकमध्ये व्हॅन दरीत कोसळून अकरा ठार

इस्लामाबाद,ता.११–

पाकिस्तानातील खैबर पख्तूनख्वा प्रांतातील स्वात जिल्ह्यातील लोकप्रिय पर्यटनस्थळ मलम जब्बाकडे जाणाऱ्या मार्गावर एक व्हॅन खोल दरीत कोसळून भीषण अपघात घडला आहे. या अपघातात ११ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत.

बचाव पथकाच्या माहितीनुसार, मृतांमध्ये अनेक महिला आणि लहान मुलांचाही समावेश आहे. मृतांमध्ये वर माईचाही समावेश असल्याचे सांगण्यात आले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्वजण एका लग्न समारंभासाठी जात होते. वाहन अचानक नियंत्रणाबाहेर गेले आणि (पान २ वर)

## दोन लाखाचा ऐवज लंपास

बुबनाळ,ता.११(वार्ताहर)–

शेडशाळ (ता.शिरोळ) येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत सुमारे २ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी कुरुंदवाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक गुंडप्पा मानकापुरे यांनी फिर्याद दिली आहे.

९ ते १० मे रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या दरम्यान चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाज्याची कडी-कोयंडा उचकटून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील तिजोरी फोडून चार सोन्याच्या पाटल्या, एकूण ५० ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५१२०० रु. | २५८५०० रु. |

अंडी ५७५ रुपये शेकडा

### हास्यतुषार –सुरेंद्र दास



तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांनी घेतलेला २०० युनिट वीज मोफत निर्णय , असा निर्णय आपल्याही राज्यात घ्या म्हणाव...!





सोमनाथ मंदिर पुनर्बांधणीनंतर लोकार्पणाच्या अमृत महोत्सव सोहळ्याप्रसंगी अभिषेक करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी तर दुसऱ्या छायाचित्रात कळसावर जलाभिषेक करण्यात आला यावेळी वंदन करताना घेतलेले छायाचित्र.

# 'सोमनाथ' अमृत महोत्सव देशासाठी मार्गदर्शक

### – पंतप्रधान मोदी

गांधीनगर,ता.११–

सोमनाथ अमृत महोत्सव केवळ स्मरणरंजनापुरता मर्यादित नाही. 'हा केवळ भूतकाळाचा उत्सव नाही, तर पुढील एक हजार वर्षांसाठी भारताची प्रेरणा आहे.' असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.गुजरातच्या सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीनंतर झालेल्या लोकार्पणाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित सोमनाथ अमृत महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी सहभागी झाले होते.

सोमनाथ मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेच्या ७५ व्या वर्षानिमित्त, या मंदिर परिसरात आयोजित सभेला त्यांनी संबोधित केले. हा केवळ, एक समारंभ नाही, त्यापेक्षा कितीतरी जास्त आहे, भारताचे अविनाशी चैतन्य आणि सांस्कृतिक चिवटपणा, याची ही एक घोषणा आहे. या क्षणांचे साक्षीदार ठरलेल्या सगळ्या भाविकांनी, राष्ट्राच्या स्वाभिमानाशी गुंफलेल्या, आध्यात्मिक अनुभूतीचा अनुभव इथे घेतला आहे, वैदिक मंत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सागरी लाटांची गर्जना, या पवित्र स्थळाचा पुनर्स्थापनेचा उत्सव साजरा होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

भारताच्या प्राचीन शास्त्रातील आध्यात्मिक ज्ञानाचा दाखला देत, पंतप्रधान म्हणाले, 'ही संपूर्ण सृष्टी परमेश्वरापासून निर्माण होते आणि अखेरीस त्याच्यामध्ये विलीन होते. आज आपण त्याच परमेश्वराच्या धामाच्या पुनर्निर्माणाचा (पान २ वर)

इराणचा युद्धविराम प्रस्ताव फेटाळला

# अमेरिका–इराणमध्ये पुन्हा तणाव वाढला

वॉशिंग्टन,ता.११–

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. युद्धविरामासंदर्भात इराणने अमेरिकेच्या नव्या प्रस्तावाला पाकिस्तानमार्फत उत्तर पाठवले आहे. मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा प्रस्ताव तत्काळ फेटाळून लावत तो 'पूर्णपणे अस्वीकार्य' असल्याचे म्हटले. तथापि, प्रस्तावातील कोणत्या बाबींवर अमेरिकेची आक्षेपार्ह भूमिका आहे, हे त्यांनी स्पष्ट केले नाही.



इराणने म्हटले आहे की, त्यांना केवळ तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी युद्धविराम हवा आहे. संघर्ष फक्त इराणपुरता मर्यादित न राहता लेबनॉनसह संपूर्ण प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हावी, अशी तेहरानची मागणी आहे. तसेच समुद्री व्यापार आणि तेलपुरवठ्याच्या मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करण्याचीही इराणची भूमिका आहे. अमेरिकेच्या प्रस्तावात युद्ध समाप्त करणे, रणनीतिकदृष्ट्या महत्त्वाच्या होर्मुज सामुद्रधुनीला पुन्हा सुरू करणे आणि इराणच्या अणुकार्यक्रमावर मर्यादा आणण्याच्या अटींचा समावेश होता. दरम्यान, ट्रम्प यांनी सोशल मीडियावर इराणवर टीका करताना म्हटले की, 'तेहरान गेली ४७ वर्षे अमेरिकेसोबत खेळ करत आहे, पण आता ते सहन केले जाणार नाही.' संयुक्त राष्ट्रांतील अमेरिकेचे राजदूत माइक वॉल्ट्झ यांनी सांगितले की, अमेरिका पुन्हा युद्ध सुरू करण्यापूर्वी राजनैतिक प्रयत्नांना पूर्ण संधी देऊ इच्छिते. दुसरीकडे, इराणचे नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांनी युद्धाच्या पार्श्वभूमीवर लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. सरकारी माध्यमांनुसार त्यांनी शत्रूंविरोधात 'कठोर आणि निर्णायक कारवाई' सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

# वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या–मोदी

नवी दिल्ली,ता.११–

परकीय चलन वाचवण्यासाठी आणि देशाला संकटातून बाहेर पडण्यासाठी जनसहभागाची गरज आहे. जिथे शक्य असेल तिथे मेट्रो, इलेक्ट्रिक बस आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा असा सल्ला देत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सलग दुसऱ्या दिवशी लोकांना इंधन आणि संसाधनांचा कमी वापर करण्याचे आवाहन केले.

> परकीय चलन वाचवण्यासाठी देशवासियांना आवाहन

वडोदरा येथे मोदी म्हणाले की, ज्याप्रमाणे देशाने एकत्र येऊन कोरोना संकटाचा सामना केला होता, त्याचप्रमाणे सध्याच्या संकटातूनही देश बाहेर पडेल. ते म्हणाले सोन्याच्या आयातीवरही देशाचा खूप मोठा पैसा (पान २ वर)

# अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करण्याची महाराष्ट्राची क्षमता

### मुख्यमंत्री फडणवीस : सीआयआयच्या परिषदेत महाराष्ट्राच्या प्रगतीचे सादरीकरण

नवी दिल्ली,ता.११(प्रतिनिधी)–

पायाभूत सुविधा, नाविण्यपूर्णता, प्रतिभा, स्वच्छ ऊर्जा, सुव्यवस्थित शहरीकरण, तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवरून भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार आहे. या सर्व शक्तींचा सहयोग साधणाऱ्या अर्थव्यवस्था भविष्याचे नेतृत्व करणार असल्याने ही क्षमता असणारा महाराष्ट्र त्यादृष्टीने आवश्यक इकोसिस्टीम उभारत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढील युगासाठी महाराष्ट्र सज्ज असून त्यासाठी सर्व आघाड्यांवर जाणीवेने



प्रयत्न सुरु असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

संतुलित प्रादेशिक विकास हा केवळ सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर तो आर्थिकदृष्ट्याही अत्यंत शहाणपणाचा आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

नवी दिल्लीत कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीतर्फे (सीआयआय) आजपासून आयोजित ॲन्युअल बिझनेस समिट – २०२६ या दोन दिवसीय परिषदेअंतर्गत सकाळच्या सत्रात झालेल्या परिसंवादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीचे डायरेक्टर जनरल चंद्रदीप बॅनर्जी आणि अध्यक्ष राजीव मेमाणी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. इतिहासात असे काही क्षण येतात जेव्हा देश बदलामध्ये सहभागी (पान २ वर)



## नेपाळमध्ये लँडिंग दरम्यान विमानाच्या टायरला आग

### मोठी दुर्घटना टळली

काठमांडू,ता.११ –

नेपाळची राजधानी काठमांडू येथे मोठी विमान दुर्घटना टळली. त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरत असताना एका आंतरराष्ट्रीय विमानावर मोठे संकट ओढवले होते. मात्र विमानतळ प्रशासन आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या (पान २ वर)

# सहा दुकाने फोडून लाखोंची चोरी

शिराळा,ता.११(प्रतिनिधी)–

शिराळा शहरातील बायपास रोडवरील कापरी नाका परिसरात चोरट्यांनी रविवारी मध्यरात्री धुमाकूळ घालत सहा दुकाने फोडून सुमारे एक लाख रुपयांहून अधिक रोकड लंपास केली. या घटनेतील एक संशयित चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून चार ते पाच जणांच्या टोळीने ही चोरी केल्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, एका चायनीज दुकानात काहीही हाती न लागल्याने चोरट्यांनी फ्रिजमधील चायनीज खाद्यपदार्थांवर ताव मारल्याची चर्चा घटनास्थळी सुरू होती.

ही घटना सोमवार, दि.११ रोजी पहाटे सुमारे सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास घडली.

> चोरटा सीसीटीव्हीत कैद;
> चायनीज दुकानात चोरीसह जेवणावरही ताव

घटनेची माहिती मिळताच शिराळा पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून पुढील तपास सुरू केला आहे. कापरी नाका हा बायपास रोडवरील व्यापारीदृष्ट्या गजबजलेला परिसर मानला जातो. येथे हॉटेल, पान शॉप, चायनीज सेंटर, मिसळ हाऊस तसेच सर्व्हिसिंग सेंटरसह विविध व्यवसाय आहेत. चोरट्यांनी हॉटेल शिवनंदन, एस.के.पान शॉप, मामा चायनीज, तुळशी मिसळ तसेच सर्व्हिसिंग सेंटर आदी दुकानांच्या पत्र्यांचे स्क्रू काढून आत प्रवेश केला व चोरी केली.

रविवारी रात्री सर्व व्यावसायिक दुकाने बंद करून घरी गेले होते. (पान २ वर)

### चोरटे सराईत

सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक संशयित चोरटा दुकानांच्या पत्र्यांचे स्क्रू काढून आत प्रवेश करताना दिसत आहे.संबंधिताने डोक्यापासून पायापर्यंत पांढऱ्या रंगाचा पोशाख परिधान केला असून तोंड बांधलेले आहे. तसेच हाताचे ठसे लागू नयेत म्हणून हातात ग्लोव्हज आणि पायात बूट घातल्याचे फुटेजमध्ये स्पष्ट दिसत आहे.

# विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची रंगत वाढली

### अंतिम फेरीत पाच दिग्गज ; १४ मे रोजी मुलाखती

कोल्हापूर ता.११ (प्रतिनिधी) –

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठीच्या निवड प्रक्रियेत आता अंतिम टप्पा गाठला असून पाच जणांची अंतिम मुलाखतीसाठी निवड करण्यात आली आहे. कुलपती कार्यालयाकडून संबंधित उमेदवारांना मेलद्वारे सूचना पाठविण्यात आल्या असून १४ मे २०२६ रोजी अंतिम मुलाखती होणार आहेत. अंतिम फेरीत विद्यापीठाशी संबंधित तिघांचा समावेश असल्याने या निवडीकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



अंतिम फेरीत माजी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ चे कुलगुरू डॉ.आर.के.कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांची निवड झाली आहे. याशिवाय नागपूर येथील डॉ. स्मिता देशमुख आणि नांदेड येथील डॉ.ए.एम.महाजन यांचाही अंतिम पाचमध्ये समावेश असल्याचे समजते. मात्र देशमुख व महाजन यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. तत्कालीन कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के (पान २ वर)

# ऊस गाळप हंगाम संपला

### ९९ लाख मेट्रिक टन साखर उत्पादन

पुणे,ता.११–

राज्यातील सन २०२५–२६ चा ऊस गाळप हंगाम पूर्ण झाला असून, यंदा सरासरी १०५ दिवस हंगाम सुरू होता. या कालावधीत राज्यात १० कोटी ४५ लाख ५८ हजार मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्यात आले असून, त्यातून ९९ लाख १८ हजार मेट्रिक टन साखर उत्पादन झाले आहे. यंदा ९.४९ टक्के इतका निव्वळ साखर उतारा मिळाल्याची माहिती साखर आयुक्तालयाने दिली.



ऊस गाळपामध्ये पुणे आणि सोलापूर विभाग आघाडीवर राहिले, तर साखर उत्पादन आणि उताऱ्यामध्ये कोल्हापूर विभागाने आपले वर्चस्व कायम राखले आहे. (पान २ वर)

# जयसिंगपुरला वळवाचा तडाखा

### जनजीवन विस्कळीत; पिकांचे नुकसान

जयसिंगपूर,ता.११(प्रतिनिधी) –

जयसिंगपुरात सोमवारी दुपारी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे जयसिंगपूरसह परिसरातील अनेक झाडे उमळून पडली. अनेक घरावरचे पत्रे उडून गेले तर पावसामुळे ऊस, शाळू, केळी या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सांगली–कोल्हापूर महामार्गावर डी मार्ट जवळ दोन मोठी झाडे कोसळल्यामुळे रात्री उशिरापर्यंत या रोडवरील (पान २ वर)



वादळी वाऱ्याने सांगली–कोल्हापूर महामार्गावर झाड उन्मळून पडले यामुळे रस्ता उशीरापर्यंत बंद होता.

महिला आयोगाचा धक्कादायक अहवाल

# टीसीएस प्रकरणात महिलांचे लैंगिक शोषण

नाशिक,ता.११–

नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस बीपीओ युनिटमधील कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषण आणि जबरदस्तीने धर्मांतर प्रकरणावरून मोठी खळबळ उडाली आहे. हे प्रकरण महिला कर्मचाऱ्यांच्या मानसिक आणि शारीरिक छळाशी संबंधित आहे. या प्रकरणासंदर्भात महत्वाची अपडेट आली आहे. नाशिक टीसीएस प्रकरणावर राष्ट्रीय महिला आयोगाचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. नाशिक प्रकरणाची दखल घेत ५० पानांहून अधिकचा अहवाल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला आहे.

अहवालात कार्यस्थळी लैंगिक छळ, मानसिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावणे आणि कायद्याच्या शून्य (पान २ वर)

(पान १ वरून)

# ट्रम्प उद्या चीन दौऱ्यावर

जागतिक ऊर्जा पुरवठ्याबाबत वाढती चिंता अशा पार्श्वभूमीवर हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

याशिवाय तैवान, व्यापार आणि सामरिक स्पर्धा यांसारख्या मुद्द्यांवर अमेरिका आणि चीन यांच्यातील तणावही कायम आहे.

व्हाईट हाऊसच्या प्रिन्सिपल डेप्युटी प्रेस सेक्रेटरी ॲना केली यांच्या माहितीनुसार, ट्रम्प बुधवारी संध्याकाळी बीजिंगमध्ये पोहोचतील. गुरुवारी त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक होईल. कार्यक्रमात टेंपल ऑफ हेवनला भेट आणि राजकीय मेजवानीचाही समावेश आहे. यानंतर शुक्रवारी दोन्ही नेते पुन्हा एकदा भेटणार असून चहापान आणि वर्किंग लंचचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच यावर्षाच्या अखेरीस शी जिनपिंग यांचा अमेरिकेचा दौरा होण्याची शक्यता असल्याचे संकेत अमेरिकेकडून देण्यात आले आहेत.

# 'सोमनाथ' अमृत महोत्सव देशासाठी मार्गदर्शक

उत्सव साजरा करत आहोत. या मंदिराप्रती आपली वैयक्तिक श्रद्धा असल्याचे सांगत, पंतप्रधानांनी दादा सोमनाथांचे परमभक्त म्हणून मंदिराला दिलेल्या असंख्य भेटींची आठवण सांगितली.

**पोखरण अणुचाचणीचा वर्धापन दिन**

या दिवसाचा राष्ट्रीय इतिहासातील दुसऱ्या एका ऐतिहासिक घटनेशी संबंध जोडताना त्यांनी ११ मे हा १९९८ मधल्या भारताच्या पोखरण अणुचाचणीचा वर्धापन दिन सुद्धा आहे, याची आठवण करून दिली. देशाने ११ मे रोजी तीन अणुचाचण्या करून भारतीय शास्त्रज्ञांची क्षमता सिद्ध केली, असे त्यांनी सांगितले. 'त्यावेळी संपूर्ण जगाचा दबाव भारतावर होता, मात्र, अटलजींच्या नेतृत्वाखालील तत्कालीन सरकारने आमच्यासाठी राष्ट्र प्रथम आहे आणि जगातील कोणतीही शक्ती भारताला झुकवू शकत नाही किंवा दबावाखाली आणू शकत नाही, हे दाखवून दिले' असे मोदी यांनी ठामपणे सांगितले.

सोमनाथ स्वाभिमान पर्वाच्या निमित्त, काही महिन्यांपूर्वी या मंदिराला दिलेल्या भेटीचे स्मरण करत, पंतप्रधानांनी, अगदी थोड्या काळात दोन उत्सवांत सहभागी होण्याचे आगळे वेगळे वैशिष्ट्य सांगितले. ''पहिल्या विध्वंसाच्या हजार वर्षांनंतर सोमनाथाचा गौरव अविनाशी राहिला आहे आणि आज या आधुनिक स्वरूपाच्या प्राणप्रतिष्ठेला ७५ वर्षे पूर्ण होत असताना, आपल्याला या हजार वर्षांच्या चिरकाल प्रवासाचा अनुभव घेण्याची संधी लाभली आहे,'असे पंतप्रधान म्हणाले.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर अवघ्या चार वर्षांनी, १९५१ मध्ये मंदिराच्या पुनर्निर्माणाच्या महत्त्वावर प्रकाश टाकतांना पंतप्रधानांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ५०० संस्थानांच्या राजकीय विलीनीकरणाचा आणि त्यांच्या सोमनाथच्या पुनर्बांधणीच्या निर्धाराचा उल्लेख केला. राष्ट्र परकीय बेड्यांमधून मुक्त झाले, तेव्हा सोमनाथच्या जीर्णोद्धाराने जगाला हा संदेश दिला की भारत केवळ स्वतंत्र झालेला नाही, तर तो आपले प्राचीन वैभव पुन्हा प्राप्त करत आहे, असे मोदींनी सांगितले.

# व्हॅन दरीत कोसळून अकरा ठार

खोल दरीत जाऊन पडले. यानंतर वैद्यकीय पथके आणि सरकारी अधिकारी घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच स्थानिक नागरिकांनी स्वतःहून बचावकार्य सुरू केले होते. जखमींना सैदू शरीफ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# विमानाच्या टायरला आग

तत्परतेमुळे संभाव्य मोठा अपघात वेळेत टळला.ही घटना टर्किश एअरलाईन्सच्या टीके ७२६ या विमानासोबत घडली. हे विमान इस्तंबूल येथून उड्डाण करून काठमांडूला पोहोचले होते. विमान रनवेवर उतरल्याबरोबर त्याच्या टायरमधून आगीच्या ज्वाळा बाहेर पडू लागल्या. टायरला आग लागल्याची माहिती मिळताच विमानतळावरील आपत्कालीन यंत्रणा तात्काळ सक्रिय झाली. विमानतळ सुरक्षा विभागाचे एसपी राजकुमार सिलवाल यांनी सांगितले की, अग्निशमन दलाच्या गाड्या त्वरित घटनास्थळी दाखल झाल्या आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. या विमानात एकूण २७८ प्रवासी आणि चालक दलातील ११ सदस्य प्रवास करत होते. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कोणतीही विलंब न करता सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे विमानाबाहेर बाहेर काढले. विशेष म्हणजे, या विमानात संयुक्त राष्ट्र संघचे काही वरिष्ठ अधिकारीही प्रवास करत होते. पोलीस आणि विमानतळ प्रशासनाने सर्व प्रवासी आणि कर्मचारी पूर्णपणे सुरक्षित असल्याची पुष्टी केली आहे. वेळेत करण्यात आलेल्या कारवाईमुळे शेकडो लोकांचे प्राण वाचले आणि मोठी दुर्घटना टळली.

# ऊस गाळप हंगाम संपला

राज्यातील १०२ सहकारी आणि १०७ खासगी अशा एकूण २०९ साखर कारखान्यांनी यंदाच्या हंगामात ऊस गाळप केले. या सर्व कारखान्यांची एकत्रित दैनिक ऊस गाळप क्षमता सुमारे १० लाख ७ हजार ८०० मेट्रिक टन इतकी होती. तुलनेत, गतवर्षी २०२४-२५ च्या हंगामात राज्यातील १९९ साखर कारखान्यांनी मिळून ८५३.८२ लाख मेट्रिक टन ऊस गाळप केले होते. मात्र यंदा त्यात मोठी वाढ झाली असून, मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १९१.७६ लाख मेट्रिक टन अधिक ऊस गाळप झाले आहे. तसेच साखर उत्पादनातही १८२.५१ लाख क्विंटलने वाढ झाल्याची माहिती साखर आयुक्तालयाने दिली आहे.

# वर्क फ्रॉम होमला प्राधान्य द्या

परदेशात जातो. जोपर्यंत परिस्थिती सामान्य होत नाही, तोपर्यंत आपण सोन्याची खरेदी टाळावी. मोदींनी खाद्यतेलाचा वापर कमी करण्याचेही आवाहन केले. ते म्हणाले की, खाद्यतेलाच्या आयातीवरही देशाचे मोठे परकीय चलन खर्च होते. जर लोकांनी खाद्यतेलाचा कमी वापर केला, तर यामुळे देश आणि शहर दोघांनाही फायदा होईल. त्याचबरोबर सरकारी आणि खासगी कार्यालयांमध्ये वर्क फ्रॉम होम सुरू करण्याचा आणि शाळांमध्ये ऑनलाइन वर्ग घेण्याचा सल्लाही दिला. मोदी म्हणाले की, देशाला सध्या परकीय चलन वाचवण्याची गरज आहे आणि प्रत्येक नागरिकाला आपल्या कर्तव्याला प्राधान्य द्यावे लागेल.

## संजयकुमार अनिगोळ यांना पितृशोक



**इचलकरंजी,ता.११-**

कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन चार्टर्ड अकौंटंट संजयकुमार अनिगोळ यांचे वडिल शेषाप्पा अनिगोळ (वय ९७) यांचे रविवारी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करण्याची महाराष्ट्राची क्षमता

(पान १ वरून)

होतात आणि असेही काही क्षण येतात जेव्हा देश त्या बदलाची व्याख्या स्वतः ठरवतात. सध्याचा क्षण हा भारतासाठी बदलाची व्याख्या ठरवण्याचा आहे, असे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री म्हणाले, आजचे जग एकाच वेळी अनेक स्थित्यंतरातून जात आहे. यात भू-राजकीय विखंडन, तांत्रिक उलथापालथ, ऊर्जा संक्रमण, पुरवठा साखळीतील बदल आणि आर्थिक विकासाच्या भविष्याबद्दलची मोठी अनिश्चितता यांचा समावेश आहे. मात्र, या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हा एकमेव देश मोठ्या प्रमाणावर जगाचा आत्मविश्वास वाढवत आहे. त्याचे कारण केवळ आमची बाजारपेठ अथवा युवा लोकसंख्या नाही तर आमच्याकडे स्थैर्य, महत्त्वाकांक्षा, लवचिकता आणि अंमलबजावणी करण्याची जबरदस्त क्षमता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली, भारताने गेल्या दशकात स्वतःबद्दल जागतिक स्तरावर नवी प्रतिमा स्थापित केली आहे. आता आमच्याकडे क्षमतेसोबतच संधी आणि धोरणांची वेगाने अमंलबजावणी करणारा देश म्हणून पाहिले जात आहे.

भविष्यातील महाराष्ट्राबाबत आमचा रोड मॅप स्पष्ट असून २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था आणि २०४७ पर्यंत जगातील सर्वात महत्त्वपूर्ण प्रादेशिक अर्थव्यवस्थांपैकी एक असणे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, यावर्षी दावोसमध्ये महाराष्ट्राने जवळपास ३० लाख कोटींचे गुंतवणूक प्रस्ताव आणले. आजचे गुंतवणूकदार सवलतींसोबतच ते शाश्वत विश्वासाच्या शोधात आहेत. दीर्घकालीन विचार , जलद निर्णय आणि विश्वासार्हतेने अंमलबजावणी या त्रिसुत्रीची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारांच्या शोधात गुंतवणूकदार आहेत. अनिश्चिततेच्या जगात,विश्वास हीच खरी आर्थिक पुंजी असते आणि महाराष्ट्राने हा विश्वास निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक काम केले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

सीआयआयचे डायरेक्टर जनरल चंद्रदीप बॅनर्जी आणि अध्यक्ष राजीव मेमाणी यांनी आपल्या प्रास्ताविकात मुखमंत्र्याच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा गौरव केला.

# कापरी नाक्यावर सहा दुकाने फोडून लाखोंची चोरी

(पान १ वरून)

काही दुकानदारांनी व्यापाऱ्यांना उधारी देण्यासाठी आणलेली रोकड दुकानातील ड्रॉवरमध्येच ठेवली होती. याचाच फायदा घेत चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने चोरी केल्याचे दिसून येत आहे.

चोरट्यांनी हॉटेल शिवनंदनच्या ड्रॉवरमधून सुमारे ८२ हजार रुपयांची रोकड लंपास केली. तसेच एस. के. पान शॉपमधून २० ते २५ हजार रुपये आणि अन्य एका हॉटेलमधून दोन हजार रुपये चोरीस गेले. आधुनिक मशिनच्या सहाय्याने दुकानांचे पत्रे उचकटून ही चोरी करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

दरम्यान, सोमवारी रात्री उशिरापर्यंत शिराळा पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल झालेली नव्हती. तक्रार नोंदविण्यासाठी गेलेल्या काही तक्रारदारांना पोलीस स्टेशनकडून दमदाटी झाल्याची चर्चा परिसरात सुरू असून यामुळे व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

# विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची रंगत वाढली

(पान १ वरून)

यांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर २०२५ रोजी संपल्यानंतर कुलगुरू पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे देण्यात आला आहे. तर प्र-कुलगुरूपदी डॉ. ज्योती जाधव कार्यरत आहेत.

दरम्यान, कुलगुरू शोध समितीने इच्छुकांकडून अर्ज मागविल्यानंतर ११५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यात अर्जांची छाननी करण्यात आली. समितीने त्यातून २८ उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी निश्चित केली होती. या उमेदवारांच्या मुलाखती ३ व ४ एप्रिल २०२६ रोजी पार पडल्या. त्यामध्ये डॉ. आर. के. कामत, डॉ. ज्योती जाधव, डॉ. पी. एस. पाटील, एसएनडीटी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. चव्हाण, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. एस. एस. कोळेकर यांच्यासह विविध विद्यापीठांतील प्राध्यापक व अधिकारी सहभागी झाले होते.

मुलाखतीनंतर कुलगुरू शोध समितीने आपला अहवाल कुलपती कार्यालयाकडे सादर केला होता. त्यानंतर आता अंतिम मुलाखतीसाठी पाच जणांना निमंत्रित करण्यात आले आहे. अंतिम फेरीत असलेल्या डॉ. आर. के. कामत, डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. पी. एस. पाटील या तिघांचेही शिवाजी विद्यापीठाशी जुने संबंध असल्याने कुलगुरुपदाची निवड अधिकच चर्चेत आली आहे.

# मोदींनीच 'वानप्रस्थाश्रमा'कडे मार्गस्थ व्हावे

## -हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई,ता.११(प्रतिनिधी)-**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला पेट्रोल-डिझेल, सोने खरेदी, खतांचा वापर व खाद्यतेलाच्या वापरावर केलेला उपदेश म्हणजे देश चालवण्यास 'कॉम्प्रमाइज्ड पंतप्रधान' सपशेल फेल ठरल्याचे द्योतक आहे.**



जनतेला त्याग करण्याचा नाहक सल्ला व उपदेश दणारे मोदी व त्यांचे सहकारी मात्र कोट्यवधी रुपयांची उधळण करत आहेत. सगळा त्याग जनतेने करायचा आणि नरेंद्र मोदी फक्त कॅमेऱ्यासमोर भाषण देत फिरणार का? असा संतप्त प्रश्न विचारून, प्रचारमंत्री नरेंद्र मोदी यांनीच 'राष्ट्रहितासाठी 'त्याग' करत वानप्रस्थाश्रमाकडे मार्गस्थ व्हावे', ही १४० कोटी जनतेची भावना आहे, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विधानाचा खरपूस समाचार घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, जेव्हा जगातील इतर देश संभाव्य संकटासाठी नियोजन आणि तयारी करत होते तेव्हा प्रचारमंत्री नरेंद्र मोदी आणि भाजपा फक्त निवडणुका, जाहिराती, धर्मांधता आणि द्वेषाचे राजकारण करण्यात मग्न होते. नरेंद्र मोदी यांच्या निष्काळजीपणाची, अहंकारी, लहरी कारभाराची मोठी किंमत देशातील नागरिकांना मोजावी लागत आहे.

देशात इंधन आणि एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे, महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे, सोने-चांदी सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर गेले आहे. अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. निवडणुका जिंकण्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेची राखरांगोळी केली आणि आता जनतेलाच उपदेश देत फिरत आहेत. असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# जयसिंगपुरला वळवाचा तडाखा

(पान १ वरून)

वाहतूक बंद होती. वादळी वाऱ्यानंतर अल्पशा आलेल्या पावसामुळे काहीकाळ हवेत गारवा निर्माण झाला. मात्र रात्री पुन्हा उकाडा वाढला होता. गेल्या अनेक दिवसांपासून उष्णतेची लाट पसरली आहे. या उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांचे जीवन हवालदिल बनले आहे. सोमवारी सकाळी तर हवेमध्ये मोठ्या प्रमाणात उष्मा वाढला होता. दुपारी अचानकपणे ढगाळ वातावरण तयार झाले व मोठ्या प्रमाणात वादळ सुरू झाले. वादळामुळे सांगली-कोल्हापूर महामार्गावरील डी मार्ट जवळील दोन मोठी झाडे कोसळली. यामुळे रात्री उशिरापर्यंत महामार्गावरील पूर्ण वाहतूक बंद होती. याशिवाय शिरोळ-जयसिंगपूर रोडवरील डॉ.जे. जे. मगदूम कॉलेज समोर एक झाड रस्त्यावर कोसळल्याने हा मार्ग देखील काहीकाळ बंद ठेवण्यात आला होता. पालिकेकडून तात्काळ झाडे हटवण्याचे काम सुरू होते. याशिवाय शहर व परिसरातील अनेक घरावरील पत्रे वादळामुळे उडून गेले आहेत. याशिवाय ऊस, केळी, शाळू यासारखी पिके वादळामुळे पडल्यामुळे या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# टीसीएस प्रकरणात महिलांचे लैंगिक शोषण

(पान १ वरून)

अंमलबजावणीचे गंभीर आरोप नोंदवले आहेत. आरोपींकडून महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक, मानसिक आणि भावनिक छळ झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. हिंदू धर्म, परंपरा आणि श्रद्धांचा अपमान करुन महिलांवर दबाव टाकल्याचा आरोप करण्यात करण्यात आला आहे. महिला कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण, तक्रार केल्यास बदली आणि नोकरी गमावण्याची भीती दाखवल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. समिती पूर्णपणे निष्क्रिय असून नाशिक कार्यालयात कोणतीही जागरूकता व्यवस्था नव्हती. सीसीटीव्ही बसवलेले असले तरी ते बंद अवस्थेत असल्याचे आयोगाच्या निदर्शनात दिसून आले आहे. तक्रारदारांना संरक्षण देण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. आयोगाने संबंधित आरोपींवर कलम ७५, ७८, ७९ आणि २९९ अंतर्गत कारवाईची शिफारस केली असून टीसीएस व्यवस्थापनावरही कठोर प्रश्न उपस्थित केले आहेत.

# वेंकटेश्वरा कंपनीला १३५ कोटी आदा?

## दूध वाहतुकीची वर्षनिहाय माहिती जाहीर करा; मागणी

**कोल्हापूर,ता.११(प्रतिनिधी)-**

**मुंबई आणि पुणे येथे टँकरद्वारे गोकुळ दूधाचा पुरवठा करणाऱ्या वेंकटेश्वरा गुड्स मुव्हर्स या कंपनीला आतापर्यंत सुमारे १३५ कोटी रुपये अदा करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या व्यवहारांची सविस्तर वर्षनिहाय माहिती जाहीर करावी, अशी मागणी दूध संस्था सभासदांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन सोमवारी गोकुळ शिरगाव येथील कार्यालयात प्रशासक मंडळाकडे देण्यात आले.**

संबंधित कंपनी नेमकी कधीपासून दूध वाहतूक करत आहे, कंपनीकडे किती टँकर आहेत, वाहतुकीचे दर काय आहेत तसेच आतापर्यंत किती बिले अदा करण्यात आली, याची सविस्तर माहिती जाहीर करावी, अशी मागणी सभासदांनी केली. प्रशासक मंडळाचे सदस्य प्रदीप मालगावे यांनी हे निवेदन स्वीकारले. यावेळी चंद्रकांत परुळेकर, सागर बलकवडे उपस्थित होते.

यावेळी बोलताना सभासदांनी गोकुळ या ब्रँडवर जिल्ह्यातील लाखो कुटुंबांचे अर्थकारण अवलंबून असल्याचे सांगितले.

'गोकुळच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी घ्या. एका व्यक्तीमुळे गोकुळमधील वातावरण गढूळ झाले आहे. संबंधित व्यक्तीला पायबंद घालण्याची गरज आहे,' असे मत सभासदांनी व्यक्त केले. 'गेली चार वर्षे ही व्यक्ती कुठे होती? निवडणुकीच्या तोंडावरच गोकुळचे हित कसे दिसू लागले?' असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

गोकुळ मधील वातावरण शांत ठेवण्याची जबाबदारी आता प्रशासक मंडळाची असल्याचे सभासदांनी सांगितले. यावर प्रदीप मालगावे म्हणाले, 'नूतन संचालक मंडळ अस्तित्वात येईपर्यंत गोकुळ आहे त्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. प्रशासक मंडळाकडून गोकुळच्या ब्रँडला कुठेही धक्का लागणार नाही, असेच काम केले जाईल.'

सभासदांनी गोकुळ प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली.'गोकुळमध्ये बेलवाडे यांना तासभर वेळ दिला जातो, मात्र दूध संस्था सभासदांना अधिकाऱ्यांची वाट पाहावी लागते. घरच्यांना फाशी आणि बाहेरच्यांना आहेर असा प्रकार सुरू आहे,' असा आरोप त्यांनी केला.

यावर प्रशासक मंडळातील सदस्यांनी,'गोकुळ हा दूध उत्पादकांचा संघ आहे. येथे जो शेतकरी माहिती मागेल, त्याला आवश्यक ती माहिती दिली जाईल,' असे स्पष्ट केले.

यावेळी कृष्णात चौगले, भगवान दिंडे, दत्तात्रय पाटील, राहुल आवळेकर, कृष्णात मेटील, निवास पाटील, संजय दळवी, दिगंबर बाते आदी उपस्थित होते.

**दूध संस्थांच्या सुनावणी पूर्ण करावी**

दरम्यान, गोकुळ शिरगाव येथील कार्यालयात जाण्यापूर्वी दूध संस्था सभासदांनी सहाय्यक निबंधक कार्यालयात सहाय्यक निबंधक कृष्णा ठाकरे यांची भेट घेतली. दूध संस्थांच्या सुनावणी प्रक्रिया पूर्ण करून त्याचा निकाल तातडीने जाहीर करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# अलमट्टी धरणातील पाण्याच्या विसर्गाबाबत कर्नाटकशी समन्वय राखा

## सतेज पाटील यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

कोल्हापूर,ता.११(प्रतिनिधी)-

कोल्हापूर जिल्ह्यात मागील तीन ते चार वर्षांपासून पावसाळ्यामध्ये उद्भवलेली पूर परिस्थिती पाहता अलमट्टी धरणातील पाण्याच्या विसर्गाबाबत कर्नाटक राज्य सरकारशी समन्वय राखा अशी मागणी काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे सोमवारी निवेदनाद्वारे केली.

निवेदनात म्हंटले आहे, की अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे कोल्हापूर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, पोलीस, आरोग्य, जिल्हा परिषद, महानगरपालिका इत्यादी सर्व महत्त्वाच्या यंत्रणांना त्यांच्या विभागामध्ये पुर व्यवस्थापनाचा नियंत्रण कक्ष उभारणेबाबत सूचना कराव्यात. २०२१-२२ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत बसविण्यात आलेली पब्लिक ॲड्रेस सिस्टीम कार्यान्वीत करुन त्याव्दारे पूरबाधित क्षेत्रामधील नागरिकांना पूर परिस्थिती व उपाययोजनां बाबत वेळोवेळी सूचना व माहिती द्यावी, पूरबाधित संवेदनशील घोषित केलेल्या ३९१ गावांमध्ये अन्नधान्य वितरण व्यवस्था व इतर जीवनावश्यक सामग्रींचा अधिकचा पुरवठा पूर परिस्थिती निर्माण होण्या अगोदर करावा, शहरातील ज्या ठिकाणी पुराचे पाणी येते तेथील नागरिकांसाठी निवारा केंद्रे उभारण्यात यावीत. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये सोयीसुविधा करा, पूरपरिस्थिती निर्माण होणाऱ्या शहरी व ग्रामीण भागामध्ये वैद्यकीय पथकांची नियुक्ती करण्यात यावी. शिरोळ, हातकणंगले व करवीर या पूर प्रणव तालुक्यामधील आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व औषधांचा जादाचा साठा करुन ठेवावा.

पूरग्रस्त भागातील जनावरांना स्थलांतरित करण्यासाठी जागा निश्चित करण्यात यावी. पाटबंधारे विभागाची बिनतारी संदेश यंत्रणा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी जोडून घ्यावी अशा मागण्या करण्यात आल्या.

# पिस्तूल बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

**सांगली,ता.११(प्रतिनिधी)-**

**देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पोलिसांनी अटक केली. अनिकेत गुंडा करांडे (वय २४, रा. विठ्ठरायचीवाडी, ता. कवठेमहांकाळ)असे या त्याचे नाव आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी पलूस तालुक्यातील नागठाणे येथे केली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांनी दिली.**

झाडे म्हणाले, जिल्ह्यातील गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्यावर कारवाईचे आदेश दिले आहेत. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील पोलीस उपनिरीक्षक कुमार पाटील व त्यांचे पथक तासगाव उपविभागात पेट्रोलिंग करत होते.

यावेळी पोलीस अंमलदार सचिन कनप यांना खात्रीशीर बातमी मिळाली की, सराईत गुन्हेगार करांडे हा पलूस तालुक्यातील नागठाणे गावातील चोपण रस्त्यावर कमरेला पिस्तूल लावून थांबलेला आहे. अशी माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने नागठाणे फाटा परिसरात सापळा रचला. पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या करांडे याला पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ६० हजार रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस मिळून आले.

पोलिसांनी त्याच्याकडे परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही अधिकृत परवाना नव्हता. अधिक चौकशीत त्याने हे पिस्तूल स्वतःच्या सुरक्षेसाठी अक्षय पाटील (रा.डफळापूर, ता.जत) याच्याकडून घेतल्याची कबुली दिली. सध्या अक्षय पाटील हा पसार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

या कारवाईत हवालदार संजय पाटील, संदीप पाटील, अतुल माने, रणजीत माने, सुशील मस्के, सचिन कनप, सुनील जाधव, ऋतुराज होळकर, सुमित सूर्यवंशी, संकेत मगदूम, सुभाष सूर्यवंशी आणि सुशांत चिले यांनी सहभाग घेतला होता.

**भावपुर्ण श्रध्दांजली!**



**श्रीमती विमल भैरू वेटाळे**

यांचे रविवार, दि.१०/०५/२०२६ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना..!

**वेटाळे परिवार**

इचलकरंजी, सेनापती कापशी, नंद्याळ

* रक्षाविसर्जन : बुधवार, दि. १३/०५/२०२६ रोजी सकाळी ८.३० वा. पंचगंगातिरी, इचलकरंजी.

**।। भावपुर्ण श्रध्दांजली ।।**



**कै. शेषाप्पा अनिगोळ (आप्पाजी)**

आमच्या संस्थेचे मार्गदर्शक, कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे व्हॉईस चेअरमन, चार्टर्ड अकौंटंट श्री. संजय अनिगोळ साहेब आणि श्री. अरूण अनिगोळ साहेब यांचे वडिल रिटायर्ड डेप्युटी रजिस्टार कै. शेषाप्पा अनिगोळ (आप्पाजी) यांचे दु:खद निधन झाले. याप्रसंगी अनिगोळ कुटुंबावर कोसळलेल्या दु:खामध्ये आम्ही सहभागी आहोत. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो..!

**दि इचलकरंजी नागरी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, इचलकरंजी**

## कोडोली खून प्रकरणातील संशयिताला चार दिवसाची पोलीस कोठडी

**वारणानगर,ता.११(प्रतिनिधी)–**

**कोडोली (ता. पन्हाळा) येथील बाजारपेठेत पैशाच्या देवघेवीच्या वादातून झालेल्या हाणामारीत डोक्यात रॉड घालून अभिजित प्रकाश जाधव (वय ४२, रा. शामुनाना माळ, कोडोली, ता. पन्हाळा) याचा खून केल्या प्रकरणी कोडोली पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संदीप शिवाजी पाटील (वय ४०, सध्या रा.कोडोली, मूळ गाव थेरगाव ता. शाहूवाडी) याला सोमवारी न्यायालयात हजर केले असता त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.**




याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, अभिजीत जाधव हा हॉटेल व्यवसायिक तर संदीप पाटील याचे कोडोली बाजारपेठेत कापड दुकान आहे. त्यांच्यात पैशाच्या देवघेवीच्या वादातून कोडोली मुख्य बाजारपेठेत असलेल्या कापड दुकानासमोर वादावादी झाली. यावेळी रागाच्या भरात संदीप पाटील यांनी दुकानाच्या शटर साठी वापरत असलेला रॉड जाधव यांच्या डोक्यात हाणला. यात तो गंभीर जखमी झाला होता. त्याला कोडोली उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता पुढील उपचारासाठी कोल्हापूर जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले होते. परंतु रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. त्याची पत्नी शुभांगी जाधव याने या बाबत फिर्याद दिल्याने त्यांच्यावर रात्री उशिरा कोडोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन त्याला ताब्यात घेऊन सोमवारी पन्हाळा न्यायालयात हजर केले असता आरोपीला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# यंत्रमाग व्यवसायाला वीज दरवाढीचा शॉक

- पंचगंगा प्रदुषणामुळे प्रोसेसर्स बंद
- मजुरी वाढीसाठी खर्चीवाले आक्रमक
- वहीफणी कामगार दरवाढीवर ठाम
- वेगवगळ्या अडचणीमुळे वस्त्रोद्योग संकटात

**इचलकरंजी,ता.११–**

**वेगवेगळ्या कारणामुळे वस्त्रोद्योग संकटात सापडला आहे. या संकटाच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असताना त्यात आणखी भर म्हणून २४ एच.पी. वरील यंत्रमाग धारकांच्या वीज बिलात प्रति युनिट ५० ते ६० पैशाने वाढ करून एक प्रकारचा मोठा शॉकच दिला आहे. या प्रकारामुळे वस्त्रोद्योग आणखीन अडचणीत सापडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यातून मार्ग काढण्यासाठी लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन तोडगा काढणे अपेक्षित आहे असे यंत्रमाधारकांतून बोलले जात आहे.**

वस्त्रोद्योगातील प्रमुख घटक असलेल्या यंत्रमाग व्यवसाय, प्रोसेसर्स, सायझिंग आधी महत्त्वाचे घटक विविध कारणामुळे अडचणीत सापडले आहे. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न चालू असताना त्यामध्ये आणखी अडचणी वाढत चालल्या आहेत.

### प्रदुषणामुळे प्रोसेस बंद

गेल्या काही दिवसापासून पंचगंगा नदी प्रदूषण प्रश्नावरून शिरोळ तालुक्यातील आंदोलन अंकुश संघटनेच्यावतीने आंदोलन सुरू केले आहे. संघटनेने प्रोसेसचे पाणी ओढ्यात सोडल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे शहरातील सर्वच लहान मोठ्या प्रोसेस गेल्या काही दिवसापासून बंद ठेवले आहेत. त्याचा फटका उद्योजकांबरोबर हाताचे पोट असणाऱ्या कामगार वर्गालाही बसत आहे. त्यातून मार्ग निघत नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

### वहीफणी कामगार मजुरीवाढीवर ठाम

वहीफणी कामगारांनी गेल्या काही वर्षापासून वहीफणीच्या मजुरीच्या दरात वाढ न झाल्याने इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशनची चर्चा करून



वहीफणी संघटनेच्यावतीने १८ टक्केची वाढ जाहीर केली आहे.मात्र,या दरवाढीला यंत्रमागधारकांनी विरोध केला आहे. मात्र, वहीफणी संघटनाने जे यंत्रमागधारक दरवाढ देतील त्यांचीच वहीफणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अनेक कारखाने बंद आहेत.

### मजुरी वाढीसाठी खर्चीवाले आक्रमक

खर्चीवाल्या यंत्रमागधारकांनी मजुरी वाढीसाठी यंत्रमाग बंद चे हत्यार उपसले आहे. गेल्या तेरा वर्षांपासून मजुरीत वाढ न झाल्याने खर्चीवाल्या यंत्रमागधारकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. खर्चीवाल्या यंत्रमाग धारकांच्या यंत्रमाग बंद आंदोलनामुळे शहर परिसरातील अनेक यंत्रमाग बंद आहेत.

एकीकडे कापसाच्या भावात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. त्याचा फटका सूत दरात होत आहे. सूत दरात दिवसेंदिवस वाढ होत चालले आहे. त्याचाही विपरीत परिणाम वस्त्रोद्योगांवर जाणवत आहे.

### २७ एच.पी. वरील यंत्रमागधारक अडचणीत

वीज बिल सवलतीसाठी ऑनलाइन नोंदणी सक्ती केली असल्यामुळे यंत्रमागधारकांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे ऑनलाइन नोंदणीची सक्ती रद्द करा अशी मागणी



होत असतानाच यंत्रमागाच्या वीज बिल दरात पुन्हा वाढ झाल्याचे दिसून येत आहे. २७ एच.पी. वरील यंत्रमागधारकांना सव्वा पाच ते साडेपाच रुपये प्रति युनिट असणारी आता वीज सहा रुपये ते साडेसहा रुपये प्रति युनिट ने घ्यावी लागणार आहे. २७ एच.पी. वरील साधे तसेच ऑटोलूमची संख्या शहर परिसरात मोठी आहे. त्यामुळे वीज दरवाढीचा मोठा शॉक सदर यंत्रमाग धारकांना बसणार आहे.२४ एच.पीअसणाऱ्या यंत्रमागधारकांना महिन्यामागे साधारण एक ते दीड लाख रुपये ज्यादा द्यावी लागणार आहे. त्यामुळे अगोदरच आर्थिक संकटात सापडलेला यंत्रमागधारक आता आणखीन अडचणीत येणार आहे.

वेगवेगळ्या रूपाने वस्त्रोद्योग व्यवसाय चांगलाच अडचणीत सापडला आहे. वेळीच त्याला शासनाने आधार न दिल्यास संपूर्ण वस्त्रोद्योगच नामशेष होण्याची भीती जाणकारातून व्यक्त केली जात आहे. तेव्हा तातडीने लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून संकटातून संक्रमण करत चाललेल्या वस्त्रोद्योगाला बाहेर काढावे अशी मागणी उद्योजकांतून केली जात आहे.

# जागा महानगरपालिकेची अतिक्रमण नागरिकांचे

## आरक्षीत जागा तातडीने ताब्यात घ्याव्यात

**इचलकरंजी,ता.११–**

**महानगरपालिकेच्या शहरात कोट्यावधी रुपयांच्या जागा आहेत. मात्र, त्या जागा महापालिकेच्या ताब्यात नाहीत. त्यांच्यावर नेते तसेच नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे. जागा महापालिकेची आणि अतिक्रमण नेत्यांचे अशी अवस्था आरक्षित जागेची झाली आहे.तेव्हा महानगरपालिका प्रशासनाने तातडीने पावले उचलत आरक्षीत जागा आपल्या ताब्यात घ्याव्यात अशी मागणी होत आहे.**

शहरातील नागरिकांना नागरी सुविधा देता याव्यात,यासाठी रस्ते, बगीच्या, शाळा, दवाखाने, ग्रंथालय,सब स्टेशन, मैदान याची उभारणीसाठी प्रारूप विकास योजनेच्या माध्यमातून आरक्षण टाकले जातात.त्यानंतर विकास योजना अंतिम झाल्यानंतर टाकलेली आरक्षण हे महापालिका त्या जागेचा मोबदला देऊन जागा ताब्यात घेते. यावर्षी सुमारे ५५ कोटी रुपये इतकी रक्कम आरक्षणे ताब्यात घेण्यासाठी महापालिकेला लागणार आहेत.

परंतु आतापर्यंत जी आरक्षणे महापालिकेने टाकली आहेत आणि त्याची



रक्कम संबंधित जागा मालकाला देण्यात आली आहे परंतु या जागा महापालिकेच्या ताब्यात नाहीत.त्यांना कुंपण घातलेले नाही. शहरातील अनेक जागा काही नेते मंडळी तसेच नागरिक बेकायदेशीरपणे वापरत आहेत. महापालिकेने पैसे भरायचे आणि नेत्यांनी आणि नागरिकांनी फुकट जागा वापरायची अशी परिस्थिती झाली आहे. महापालिका प्रशासनाने अशा महापालिकांच्या जागा शोधण्याची गरज आहे.

कोट्यावधी रुपयांच्या जागा जर लोक वापरत असतील आणि त्याचा महापालिकेला पत्ताही लागत नसेल तर काय उपयोग?असे बोलले जात आहे. जनतेच्या पैशातून जागा मालकाची रक्कम भागवून ताब्यात घेतले असताना आणि त्या जागेचा वापर जर दुसऱ्या व्यक्ती करत असतील तर ही रक्कम वाया गेल्यासारखी स्थिती आहे. मध्यंतरी महापालिकेने एका खाजगी कंपनीला नियुक्त करून अशा जागांचा शोध घेण्याची सूचना केली होती परंतु त्या कंपनीने कितपत काम केले हा आता संशोधनाचा विषय बनला आहे.

**जागा कुणाची वापरतोय कोण?**

जागा महापालिकेची आणि स्वतः ची जागा असल्याचा आव काही लोक शहरात आणत आहेत.एखाद्या दुसऱ्या व्यक्तींनी त्याचा वापर केला तर आपल्या मालकीची जागा असल्याचा आव काही भागात नागरिक आणताना दिसत आहेत.त्यामुळे अशा सर्वच जागा महापालिकेने कुंपण घालून ताब्यात घ्याव्यात आणि त्यातून उत्पन्न मिळते का ? त्याचा अभ्यास करावा.असे नागरिकांतून बोलले जात आहे.

# पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांचा अचानक दौरा

## चार पोलिस ठाण्यांची तपासणी

**कोल्हापूर, ता.११ (प्रतिनिधी)–**

**जिल्हा पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी रविवारी करवीर, इस्पुर्ली, मुरगूड आणि गारगोटी या चार पोलिस ठाण्यांना अचानक भेट देत तेथील कामकाजाची पाहणी केली. त्यांच्या या अनपेक्षित दौऱ्यामुळे पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली.**

रविवारी सकाळी सुमारे अकराच्या सुमारास पोलिस अधीक्षकांचे वाहन शासकीय निवासस्थानातून बाहेर पडले. दौऱ्याची माहिती कुणालाही समजू नये, यासाठी चालक व सुरक्षा रक्षकांना त्यांनी पूर्वसूचना दिली होती. अचानक करवीर पोलिस ठाण्यात दाखल होताच तेथील अधिकारी व कर्मचारी कामाला लागले.

पोलिस अधीक्षकांनी सुमारे दोन तास ठाण्यातील विविध विभागांची तपासणी केली. रजिस्टर तपासणी, गुन्ह्यांची निर्गती, गुन्हे अन्वेषण शाखेचे कामकाज, जप्त मुद्देमाल तसेच परिसरातील स्वच्छतेचा त्यांनी आढावा घेतला. कर्मचाऱ्यांशी संवाद साधत दैनंदिन कामकाज अधिक प्रभावीपणे करण्याबाबत सूचना दिल्या.

यानंतर त्यांनी आदमापूर येथील बाळूमामा मंदिर परिसराची पाहणी केली. अमावास्येदरम्यान होणारी मोठी गर्दी लक्षात घेता दर्शनरांग, वाहनतळ आणि वाहतूक व्यवस्थेबाबत मुरगूड पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना करण्यात आल्या. मुदाळतिट्टा परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी विशेष नियोजन करण्याचे आदेश त्यांनी दिले.त्यानंतर गारगोटी आणि मुरगूड पोलिस ठाण्यांनाही त्यांनी भेट दिली. पोलिस ठाण्यातील स्वच्छता, नागरिकांशी वर्तन, प्रलंबित गुन्हे आणि कार्यालयीन कामकाजाची त्यांनी तपासणी केली. नागरिकांकडून कोणत्याही प्रकारे पैशांची मागणी केल्याचे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी कर्मचाऱ्यांना दिला. माघारी येताना इस्पुर्ली पोलिस ठाण्यालाही त्यांनी भेट देत कामकाजाचा आढावा घेतला.

पोलिस अधीक्षकांच्या या अचानक भेटींमुळे जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेत सतर्कता वाढली असून, त्यांच्या दौऱ्याची चर्चा दिवसभर पोलिस वर्तुळात सुरू होती.

# महानगरपालिकेतील इंटरनेट सेवा विस्कळित

**इचलकरंजी,ता.११–**

**महानगरपालिकेतील इंटरनेट सेवा सकाळपासून विस्कळित झाल्याने नागरिकांसह महापालिका कार्यालयांचे कामकाज मोठ्या प्रमाणात परिणाम दिसून आला.**

विशेषतः महानगरपालिकेच्या विविध विभागांतील ऑनलाईन सेवा ठप्प झाल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

महानगरपालिकेतील मालमत्ता कर, पाणीपट्टी, जन्म-मृत्यू दाखले, बांधकाम परवाने, ई-ऑफिस प्रणाली, ऑनलाईन नोंदी व इतर डिजिटल कामकाज इंटरनेट अभावी अडचणीत आले. अनेक नागरिक विविध कामांसाठी महानगरपालिकेत आले असता सर्व्हर डाऊन असल्याचे सांगण्यात येत होते.

इंटरनेट सेवा नेमकी कोणत्या तांत्रिक कारणामुळे विस्कळित झाली. याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी सेवा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, वारंवार होणाऱ्या इंटरनेट समस्येमुळे महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या कडुन व नागरिकांनी संताप व्यक्त करत संबंधित सेवा पुरवठादार व प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

# कोयता गँगची धिंड काढली

## कारवाईमुळे नागरिकांतून स्वागत

**कराड,ता.११(प्रतिनिधी)–**

**शहरात कोयत्याच्या धाकावर दहशत निर्माण करणाऱ्या टोळीला कराड शहर पोलिसांनी सोमवारी चांगलाच पोलिसी हिसका दाखवला. चार दिवसांपूर्वी एसटी स्टँड परिसरात दोन युवकांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या सात आरोपींची पोलिसांनी भरस्त्यातून धिंड काढली. या कारवाईमुळे सर्वसामान्य नागरिकांनी पोलिसांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे.**

बस स्थानक परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून सातजणांनी दोघांवर कोयत्याने हल्ला केला होता. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. कराड शहर पोलिसांच्या पथकाने त्यांचा मुंबई येथे शोध घेऊन ताब्यात घेत अटक केली. त्यानंतर सोमवारी सायंकाळी बारा डबरी परिसर, विजय दिवस चौक ते बस स्थानक मार्गावरून आरोपींची पोलिस बंदोबस्तात वरात काढण्यात आली.

या वेळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. चौकाचौकांत आरोपींना खाली बसवून पोलिसांनी कायद्याचा धाक दाखवला. ही कारवाई पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. शहरात वाढत्या कोयता गँग आणि भाईगिरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे गुंड प्रवृत्तीला मोठा इशारा मिळाल्याची चर्चा शहरभर रंगली आहे.

# चारचाकीची दुचाकीला धडक : दोघे जखमी

**सांगली, ता. ११(प्रतिनिधी )–**

**भरधाव चारचाकीने धडक दिल्याने झालेल्या दुचाकीवरील दोघेजण जखमी झाले. हा अपघात सांगलीवाडी ते लक्ष्मी फाटा दरम्यानच्या रस्त्यावर झाला. यामध्ये शशिकांत बाबुराव भोसले (वय ७४, रा. विनायक बंगला, कृष्णा हॉस्पिटलनजीक, पत्रकारनगर, सांगली) आणि त्यांचा मुलगा विनायक असे दोघे जखमी झाले.**

याप्रकरणी सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. घटनेची माहिती अशी, फिर्यादी शशिकांत भोसले आणि त्यांचा मुलगा विनायक असे दोघेजण रविवारी दुपारच्या सुमारास दुधगाव येथील महादेव मंदिराच्या दिशेने निघाले होते. सांगली - आष्टा रस्त्यावर त्यांच्या दुचाकीला (क्र. एमएच १० बीडी ५७०९) ओलांडून चारचाकी (क्र. एमएच १० एजी २२६३) पुढे जाताना त्याची धडक दुचाकीस बसली. यामध्ये दोघेजण रस्त्यावर पडले. यामध्ये शशिकांत भोसले यांना गंभीर दुखापत झाली. पोलिसांनी चारचाकी चालकावर गुन्हा दाखल केला आहे.


# प्राणघातक हल्ल्यातील युवकाचा मृत्यू

## दोघा भावंडावर खुनाचा गुन्हा

**सांगली,ता.११(प्रतिनिधी)–**

**अष्टविनायकनगर येथे उसन्या पैशावरून झालेल्या वादातून चाकू हल्ल्यातील सुरज राजु कांबळे (वय १९, रा. वारणाली रस्ता, गणेश कॉलनी, सांगली) याचा उपचार सुरू असताना सोमवारी रात्री उशिरा सिव्हिलमध्ये मृत्यू झाला. हल्ल्याप्रकरणी अटक केलेल्या निहाल रियाज रंगारी, बिलाल रियाज रंगारी (दोघे रा. गंगानगर, सांगली) या दोघा भावांवर रात्री उशिरा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.**

सुरज कांबळे हा पेव्हींग ब्लॉक बसवण्याचे काम करत होता. त्याने संशयितांकडून पैसे घेतले होते. संशयित दोघांचे चिकन दुकान आहे. शनिवारी रात्री सुरज कांबळे हा त्याचा मित्र आर्यन मड्डी याच्यासोबत दुचाकी (एमएच १० डीवाय ९८९२) वरून येत होते. त्यावेळी अष्टविनायकनगरमधील गल्ली क्रमांक ८ मध्ये रंगारी बंधू थांबले होते. दोघांनी सूरज यास हाक मारून थांबवले. उसने घेतलेल्या पैशांची मागणी केली. यावेळी शिवीगाळ होऊन वाद वाढला. संशयित निहालने सूरज याचे हात पकडले. सूरज यास संपवून टाक, असे निहाल याने म्हटले. त्यानंतर बिलाल याने कंबरेला लावलेला चाकू काढला आणि सूरज याच्या पोटात भोसकला. त्यावेळी सूरज याचा मित्र आर्यन हा पळून गेला. गंभीर जखमी होऊन सूरज पडला. तेव्हा दोघांनी त्याच्या गाडीची तोडफोड केली. नागरिकांनी जखमी सूरजला रूग्णालयात नेले. अतिदक्षता विभागात त्याच्यावर उपचार सुरू असताना सोमवारी रात्री उशिरा त्याचा मृत्यू झाला.




कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे
व्हा.चेअरमन, चार्टर्ड अकौंटंट श्री. संजयकुमार अनिगोळ यांचे वडिल
श्री. शेषाप्पा अनिगोळ यांचे रविवार दि. १०/०५/२०२६ रोजी
वयाच्या ९७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.
त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना !

कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.

संचालक, सभासद, खातेदार व सेवक वर्ग

* टिप : रक्षाविसर्जन विधी बुधवार, दि.१३/०५/२०२६ इ, रोजी सकाळी ठिक ८.०० वा. पंचगंगातीरी.

■ संपादकीय ■

# थलपती ठसा उमटवतील?

तामिळनाडूचे नवीन मुख्यमंत्री म्हणून तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) या नव्याने स्थापन झालेल्या पक्षाचे नेते आणि सुपरस्टार अभिनेता जोसेफ विजय यांनी शपथ घेतल्याने तामिळनाडूतील द्रविडी राजकारणातील एक नवा अध्याय सुरू झाला आहे. गेली अनेक दशके द्रमुक आणि अद्रमुक या दोन द्रविडी राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांच्या निवडणुकीच्या राजकारणात अडकलेला तामिळनाडू अखेर तिसऱ्या सत्ता केंद्राकडे स्थलांतरित झाला आहे. केवळ दोनच वर्षापूर्वी ज्या पक्षाची स्थापना झाली होती, तो पक्ष मोठ्या तामिळनाडूसारख्या राज्यामध्ये सत्तास्थानी येतो आणि विजयसारखा एक सुपरस्टार अभिनेता मुख्यमंत्री पदावर विराजमान होतो ही एखाद्या चित्रपटात शोभणारीच कथा असली, तरी तामिळनाडूचे राजकारण नेहमीच तेथील चित्रपटसृष्टीशी निगडित असल्याने या घडामोडीबाबत आश्चर्य वाटण्याचेही कारण नाही. गेल्या काही वर्षांपासून थलपती विजय जाणीवपूर्वक आपली प्रतिमा निर्माण करत होते आणि तमिळगा वेत्री कळघम या नवीन पक्षाची स्थापना केल्यानंतर त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने काम सुरू केले होते. त्यांच्या या नियोजनाचे त्यांना फळ मिळाले आहे. तामिळनाडूमधील जनता नेहमीच एखाद्या अन्य पर्यायाच्या शोधात होती. पण त्यांच्यासमोर द्रमुक किंवा अद्रमुक हे दोनच पर्याय होते. त्यामुळे तेथील जनता दरवेळी अलटून पालटून कौल देत होती. कधी द्रमुकचा मुख्यमंत्री तर कधी अद्रमुकचा मुख्यमंत्री हा खेळ तामिळनाडूमध्ये दीर्घकाळ खेळला जात होता. पण आता विजयच्या निमित्ताने एक तिसरा पर्याय तामिळनाडूच्या जनतेने समोर आणला आहे. आपल्या मोठ्या पडद्यावरील प्रतिमेचा उचित वापर करून विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची खुर्ची जरी काबीज केली असली, तरी राजकारण करणे सोपे नाही याची कल्पना त्यांना लवकरच येऊ शकते. कारण मुख्यमंत्री म्हणून विजय यांच्यासमोर अनेक आव्हाने असणार आहेत. मुळात तामिळनाडू विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरल्यानंतरही विजय यांना पाठिंबा मिळवण्यासाठी धडपड करावी लागली. ती पाहता आगामी कालावधीतील तामिळनाडूचे राजकारण कसे असेल याची झलक निश्चितच दिसते. या व्यतिरिक्त तामिळनाडूमधील जनतेने मोठ्या विश्वासाने विजय यांना सत्ता दिली आहे. साहजिकच विजय यांनी आपल्या जाहीरनाम्यामध्ये ज्या घोषणा केल्या होत्या किंवा जी आश्वासने दिली होती त्यांची पूर्तता करण्याचे काम आता प्राधान्याने करावे लागेल. या सर्व आश्वासनांची पूर्ती करायची असेल तर मोठ्या प्रमाणावर निधीची गरज आहे. द्रमुक आणि अद्रमुक सारखे राजकारणात मुरलेले दोन पक्ष आता विरोधी बाकांवर असल्याने विजय कशाप्रकारे काम करतात यावर त्यांचे बारीक लक्ष असणार आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विजय यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळामध्ये सर्वजण नवोदित असणार आहेत. अनेकांना प्रशासनाचा कोणत्याही प्रकारचा अनुभव नसेल. स्वतः विजय यांनासुद्धा मुख्यमंत्रिपद कसे सांभाळावे याबाबत कोणताही अनुभव नाही. साहजिकच काही काळ तरी तामिळनाडूमधील कामकाज प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानेच चालवले जाणार आहे. म्हणजेच एकीकडे जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्याचा दबाव आणि दुसरीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सत्ता राबवण्याची अपरिहार्यता यामधूनच विजय यांना आपला कारभार पुढे रेटायचा आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असली तरी त्यांना काठावरचेच बहुमत आहे. १२० जणांच्या पाठिंब्यावर त्यांनी सरकार स्थापन केले आहे आणि भारतातील गेल्या काही वर्षांमध्ये घडामोडींचा विचार करता छोट्या बहुमताच्या पाठिंब्यावर सरकार चालवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री स्टॅलिन यांचा कारभार चांगला होता आणि जनतेला त्यांच्याबाबत आदर होता.तरी सुद्धा तामिळनाडूमधील जनतेने त्यांना बाजूला केले असल्याने तामिळनाडूमधील काही लोकांमध्ये रोष आहेच. साहजिकच आपला आवडता नेता पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदावर विराजमान व्हावा असे द्रमुकच्या कार्यकर्त्यांना निश्चितच वाटत असणार. म्हणूनच सरकार चालवत असतानाच विजय यांना आपला बहुमताचा तोलही सांभाळावा लागणार आहे. ज्या छोट्या पक्षांनी विजय यांना पाठिंबा दिला आहे त्यांना कोणत्याही परिस्थितीमध्ये आपल्याशी कायम जोडून घेण्याचे काम विजय यांना करावे लागणार आहे. बाहेरून पाठिंबा घेऊन सरकार चालवणे कधीच सोपे नसते याची कल्पना निश्चितच विजय यांनासुद्धा असणार आहे. साहजिकच पाठिंबा देणाऱ्या सर्व राजकीय पक्षांना न दुखावता दुसरीकडे तामिळनाडूमधील जनतेच्या आकांक्षांची पूर्तता करतच विजय यांना हा आपला सत्तेचा गाडा हाकावा लागणार आहे. त्यांचे हे काम निश्चितच सोपे नसणार आहे. कारण त्यांच्यासमोर आव्हानांचा डोंगर आहे आणि हा डोंगर पार करूनच मुख्यमंत्री थलपती जोसेफ विजय यांना आपला ठसा उमटवावा लागणार आहे.

# निदा खानला अटक; पण...

**नाशिक शहरातील बहुचर्चित टीसीएस कंपनीतील लैंगिक शोषण आणि बेकायदेशीर धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली. या प्रकरणात एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांना सहआरोपी करण्यात आले असून निदाला आश्रय दिल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. २५ मार्चपासून फरार असलेली निदा खान सतत पोलिसांना चकवा देत होती.**

टीसीएस लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपींना मदत करणे तसेच कथित धर्मांतर कारवायांमध्ये सक्रिय भूमिका बजावल्याचा तिच्यावर आरोप आहे. अटकेनंतर विशेष तपास पथकाने तपास अधिक तीव्र केला असून या प्रकरणामागे परदेशी निधी आणि आंतरराष्ट्रीय संबंध असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. आतापर्यंत या प्रकरणात एका महिला ऑपरेशन्स मॅनेजरसह आठ जणांना अटक करण्यात आली आहे. अटकेनंतर तिला उशिरा रात्री नाशिक रोड पोलिस ठाण्यात आणण्यात आले. तिच्याकडून दोन स्मार्टफोन जप्त करण्यात आले असून या मोबाईलमधून तपासासाठी महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. न्यायालयीन सुनावणी दरम्यान फिर्यादी पक्ष, एसआयटी आणि पीडितेच्या वकिलांकडून निदा खानवर गंभीर आरोप करण्यात आले. एचआर अधिकारी म्हणून काम करताना तिने पीडितेला बुरखा आणि धार्मिक पुस्तके दिली. तसेच मोबाईलमध्ये इस्लामिक धार्मिक ॲप्स इन्स्टॉल केल्याचा आरोप आहे. हे सर्व कथित धर्मांतर प्रक्रियेचा भाग असल्याचा दावा करण्यात आला आहे.



नाशिक गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या संयुक्त पथकाने छत्रपती संभाजीनगर परिसरातील कौसर कॉलनी येथे मध्यरात्री छापा टाकून निदा खानला ताब्यात घेतले. ती आपल्या आई-वडील, भाऊ आणि आत्यासोबत त्या फ्लॅटमध्ये राहत असल्याची माहिती आहे. अटकेनंतर निदा खानला नाशिक रोड न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने तिला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील फरार मुख्य संशयित निदा खानला छत्रपती संभाजीनगरमध्ये आश्रय देण्यासाठी स्थानिक एमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांनी मदत केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी नाशिक पोलिसांनी मतीन यांना नोटीस बजावली असून त्यांचा मोबाईलही जप्त केला आहे. निदा खान गेल्या पाच दिवसांपासून छत्रपती संभाजीनगरमध्ये वास्तव्याला होती. नगरसेवक मतीन पटेल यांच्या संपर्कात आल्यानंतर तिने कुटुंबासह शहरात येण्याचा निर्णय घेतला. पटेल यांनी दोन महिन्यांपूर्वी नारेगाव येथील कौसर पार्क परिसरात एक नवीन फ्लॅट घेतला होता,जिथे निदा खानला ठेवण्यात आले होते. निदाचा शोध सुरू झाल्यावर नगरसेवक मतीन यांचे नाव समोर आले. पोलिसांनी त्यांची चौकशी सुरू केली. चार-पाच तासांच्या चौकशीनंतर अखेर मतीन यांनी निदाचा ठावठिकाणा सांगितला. मतीन पटेलला या प्रकरणात सहआरोपी केल्यानंतर राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. लव्ह जिहादला एमआयएम आणि माजी खासदार इम्तियाज जलील हे खतपाणी घालत असल्याचा आरोप पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केला. जलील यांनी हे सर्व राजकीय आरोप असल्याचे स्पष्ट केले. धर्मांतर करणे, हिंदू मुलींना फसवणे ही कामे एमआयएम इम्तियाज जलील करतात असा आरोप पालकमंत्री संजय शिरसाट यांनी केला. जलील यांनी हे आरोप फेटाळताना या प्रकरणाचा तपास नाशिक पोलिस करतात, पालकमंत्री शिरसाट नाही असे म्हटले. ते केवळ राजकारण करत आहेत. निदा खानवर धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप आहे. ती चुकीची असेल तर मी तिच्यासोबत राहणार नाही. पण, तिला यात गोवले जात असेल तर मी पूर्ण ताकदीने तिच्यासोबत असेल असे जलील म्हणाले. जलील यांनी माध्यमांवरही टीका केली. निदाचा भाऊ नाशिकमध्ये एमआयएमचा कार्यकर्ता आहे. त्याच्यामार्फत तिने मतीन पटेलशी संपर्क केला. निदा फरार झाल्याने पोलिस तिचा शोध घेत होते. ठाण्यातील मुंब्रा भागात ती असल्याची माहिती मिळाली होती परंतु पोलिस तेथे पोहोचेपर्यंत ती पुन्हा पसार झाली होती. ४० दिवसांहून अधिक काळ तिने पोलिसांना गुंगारा दिला होता. २५ मार्च रोजी गुन्हा दाखल झाल्यापासून निदा खान फरार होती. या काळात तिने मुंब्रा, मुंबई आणि भिवंडी सारख्या संवेदनशील भागात आश्रय घेतल्याची माहिती आहे. हा आश्रय कोणी दिला आणि ती कोणाकोणाच्या संपर्कात होती याचा शोध पोलिस घेत आहेत. मतीन पटेलची ओळख कशी झाली आणि या प्रकरणात मालेगाव किंवा मलेशियामधून काही आर्थिक रसद पुरवली जात होती का? या दिशेनेही एसआयटीचा तपास राहणार आहे. निदा खानवर पीडित तरुणी आणि महिलांचा मानसिक छळ करणे, महिलांवर लैंगिक अत्याचार होत असताना बघ्याची भूमिका घेऊन कटात सहभागी होणे, असे गंभीर आरोप आहेत.धार्मिक भावना दुखावून ॲट्रॉसिटी कायद्यानुसार तिच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपी शाहरूख कुरेशी आणि रझा मेमन यांच्याशी मिळून तिने हे षडयंत्र रचल्याचे तपासात आढळून आले आहे.

दैनंदिनी

आतापर्यंत आपण केवळ 'लव्ह जिहाद' ऐकत होतो, मात्र आता 'कॉर्पोरेट जिहाद' नावाचा हा नवा आणि अतिशय धोकादायक प्रकार समोर आला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) आमदार संग्राम जगताप यांनी केला आहे.नाशिक येथील धर्मांतर प्रकरणात 'एमआयएम' चे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी उडी घेतली आहे. त्यांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिची जोरदार पाठराखण केली असून हे संपूर्ण प्रकरण द्वेषभावनेतून रचलेले असून सुशिक्षित मुस्लिम तरुण-तरुणींना विनाकारण त्रास देण्यासाठी हा बनाव रचण्यात आल्याचा आरोप केला आहे.या प्रकरणातील तक्रार सत्ताधारी पक्षातील नेत्याने दाखल केल्याकडे लक्ष वेधून, ओवेसी यांनी यामागे राजकीय हेतू असल्याचे संकेत दिले.



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावी व दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४. १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे.लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे.**

# सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश

## दहावी,बारावी परिक्षेत निकालाची टक्केवारी घसरली


लातूर विभाग टक्केवारीत सर्वांच्या मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते.यावर्षी बारावीचा निकाल का घसरला? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले.कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टक्क्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपीला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपीवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा. कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका एआयच्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८०टक्के इतके आहे.केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली.दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे. याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे.

■ श्याम ठाणेदार


# देशभरात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोने नुकताच भारतातील गुन्हेगारी २०२४ हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार, २०२४ मध्ये देशभरात एकूण ५८.८५ लाख गुन्ह्यांची नोंद झाली, जी २०२३ मधील ६२.४१ लाख गुन्ह्यांच्या तुलनेत ६ टक्क्यांनी कमी आहे. देशात प्रति एक लाख लोकसंख्येमागील गुन्ह्यांचे प्रमाण ४४८.३ वरून कमी होऊन ४१८.९ पर्यंत खाली आले आहे. महिलांवरील गुन्ह्यांमध्येही १.५ टक्के घट नोंदवली गेली. २०२४ मध्ये महिलांवरील ४.४१ लाख गुन्हे नोंदवले गेले, तर २०२३ मध्ये ही संख्या ४.४८ लाख होती. मात्र देशातील एकूण गुन्हे घटले असले तरी सायबर गुन्ह्यांमध्ये १७.९ टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. २०२४ मध्ये देशभरात एकूण १ लाख १ हजार ९२८ सायबर गुन्हे नोंदवले गेले. २०२३ मध्ये ही संख्या ८६ हजार ४२० इतकी होती. सायबर गुन्हेगारीचा दर प्रति १ लाख लोकसंख्येमागे ६.२ वरून ७.३ पर्यंत वाढला आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये आर्थिक फसवणूक हे सर्वात मोठे कारण असून, एकूण प्रकरणांपैकी ७२.६ टक्के (७३९८७ प्रकरणे) ही आर्थिक फसवणुकीशी संबंधित आहेत. तर लैंगिक शोषण (३.१ टक्के) आणि खंडणी (२.५टक्के ) ही सायबर गुन्ह्यांची इतर कारणे आहेत. देशातील महानगरांमध्ये बेंगळुरू (१७५६१ प्रकरणे) सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत अव्वल स्थानी असून, त्यापाठोपाठ मुंबई (४९३९ प्रकरणे) दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर हैदराबाद आणि दिल्ली ही शहरे आहेत. तर तेलंगणा आणि कर्नाटक ही राज्ये सायबर गुन्हेगारीत हॉटस्पॉट ठरली आहेत.या अहवालानुसार गुन्हेगारीचा कल आता तंत्रज्ञानावर आधारित सायबर गुन्हेगारीकडे झुकलेला दिसून येत आहे.



■ प्रदीप मोरे

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**मंगळवार, ता.१२.५.२०२६,**विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभवनाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो, वैशाख मासे, कृष्ण पक्षे, दशमी तिथी, १४.५३ नंतर एकादशी तिथी, पूर्वा भाद्रपदा नक्षत्र, २५.१८ नंतर उत्तरा भाद्रपदा नक्षत्र, कुंभ रास, १९.२५ नंतर मीन रास, वैधृतीयोग,२३.२० नंतर विष्कंभयोग, विष्टीकरण,१४.५३ नंतर बव करण २६.१८ पर्यंत, दिनमान १२.४५ ,सुर्योदय ६.०७,सुर्यास्त १८.५२(कोल्हापूरचे)राहू काळ दुपारी ३ ते ४.३०,संतश्रेष्ठ मुक्ताबाई पु.दि.एदलाबाद, भद्रा,१४.५३ पर्यंत घबाड १४.५३ पर्यंत

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष-** गेल्या बऱ्याच काळापासून कामाच्या ताणामुळे तुमच्या वैवाहिक आयुष्यावर परिणाम होत होता. पण आज या सगळ्या तक्रारी दूर होतील.

**वृषभ-** व्यापारात मजबुती येण्यासाठी तुम्ही आज काही महत्वाचे पाऊल उचलू शकतात यासाठी तुमचा कुणी जवळचा तुमची आर्थिक मदत करू शकतो.

**मिथून-** तुमच्यापैकी काही जण दूरच्या प्रवासासाठी रवाना व्हाल.त्यामुळे तुम्हाला दगदग होईल, त्यामुळे खूप फायदाही होईल. तुमच्या वैवाहिक आयुष्यात आनंदीआनंद आहे.

**कर्क-** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप उत्तम राहणार आहे. आज तुम्हाला आपल्यासाठी पर्याप्त वेळ मिळेल. संततीसौख्य लाभेल.घरगुती वातावरण चांगले राहील.

**सिंह-** आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल.तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. आर्थिक आघाडीवरील सुधारणा महत्त्वाच्या ठरतील.

**कन्या-** दूरस्थ ठिकाणाहून एखादी चांगली बातमी संध्याकाळी उशिरापर्यंत येण्याची शक्यता आहे. तुमच्या नेहमीच्या दिवसापेक्षा आजचा दिवस हा वैवाहिक आयुष्यातील वेगळा दिवस असेल.

**तुळ-** महत्त्वाच्या कामाची फाईल सर्व बाबतीत चोख आणि परिपूर्ण असल्याची तुम्हाला खात्री असल्याशिवाय वरिष्ठांच्या हाती सोपवू नका.एकमेकांसोबत वेळ घालवा.

**वृश्चिक-**कलात्मक क्षेत्रातील लोकांना आजचा दिवस यशदायी ठरेल. बऱ्याच काळापासून ते वाट पाहात असलेली किर्ती आणि मान्यता त्यांना मिळेल.

**धनु-** कला व नाट्य क्षेत्रांशी संबंधित व्यक्तींना नवीन संधी मिळतील आणि त्यांना त्यांची कलात्मकता उत्कृष्टपणे दाखविता येईल. घरगुती वातावरण आनंदी राहील.

**मकर-**आपल्या व्यवसायात स्थिरस्थावर झालेल्या अनुभवी लोकांशी जवळीक साधा,ते तुम्हाला भविष्याची दिशा दाखवतील.मानसिक ताणतणाव कमी होईल

**कुंभ-** दिवस कसा चांगला बनवला जाईल यासाठी तुम्हाला स्वतःसाठी वेळ काढावा लागेल. आजचा दिवस तुमच्या वैवाहिक आयुष्यातील एक उत्तम दिवस असेल.

**मीन-**आज तुम्ही एकदम शांततेत राहाल आणि मौजमजा करण्याचा तुमचा मूड बनेल. या राशीतील विवाहित जातकांना आज सासरच्या पक्षाकडून धन लाभ होण्याची शक्यता आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

# मुख्यमंत्री विजय यांनी कार्यकाल पूर्ण करावा

देशातील पाच राज्यातील विधानसभेतील राज्याचे निकाल हाती येऊन सत्ता स्थापनेचा शपथविधी देखील झाला पण सुरूवातीस दक्षिणेकडील तामिळनाडू राज्यांचा मुख्यमंत्री ठरेना कारणही त्याला तसेच होते. राज्यातील टिव्हीके पार्टीचे संस्थापक तथा सर्वेसर्वा दक्षिणेकडचा सुपरस्टार हिरो, अभिनेता जोसेफ व्ही म्हणजेच जोसेफ विजय चंद्रशेखर यांनी विधानसभेच्या शंभर पेक्षा अधिक जागा जिंकून देखील सत्ता स्थापनेसाठीचा मॅजिक आकडा त्यांना गाठता आला नव्हता. काँग्रेसचा पाठिंबा घेऊन तामिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून जोसेफ विजय यांनी शपथ घेतलेली आहे. जनतेत प्रचंड उत्साह आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. दोन वर्षापूर्वीच त्यांनी एक अभिनेता ऐवजी एक राजकीय नेत्याची खरोखरीच भूमिका करायची ठरवले होते. मुख्यमंत्री जोसेफ व्ही हे करोडपत्ती असून एक नामांकित उद्योजक देखील आहेत आणि आता राज्याचे मुख्यमंत्री आहेत. तामिळनाडू मधील जनता चित्रपट शौकिन आहेत. तिथे यापुर्वी देखील चित्रपट श्रेत्रातील लोकप्रिय अभिनेता आणि अभिनेत्री यानी जनतेच्या मनावर राज्य केले आहे. मुख्यमंत्री जोसेफ व्ही यांनी पक्का राजकारणी असल्याचे दाखवत निवडणूकीपुर्वी महिलांना अनेक आश्वासने दिली आहेत. तेव्हा ती सर्व आश्वासने पूर्ण करत त्यांनी आपला मुख्यमंत्री पदाचा टर्म पूर्ण करायला हवा, असे वाटते.



■ संजय साळगांवकर

# मराठी भाषेतील अपयश चिंताजनक

महाराष्ट्रातील इयत्ता दहावीचा निकाल नुकताच लागला.या परीक्षेत मराठी या विषयात तब्बल ९४ हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले ही बातमी वाचून आश्चर्य वाटले मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असताना हे अपयश का बरे व्हावे? याला पालकांची बदलती मानसिकता कारणीभूत आहे.शासकीय अनास्थासुद्धा मराठीच्या अपयशाला कारणीभूत आहे . विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वी सुमारे ४० हजार विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले होते आता ते प्रमाण ९४ हजारावर गेले आहे.परख या केंद्र सरकारच्या अहवालात महाराष्ट्राला आठवा क्रमांक मिळाला आहे महाराष्ट्राची शिक्षणाबद्दलची एकूणच आस्था या मधून दिसून येते .सध्या पालक आपल्या पाल्याला इंग्रजी शाळेत घालतात. काही पालक घरात तुटपुंजे इंग्रजी बोलतात. साहजिकच विद्यार्थी मातृभाषेपासून मागे जात आहेत पालकांनी मुलांना मराठीचे अवांतर वाचन, वृत्तपत्रे वाचन याची सवय लावली पाहिजे घरी मराठी बोलले पाहिजे. तरच त्यांच्या मराठीत प्रगती होईल सरकारने या बाबतीत एक खास प्लॅन तयार केला पाहिजे व प्रत्येक शाळेत मराठी विषय शिकविणारे शिक्षक अत्यावश्यक करावयास पाहिजेत. मराठी भाषा शिकून आपण स्पर्धेत टिकू शकत नाही अशा स्वरूपाची मानसिकता तसेच मराठीमुळे रोजगार व विदेशी शिक्षणाची संधी मिळणार नाही अशा स्वरूपाची शिकवण मुलांच्या मनावर बिंबविली जात आहे सरकारने यात खास लक्ष घालून मातृभाषा मराठीत मुलांना अधिक गोडी कशी लागेल हे पहिले पाहिजे.



■ शांताराम वाघ

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# निपाणी शहराला ८ दिवसाआड पाणीपुरवठा

## पाणीटंचाईचे संकट अधिकच गडद;पातळी ३४ फुटांपर्यंत खालावली

निपाणी,ता.११(प्रतिनिधी)–

**शहरास पिण्याचे पाणीपुरवठा करणाऱ्या जवाहरलाल तलावाची पाणी पातळी ३४ फुटापर्यंत खालावली आहे.त्यामुळे नगरपालिका शहर व उपनगराला ८ दिवसांतून एक वेळ पाणीपुरवठा करत आहे.त्यामुळे निपाणी शहरावर आतापासूनच पाणी टंचाईचे संकट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत तलावाच्या पाणीपातळीत वाढत्या उन्हामुळे घट होत चालली आहे. सध्या तलावात ३४ फूट पाणी असून नागरिकांनी जपून पाणी वापरणे हाच पर्याय शिल्लक राहीला आहे.**



निपाणी शहराला पाणी पुरवठ्यासाठी एकमेव पर्याय म्हणून जवाहरलाल नेहरू तलाव हा एकमेव तलाव आहे. शहराचा संपूर्ण भार या तलावावर पडत असल्याने पाणीटंचाईचे संकट निपाणीवर आले आहे.४६ फूट इंच पाणी पातळीची क्षमता असलेल्या तलावात ३४ फूट पाणी असून १८ ते २० फूट गाळ आहे.त्यामुळे वापरण्यात येणारे पाण्याचे प्रमाण कमी असल्याने पुढील काही दिवसात भीषण पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच निपाणीकरांनी पाणी जपून वापरणे हा एकमेव उपाय आहे.त्यासाठी उपलब्ध कूपनलिका व इतर सुविधा सुरू करून पाणीटंचाईवर मात करणे गरजेचे आहे.

निपाणी नगरपालिकेत प्रशासकीय राजवट असल्याने लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे शहराचा सर्वांगिण प्रश्न लक्षात घेवून राजकारण विरहीत लक्ष पाणी पुरवठ्याकडे देणे गरजेचे आहे.शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जवाहरलाल तलावाची ४६ फूट १ इंच इतकी पाणी क्षमता आहे.तलाव गेली तीन वर्षे ओवरफ्लो झाला.वाढत्या उन्हामुळे दररोज १ ते दिड इंच इतकी पाणीपातळी कमी होत आहे.त्यामुळे पालिका प्रशासनासमोर चिंतेचे ढग निर्माण झाले आहेत. सध्या पाणी बचत करण्याच्या हेतूने पालिका प्रशासनाने ५ दिवसाआड होणारा पाणीपुरवठा बंद करून ८ दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला आहे. शहरात १९५०० नळ कनेक्शन झाले आहेत.

### मान्सून सक्रिय होण्याची अपेक्षा

गतवर्षी १२ मेपासून पावसाला सुरुवात झाली होती. त्यामुळे मे महिन्यात तलावात ३९.४ फूट पाणी होते. जून महिन्यात तलाव ओसंडून वाहू लागला होता.पाणलोट क्षेत्रातील शिरगुप्पी परिसरातील ओढ्यातून पावसाळ्यामध्ये जवाहर तलावात पाणी येते.गतवर्षी जूनमध्ये पाणीपातळी ४६ फूट सहा इंचावर गेली होती.यावर्षी मे महिन्यात तलावातील पाणीपातळी झपाट्याने खालावली आहे. त्यामुळे सर्वांना लवकर मान्सून सक्रिय होण्याची अपेक्षा आहे.

# फिरत्या आरोग्य गाडीतून कामगारांना मिळतेय सुविधा

## निपाणी, चिकोडी,हुक्केरी तालुक्यातील १४ हजार बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी

कारदगा,ता.११(प्रशांत कांबळे)

**कर्नाटक राज्य सरकार व बांधकाम कामगार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या फिरत्या मोफत आरोग्य तपास गाडीद्वारे निपाणी, चिकोडी, हुक्केरी तालुक्यातील सुमारे १४ हजार १५७ कामगारांची आरोग्य तपासणी करुन त्यांचे आरोग्य ठणठणीत ठेवण्यासाठी राज्य सरकारने स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.**

कर्नाटक राज्य सरकारकडून बांधकाम (क्ब्ड)क्षेत्राशी निगडित असणाऱ्या कामगारांच्या आरोग्य तपासणीसाठी गावोगावी फिरते वातानुकूलित व सर्व सुविधा असलेले आरोग्य सेवा वाहन सुरू केले आहे. निपाणी, चिकोडी,हुक्केरी तालुक्यातील नोंदणी केलेल्या व कामगार ओळख पत्र असणाऱ्या बांधकामाची, बीपी, शुगर, रक्त तपासणी व जनरल चेकअप, करुन कामगारांचे आरोग्य सुधारण्यासाठी शासन व कामगार खात्याने हि अभिनव योजना सुरू केली आहे.प्रत्येक गावात महिन्यातून एक दिवस हि सुविधा सुरू आहे.गेल्या वर्षभरापासून या तिन्ही तालुक्यातील सुमारे १४ हजार १५७ कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली



बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करताना डॉ.मेघा सप्तसागर.

आहे.मोठ्या शस्त्रक्रिया व आरोग्य समस्येसाठी पुढील उपचारासाठी मोठ्या दवाखान्यात पाठवण्याची सोय आहे.त्याचबरोबर कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती, मुलांच्या लग्नासाठी धन सहाय्य, घरे कर्ज इत्यादी सुविधा देवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. राज्य शासनाने सुरू केलेली ही अभिनव योजना कामगारांच्या रोगाचे निदान व आरोग्याची चांगल्या प्रकारे काळजी घेवून त्यांना आरोग्याबद्दल सतर्क केले जात आहे.

एक एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी, एक औषध अधिकारी,एक रक्त व इतर चाचणी करणारे ,एक जीएन एम ब्रदर व एक ए एन एम नर्स, एक गाडीचा चालक, असे आरोग्य पथक गाडीत असणार आहेत. त्यामुळे रुग्णांच्या रोगाचे अचूक निदान करून त्यांच्यावर उपचार करण्यात येणार आहेत.

याबाबत बोलताना डॉ. मेघा सप्तसागर म्हणाल्या,राज्य सरकारने बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीसाठी हि फिरती गाडी सुरू केली आहे.या वाहनात रुग्णांची तपासणी करून योग्य औषधोपचारासह कामगारांची विशेष काळजी घेतली जात आहे राज्य सरकार व कर्नाटक बांधकाम कामगार मंडळ यांच्या वतीने हा उपक्रम राबविला जात आहे.त्यामुळे नोंदणी व ओळखपत्र असलेल्या कामगारांनी या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे सांगितले.निपाणी कामगार सिटू संघटनेचे, तालुका सदस्य अनिल कांबळे म्हणाले,बांधकाम कामगारांच्या बरोबरच असंघटी कामगारांनाही या योजनेमध्ये समाविष्ट करून घेऊन या आरोग्य सुविधाचा लाभ मिळवून देणे गरजेचे आहे.

## बेडकिहाळात श्री मारुती-अंबाबाई मूर्तीची प्रतिष्ठापना

बेडकिहाळ,ता.११(वार्ताहर)–

**येथील गांधी चौक परिसरातील मारुती मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत असून, नूतन निर्माण करण्यात आलेल्या मंदिरात शिवबसव महास्वामीजी –खडकलाट यांच्या दिव्य सानिध्यात मंदिरात दोन्ही मूर्तींची प्राण प्रतिष्ठापना करण्यात आली.**

सकाळी वास्तु पूजा, नवग्रह होम, शांती होम आदी धार्मिक विधी कार्यक्रम शिवानंद स्वामी यांच्या पौरोहित्याखाली करण्यात आले. होम विधी विधान पुष्कराज व हर्षदा पाटील,तसेच किशोर व भावना इनामदार दंपतींच्या हस्ते करण्यात आले. सकाळी ९ वाजता दोन्ही नूतन मूर्तींची भंडाऱ्याच्या उधळणीत भव्य मिरवणूक काढण्यात आली. तर दोन्ही मूर्ती मंदिरात आल्या नंतर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.प.पू शिवबसव महास्वामीजी यांनी मूर्तींची प्रतिष्ठापना केली.

# समाजस्वास्थ्यासाठी वारकरी संप्रदायाचे योगदान अलौकिक

## नाम.हसन मुश्रीफ; निढोरीत सद्गुरू बापूमहाराज तळाशीकर यांच्या तैलचित्राचे अनावरण

मुरगूड,ता.११(प्रतिनिधी)–

**वारकरी संप्रदायाने भक्तीतून समता बंधूता,प्रेम देत सात्विक समाज घडवत आहे.हा संप्रदाय अध्यात्मिक मार्गाबरोबरच समाजाला दिशा देणारा भक्कम सामाजिक आधार आहे. समाजस्वास्थ्यासाठी वारकरी संप्रदायाचे योगदान अलौकिक आहे,असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.**

ते निढोरी (ता.कागल) येथे बापूमहाराज तळाशीकर ट्रस्ट व विनायक साधक आश्रम व रामनवमी सप्ताह मंडळ आयोजित व्यक्तिमत्व विकास संस्कार शिबीर सांगता व कोल्हापूर जिल्ह्याचे वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक



निढोरीत सद्गुरू बापूमहाराज तळाशीकर यांच्या तैलचित्राचे अनावरण करताना मंत्री हसन मुश्रीफ शेजारी इतर मान्यवर.

सद्गुरू बापूमहाराज तळाशीकर यांच्या तैलचित्र अनावरण कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमासाठी मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुआप्पा देसाई, जि.प.सदस्या शोभाताई फराकटे, जि.सदस्य अरुण जाधव तळाशीकर,राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष मधुकर जांभळे,मनोज फराकटे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

नाम.मुश्रीफ यावेळी पुढे म्हणाले,आम्ही आयुष्यभर पुरोगामी विचारानेच काम करत आलो आहे.अध्यात्म आणि वारकरी संप्रदायावर मनापासून प्रेम केले आहे. सद्गुरू बापू महाराज तळाशीकर ट्रस्टच्या इमारतीला देखील लवकरच भरीव निधी देऊ, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. यावेळी बोलताना दलितमित्र एस.आर. बाईत म्हणाले ,सध्या या समतावादी वारकरी संप्रदायावर विविध वैचारिक प्रहार होत आहेत. आमच्या आदर्शच्या विचाराची मोडतोड करण्याचे षडयंत्र सुरू आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायाचे लोक अस्वस्थ व चिंतेत आहेत. या संप्रदायाने समाजाचे शुद्धीकरण करून वारकरी संप्रदायाची गुणवत्ता वाढवली पाहिजे.जि.प.सदस्या शोभाताई फराकटे यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक हभप उद्धव महाराज यांनी केले.प्रारंभी सद्गुरू बापू महाराज तळाशीकर यांच्या तैलचित्राचे अनावरण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमात मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधू आप्पा देसाई,ह.भ.प.नारायण एकल, जि.प.सदस्य अरुण जाधव, शोभाताई फराकटे, रामभाऊ खराडे, शिवाजीराव वाघवेकर, ह. भ. प. अरुण तोरस्कर यांच्यासह विद्यार्थीनी सई जोंधळे, विराज राजिगरे, श्रीराज सुतार, रणजीत चौगले यांची भाषणे झाली. कार्यक्रमास निढोरीच्या सरपंच शुभांगी सुतार, मनोज फराकटे, केशवकाका पाटील, सुरेशआण्णा सुर्यवंशी, उपसरपंच विठ्ठल पाटील, उद्योजक एकनाथ कमळकर, बोरवडेचे माजी सरपंच कुंभार,अमित पाटील आदिंसह वारकरी संप्रदायातील लोक,विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## थोडक्यात

### नानीबाई चिखलीत महालक्ष्मी देवीच्या यात्रेची उत्साहात सांगता

ना.चिखली ,ता.११(वार्ताहर)–

**लक्ष्मीच्या नावानं चांगभलं या गर्जनाने व सनईच्या आवाजाने गुलालाची उधळण करीत नानीबाई चिखली येथील महालक्ष्मी यात्रेची सांगता उत्साहाने झाली.**

ता.५ मे रोजी महालक्ष्मीची स्थापना करण्यात आली.गावातील महिलांनी व आलेल्या माहेरवाशींणीकडून महालक्ष्मीची ओटी भरणे, पुरण पोळीचा नैवेद्य अर्पण करण्यात आला.बुधवारी ता.६ रोज रात्री करमणुकीचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.ता.७ मे रोजी महालक्ष्मी यात्रेची मिरवणुकीने सांगता करण्यात आली. यात्रेतील भाविकांसाठी ठिकठिकाणी पाण्याची सोय करण्यात आली होती. महिलावर्गांनी महालक्ष्मीच्या स्वागतासाठी मिरवणुकीच्या मार्गावर रांगोळी काढून गावाला सुशोभित केले होते.यात्रेमध्ये ६० लाखांची उलाढाल झाली.महालक्ष्मी यात्रा कमिटीने योग्य ते नियोजन केल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

### बोरगावातील शांतीसागर सोसायटीस ४ लाख ८२ हजाराचा नफा–जंगटे

बोरगाव,ता.११(प्रतिनिधी)–

**येथील आचार्य श्री १०८ शांतीसागर को–ऑप सोसायटीला मार्च २०२६ अखेर ४ लाख ८२ हजार रुपयांचा ढोबळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, हालशुगरचे संचालक शरद जंगटे यांनी दिली.**




बोरगाव येथील संस्थेच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जंगटे म्हणाले की, संस्थेने पारदर्शक व शिस्तबद्ध कारभार करत ठेवीदारांचा विश्वास संपादन केला आहे. चालू आर्थिक वर्षात संस्थेचे भाग भांडवल १३ लाख ९९ हजार ६५० रुपये, ठेवी १० कोटी ६४ लाख ४० हजार ६५८ रुपये, गुंतवणूक ३ कोटी ८८ लाख ९८ हजार ६१८ रुपये, तसेच विविध बँक, संस्था यामध्ये बचत व चालू खात्यावरील शिल्लक ६२ लाख ६३ हजार ६४६ रुपये,कर्जवाटप ६ कोटी ४९ लाख १८ हजार ४२५ रुपये, अहवाल सालात मार्च २०२६ अखेर ४ लाख ८२ हजार इतका ढोबळ नफा झाला असून वास्तविक निव्वळ नफा ३ लाख ४६ हजार ६९९.४० रु झालेला आहे. संस्थेची मुख्य कार्यालयसह मानकापूर येथे एक शाखा कार्यरत आहे.पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष राजशेखर हिरेमठ, संचालक शीतल अम्मनावर, डॉ.महावीर बंकापुरे, सुनिल गोरवाडे, अक्षय चौगुले, अर्जुन हुडेद,प्रकाश पाटील,धवल भिवरे, भूपाल महाजन, पद्मश्री जितू पाटील,भारती सातपुतेसह कर्मचारी उपस्थित होते.

### १२ गावांमध्ये बसथांबे नसल्याने प्रवाशांची गैरसोय

निढोरी,ता.११(वार्ताहर)–

**निपाणी फोंडा–देवगड या महत्वपूर्ण राज्य महामार्गावरील १२ गावामध्ये बसथांबे नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.बस थांबा निवारा शेडच्या मागणीसाठी ग्रामपंचायत निढोरीकडून मंत्री हसन मुश्रीफ यांना निवेदन दिले आहे.**



यापुर्वी बसथांबा निवारा शेड एस.टी महामंडळाच्यावतीने काही ठिकाणी करण्यात आले होते.तर नागरिकांच्या मागणीनुसार मंत्री हसन मुश्रीफ यांनी गावोगावी निवारा शेडची उभारणी आमदार फंडातून केली होती. मात्र महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणामुळे उभारण्यात आलेले बस थांबा निवारा शेड काढण्यात आले.वास्तविक रस्ता बांधकाम करणाऱ्या ठेकेदाराने महामार्गावरील गावात सुरक्षित ठिकाणी प्रवासी नागरिकांना शेड उभारणी करून देणे गरजेचे होते.मात्र निवारा शेड अभावी १२ गावे गेल्या दहा वर्षांपासुन प्रतिक्षेत आहेत. ऊन,वारा,पाऊस यांची सुरक्षा नसल्यामुळे प्रवाशांना तासन्तास ताटकळत रस्त्याकडेला उभे रहावे लागत आहे.ठेकेदाराचे काम झाले, दिमाखात लालपरीच्या फेऱ्या वाढल्या आहेत. अर्ध्या तिकीटावर लाडक्या बहिणी देवदर्शन आणि सहलीसाठी निघाल्या खऱ्या, मात्र प्राथमिक पायाभूत सुविधा म्हणून शासनाचे दुर्लक्ष झाल्याने आतातरी लोकप्रतिनिधींनी काळजी पूर्वक लक्ष देऊन प्रवाशी बस थांबा होण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा मागण्या सर्वत्र होत आहेत.

**बसथांबा निवारा शेड नसलेली गावे पुढीलप्रमाणे**

निढोरी, मुदाळतिट्टा, शिंदेवाडी, यमगे, सुरुपली, कुरुकली, सोनगे, बस्तवडे, हमिदवाडा, खडकेवाडा, लिंगनूर, कुरणी.

# खरी कॉर्नर उड्डाणपुलाच्या कामामुळे वाहतूक कोंडीत वाढ

निपाणी,ता.११(प्रतिनिधी)–

**शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी खरी कॉर्नरवर हाती घेण्यात आलेल्या नवीन उड्डाणपुलाचे काम आता वाहनधारकांसाठी डोकेदुखी ठरू लागले आहे.या कामामुळे रस्ते अरुंद झाले असून, गेल्या काही दिवसांपासून या परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. संध्याकाळची परिस्थिती अधिकच गंभीर होत आहे.**

**नागरिकांची गैरसोय**



निपाणी: पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर वाहतूकीची झालेली कोंडी.

पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील खरी कॉर्नरवर उड्डाणपूलाचे काम सुरू आहे.त्यामुळे या मार्गावरील वाहतूक गेल्या ३ ते ४ महिन्यापासून बंद करण्यात आली आहे. त्यामुळे महात्मा गांधी हॉस्पिटलसमोरून वाहतूक वळविण्यात आली आहे. पूर्वीचा प्रशस्त रस्ता आता अत्यंत अरुंद झाला आहे. अवजड वाहने आणि बस या मार्गावरून जाताना रस्ता पूर्णपणे ब्लॉक होतो,परिणामी दुचाकी आणि चारचाकी वाहने अडकून पडतात.या मार्गावर फळांचे गाडे आणि रस्त्यात उभा राहिलेल्या गाड्या यामुळे निपाणीच्या दक्षिण बाजूला जाणाऱ्या लोकांची प्रचंड गैरसोय होत आहे.या कोंडीचा सर्वाधिक फटका डोंगर भागातील कामावर जाणाऱ्या नोकरदारांना आणि शाळा–महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना बसत आहे.या भागात अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासह उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला कामाचा वेग वाढवण्याच्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे साहित्य हटवण्याच्या सूचना देण्याची मागणी होत आहे.उड्डाणपूल भविष्यासाठी फायदेशीर असला, तरी त्याचे काम सुरू असताना होणारा त्रास कमी करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

## भावेश्वरी ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेस १३ लाखाचा नफा- देसाई

से.कापशी,ता.११(वार्ताहर)–

**सेनापती कापशी येथील श्री. भावेश्वरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था संस्थेची यशस्वी वाटचाल चालू असून या वर्षात १३ लाख २० हजार ७३२ रुपयांचा नफा झाला आहे.संस्थेत नवनवीन योजना राबवून संस्थेने लोकांचा विश्वास संपादन केला असल्याचे मत संस्थेचे चेअरमन मुस्ताक देसाई यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले**

देसाई पुढे म्हणाले, २०२२ पूर्वी असणाऱ्या संचालक मंडळाने या संस्थेचा कारभार अनागोंदी केलेला होता.संस्था तोट्यात असताना सुद्धा फायद्यात असल्याचे दाखवून सभासदांची तसेच इतरांची फसवणूक केली होती. संस्था अंदाजे २८ लाखच्या आसपास तोट्यात होती.मात्र २०२२ नंतर नवीन संचालक मंडळ आले.तीन ते चार वर्षाचा कालावधी पूर्ण करून संस्था मागील तोटा वजा जाता १० लाख ५८ हजारच्या आसपास निव्वळ नफा झाला. सध्या संस्थेचा कारभार काटकसरीचा व पारदर्शक चालू आहे. संस्थेकडे ठेवी ६ कोटी ३७ लाख ४१ हजार, पिग्मी ठेव ९४ लाख ४४ हजार गुंतवणूक ४ कोटी ६९ लाख ३७०००, कर्ज वाटप २ कोटी १७ लाख ८० हजार इतके असून संस्थेकडे आज अखेर शुन्य टक्के एनपीए आहे. कोणतेही थकीत प्रकरण नाहीत.या संस्थेस कागल पंचायत समितीचे माजी सदस्य व कापशीचे नेते शशिकांत खोत, चेअरमन, व्हाईस चेअरमन यांचे मार्गदर्शन लाभले असल्याचे सांगितले. यावेळी शशिकांत खोत, सुनील चौगुले, सुनील घोरपडे, चंद्रकांत लट्टे, बाळासाहेब नायकवडी, बाळासो हणंबर, प्रशांत पाटील, गोविंद म्हाळुकर आधी उपस्थित होते.

## पट्टणकोडोलीत हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता


पट्टणकोडोली,ता.११(प्रतिनिधी)–

**श्री क्षेत्र पट्टणकोडोली (ता. हातकणंगले) येथील श्री विठ्ठल–बिरदेव देवस्थानतर्फे श्री बिरदेव जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल–बिरदेव मंदिरामध्ये सोमवार ता.२७ एप्रिल ते मंगळवार ता.५ मे अखेर श्री तुकाराम महाराज गाथा, श्री विठ्ठल–बिरदेव महात्म्य ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात पार पडला.**

या सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी श्री विठ्ठल–बिरदेव महात्म्य ग्रंथ व श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण, ११ ते दुपारी १२.३० प्रसाद, ३ ते ५ श्री विठ्ठल–रुक्मिणी महिला भजनी मंडळ रुई, इंगळी, हुपरी, पट्टणकोडोली यांचा भजनाचा कार्यक्रम, ५ ते सायंकाळी ६.३० हरिपाठ, ६.३० ते ७.३० प्रवचन, ७.३० ते रात्री ८ आरती, ८ ते १० किर्तन, १० ते ११ प्रसाद,११ ते पहाटे ३ हरिजागर व भजन असे कार्यक्रम पार पडले.

# 'आनंद फाऊंडेशन' अनेकांच्या जीवनात आनंद फुलवणारी संस्था

निपाणी तालुक्यातील कोगनोळीपैकी हणबरवाडी गावचे सुपुत्र,कोगनोळी श्री दत्तगुरु क्रेडिट सौहार्द सहकारी संस्थेचे संस्थापक चेअरमन सचिन आनंदा खोत आणि कार्याध्यक्ष निलेश आनंदा खोत यांच्या प्रयत्नातून साकारलेल्या आनंद फाऊंडेशनने अल्पावधीमध्ये समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देऊन खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. अनेकांच्या जीवनात त्यांनी आनंद फुलविला आहे. या समाजाभिमुख आनंद फाऊंडेशनच्या कार्याविषयी...



सचिन खोत व निलेश खोत या बंधूंनी २७ ऑगस्ट २०१९ रोजी आपल्या वडिलांच्या नावे आनंद फाऊंडेशनची मुहूर्तमेढ रोवली.त्यांचे आजोबा गुंडू विठोबा खोत हे कोगनोळी पंचक्रोशीत दानशूर व्यक्तीमत्व म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचाच वारसा आणि वसा खोत बंधूंनी संस्थेच्या माध्यमातून पुढे चालविला आहे. घरचा वारसा आणि वसा व्यापारी सहकारातून जोडलेल्या माणसांना संघटित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. आजोबांच्या पावलावर पाऊल ठेवून अनेक गरजू लोकांना मदतीचा हात देऊन त्यांचे जीवनमान उंचाविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.अनेक ठिकाणी धार्मिक मंदिरांना सढळ हस्ते मदत केली आहे. अनेक गोरगरिबांना मदतीचा हात देऊन सामाजिक हित जोपासले आहे.

आनंद फाऊंडेशनच्या माध्यमातून अंबिका पार्क,आनंदनगर,कोगनोळी हायस्कूल, उच्च प्राथमिक सरकारी शाळा कोगनोळी,सरकारी प्राथमिक शाळा हालसिद्धनाथनगर, हणबरवाडी, हणबर गल्ली, आप्पाचीवाडी, आडी फाटा, दत्त मंदिर आडी, आडी मठ, आप्पाचीवाडी फाटा, हणबरवाडी फाटा, लक्ष्मी मंदिर, गणपती मंदिर हणबरवाडी, राष्ट्रीय महामार्ग हायवे फाटा, हणबरवाडी फाटा हायवे पाटील मळा हणबरवाडी, दत्तवाडी, बिद्रोळे मळा,पिडाप मळा, चव्हाण मळा, सुळकुड रोड, कुंभळकट्टी, खडक मळा, दत्तगुरु बँक या ठिकाणी दिशादर्शक फलक लावून ग्रामस्थांची व प्रवाशांची फार चांगली सोय केली आहे.

कोगनोळी,भोजसह सीमाभागातील बारा अंगणवाड्यांना टेबल,खुर्चीचे वितरण करण्यात आले आहे.सरकारी मराठी मुलांची शाळा हणबरवाडी, कोगनोळी, मत्तीवडे, हंचिनाळ के.एस येथे शालोपयोगी साहित्यांचे वितरण,भोज येथील अंगणवाडींना अक्षरज्ञान तक्ते व पुस्तकांचे वितरण करण्यात आले आहे तर याच गावातील मारुती यादव कुटुंबियांना उपचारासाठी सढळ हस्ते मदतीचा हात दिला आहे.कोगनोळीसह परिसरात महत्त्वाच्या ठिकठिकाणी सुमारे ४२ सोलर लॅम्प बसविल्याने गावचा परिसर उजळून निघाला आहे. याशिवाय रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, डोळे तपासणी शिबिर, गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण आणि मोफत टँकरने पाणीपुरवठा इत्यादी सामाजिक उपक्रमही फांऊडेशनतर्फे राबविण्यात आले आहेत.

या आनंद फाऊंडेशनने केवळ सात वर्षात अनेक सामाजिक उपक्रम राबवून निपाणी तालुक्यात आपला नावलौकिक केला आहे. यासाठी संस्थापक अध्यक्ष सचिन खोत, उपाध्यक्ष डॉ.प्रकाश कदम, संचालक निलेश खोत,मोहन देसाई, संचालिका शुभांगी खोत, रुपाली खोत, सचिव विजय खोत आदी पदाधिकारी कार्यरत आहेत. आनंद फाऊंडेशन ही एक सामाजिक संस्था असून समाजातील गरजू व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या विकासासाठी कार्यरत आहे.संस्थेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे,शिक्षणाचा प्रसार करणे आणि आरोग्य सेवांची उपलब्धता वाढवणे हा आहे. गरजू लोकांना मदत करुन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे, ग्रामीण भागात शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवणे, आरोग्य जनजागृती व आरोग्य सेवा लोकांपर्यंत पोहोचवणे आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे हे संस्थेचे ध्येय असल्याचेही संस्थापक अध्यक्ष सचिन खोत यांनी सांगितले.

**शाहीर संभाजी माने, कोगनोळी**

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**कोरोचीमध्ये** फॉर्म हाऊस प्लॉटस २,३,५,१० गुंठेचे विकणे आहे. संपर्क-९३७०१४१५०५

**रामलिंग रोडटच** १५ गुंठे प्लॉट विकणे आहे. संपर्क-९३७०१४१५०५

**प्लॉट विकणे आहे.** सांगली नाका ते टाकवडे रोडवर एसआयटी पॉलिटेक्निक शेजारी एनए ५० बाय ७० स्के. फूट. संपर्क-८८८८९४१२९२

**शेवया मशिन विकणे आहे.** संपर्क-९६३२५५३४१२

**एलईडी टीव्ही,** डबलडोअर फ्रिज, रिमोट होमथिएटर, वॉशिंग मशिन स्वस्तात मिळतील. भारत इलेक्ट्रॉनिक्स एसटी स्टँडसमोर, स्टेडियम गाळा नं. ११. ७५१७९६९६८०

**६ वन बीएचके फ्लॅट** असलेली ३ मजली इमारत सर्वसोयीनियुक्त विकणे आहे. संपर्क-७०५७८७७५०९

**महासत्ता चौकमध्ये** १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट व ऑफिससाठी बुकींग सुरू आहे. स्वामी समर्थ मंदिरजवळ, पॅराडाईज कॉलनी, इचलकरंजी. ९३२५८३०५९२

**कापड मार्केट** हौसिंग सोसायटीमधील नूतन इमारतीत पूर्ण फर्निचरसहीत २ बीएचके पहिल्या मजल्यावरील फ्लॅट विकणे आहे. ९४२२४१६२२१, इचलकरंजी.

**जमीन विकणे** आहे. बोरगाव मेन रोड टच ८४ गुंठे शेतजमीन, प्लॉटींगसाठी अतिशय उपयुक्त, कुरूंदवाड-हुपरी रोड. संपर्क ७५८८४८९८३०, ९८२२७६४६७६.

**शहापूर खंजिरे** इंडस्ट्रीयल इस्टेट पेट्रोल पंप रोड येथे दुकानगाळा विकणे आहे. मो. ९९२२५१६८०४, ९०२८२३८२४१.

**विकणे आहे** कोरोची लोकमान्य नगरमध्ये ५००० स्क्वे.फूट कलेक्टर रहिवासी एनए प्लॉट विकणे आहे.मो.८४५९४५१५६९

**जुने व नवीन** पॉवरलूम देवू व घेवू तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेवू व देवू. संपर्क ८३१७२९१००८.

**नैसर्गिकरित्या पिकवलेले** सुप्रसिध्द जैन फार्म हाऊस चे केशर हापूस आंबा मिळेल. पत्ता- जैन फार्म हाऊस, गौ-शाळेसमोर, सांगली रोड, कोंडिग्रे, इचलकरंजी. संपर्क-८६०००००८४१

**खंजिरे इंडस्ट्रीयल** हद्दीत शहापूर एमएसईबी जवळ ३००० स्क्वे.फूट शेड विकणे आहे. संपर्क ९९२२५१६८०४, ९०२८२३८२४१

**प्राईम लोकेशन** विवेकानंद नगर, कोरोची येथे ३० फुट रोडटच २७५० फुट बांधकामसहीत बझार मॉल कारखाना प्रॉपर्टी विकणे आहे. ९७६६८१२२९९, ९९७०३७१३८२.

### * विवाह विषयक *

**लिंगायत वधुवर मेळावा** रविवार १७ मे रोजी दुरदुंडेश्वर मठ, सुभाष रोड, संकेश्वर येथे. संपक-बेनाडीकर ९८२३९९३४९०.

### * आरोग्य विषयक *

**मानसिक आ**जार- व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्रचाळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिंक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

### * नोकरी विषयक *

**आयटीआय फिटर पाहिजेत.** पत्ता- तारदाळ नाका, शहापूर. संपर्क-८५३०४३६२३५, ८८३०४०६२३५

**त्वरीत सिक्युरिटी गार्ड भरती.** राधाकृष्ण चौक, इचलकरंजी ८ तास डिकेटीई तारदाळ १२ तास, कोरोची, शिक्षण-१० वी. ८१७७९८६२३३, ९५२९९६७०४७

**जेंटस कामगार पाहिजे.** टू व्हीलर आवश्यक. बेसिक पगार-१२ हजार. संपर्क-९६३१३१६०३०

**लेडीज कॉम्प्युटर** ऑपरेटर पाहिजे. मेल लिहता वाचता येणे आवश्यक व टेलिफोन ऑपरेटर पाहिजे. संपर्क-९६३१३१६०३०

**व्हीएमसी ऑपरेटर** व लेथ टर्नर पाहिजेत. प्रोग्रॅम व सेटिंग शिकवले जाईल. पगार १० ते २० हजार. संपर्क-९४२३२९०४०७, कोरोची.

**१० वी पास/नापास** मुले पाहिजेत. गरजूंनी भेटावे. संपर्क-८३०८००११६१

**फूलटाईम**/पार्टटाईम कामगार पाहिजे. निरंकारी कन्फेक्शनरी गांधी कॅम्प, इचलकरंजी. फोन-९३७२४३३३८२

**नामांकित कंपनीमध्ये** कामगार पाहिजेत. पीएफ+ईएसआयसी सुविधा. आकर्षक पगार दिला जाईल. शिक्षणाची अट नाही. ९६५७१४१०५८

**देवेन सिक्युरिटी**-सिक्युरिटी गार्ड भरती सुरू. ८ तास, १२ तास, खंजीरे इंडस्ट्रिज, कोरोची. वयोमर्यादा-२५ ते ६०. संपर्क-८२०८५०५४७२

**बेकरी शॉपमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क-बालाजी बेकरी, एएससी कॉलेजजवळ. फोन-९९६००२८२८९, ७२७६१२७१११

**इचलकरंजी येथील** नामांकित हॉटेल फॅमिली लॉजींगसाठी मॅनेजर,सुपरवायझर लेडीज/जेंटस पाहिजे. हॉटेल मॅनेजमेंट केलेले अनुभवींना प्राधान्य. ९८२२०५६५०१, ९४०३१३६६६९

**पाहिजेत.** १) अनुभवी प्रोडक्शन इनचार्ज. (CNC/VMC Programer)-02. २)CNC/VMC Operator-04. 3) Job Inspector-02. 4) होनींग मशिन ऑपरेटर-०४. ५) हेल्पर स्त्री/पुरूष-०२. आकर्षक पगार, ईएसआयसी+पीएफ सुविधा उपलब्ध. श्रीकृपा इंडस्ट्रिज. कबनूर-चंदूर रोड, मगदूम मळा, कबनूर. ७३८५८६४०७०

**जेन्टस/लेडीज** पार्ट टाईम व फूल टाईम इलेक्ट्रीक टू-व्हीलर शोरूमसाठी पाहिजे. संपर्क-७०२०९११२८७, इचलकरंजी.

**स्ट्रीट लाईट रिपेअरीसाठी** अनुभवी वायरमन पाहिजे. काम स. ९ ते सायं. ६, पगार- १५ ते २० हजार. ईएसआयसी+पीएफ लागू. अटी लागू. संपर्क-९८५०८१६६९८

**पंचवटी चित्रमंदिरमध्ये** हेल्पर महिला कामगार आवश्यक. गरजू. योग्य तो पगार दिला जाईल. संपर्क-९६२३१५०१०३, ९३२५३९७७११

**सेल्समन** (पुरूष किंवा महिला) ठिकाण-इचलकरंजी अनुभव FMCG विक्रीमध्ये किमान १ वर्षाचा अनुभव (फक्त इचलकरंजी परिसरामध्ये) वय २५ ते ३५ वर्षे. पगार-१००००-१२०००+इन्सेंटिव्ह कॉल/व्हॉटसअॅप ७०२०५६८४८५ (प्रतिक) आपला रिझ्युम वरील नंबरवर पाठवा.

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजनेअंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू. ५०% नोकरी व व्यवसायभिमुख प्रशिक्षण, ग्राफिक डिझाईन, एम.एस. ऑफिस, टॅली प्राईम वुईथ जीएसटी, ॲडव्हॉन्स एक्सेल कोर्सेसना दर्जेदार व सखोल प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर. पत्ता- इचलकरंजी बस स्टँडजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर. संपर्क-९२८४२६४९८०

**एका नामांकित** कंपनीमध्ये टेली कॉलिंगसाठी ४ लेडीज पाहिजेत. पात्रता- १२ वी, कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. आकर्षक पगार. ईएसआयसी, पीएफ लागू. संपर्क-९९२२७७२७७६

**वॉचमन पाहिजे.** कामाक्षी रेसिडेन्सी/शिक्षक कॉलनी, आमराई रोड) अपार्टमेंटला १२ तास ड्युटी, रात्रपाळी/दिवसपाळीसाठी वॉचमन पाहिजे. संपर्क-७४९९४५४६९०

**फोर व्हिलर मेकॅनिक** डेंटर व वॉशिंगकरीता कामगार पाहिजेत. संपर्क-९०११९७७७११

**ॲड एजन्सीच्या** सेल्ससाठी मुले/मुली/महिला पार्ट/फूलटाईम पाहिजेत. पगार १५ ते २० हजार. जागा-२०. संपर्क-८०५५१४०३५५

**अकौंटींग-टॅली प्राईममध्ये** अनुभवी अकौंटंट पाहिजे. लेडीज (दोन वर्षे) अनुभव. फोन-९३२६००८२९५

**पाहिजे.** शेती कामातील अनुभव असलेला दिवाणजी पाहिजे. बीएस.स्सी. ॲग्री किंवा डिप्लोमा यांना प्राधान्य. संपर्क-९८८१४९१५८२

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती, मालवाहतुक गाडीवर लायसनधारक (LMV-TR) अनुभवी व हुशार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क-९८९०२२०९४३, ७५१७५०६६८२

**टू व्हिलर,** फोर व्हिलर इंजिन ऑईलच्या मार्केटिंगसाठी अनुभवी/शिकाऊ मुलगा हवा. स्वत:ची गाडी आवश्यक. संपर्क-९०२८४४४९३१

**हॉस्पिटलमध्ये** साफसफाई कामासाठी मावशी पाहिजेत. संपर्क-७६२०८८६९११

**अर्जंट नेमणे आहे.** चार चाकी वाहनांचे मेकॅनिक अनुभवी/शिकाऊ-२, सर्व्हिसिंगसाठी लेडीज/जेंटस-१. रिसेप्शनिस्ट-१ लेडीज. समक्ष संपर्क-साई अॅटो लिडस्, मारूती सर्व्हिस सेंटर, महासत्ता चौक, सांगली रोड, इचलकरंजी.

**१) माल वाहतुक गाडीवर** ड्रायव्हर व हमाल पाहिजे. २) मार्केटिंगसाठी सेल्समन पाहिजे. भेटा-पद्मावती एजन्सी, हॉटेल किनारा बारजवळ, सुतार मळा, इचलकरंजी.

**इंजिनिअरींग वर्कशॉपमध्ये.** Inword/Outword Maintain साठी लेडीज पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९२२५९२९५९५

**अकौंटट पाहिजे.** (इंजि. वर्कशॉपमध्ये) टॅली प्राईम, किमान-३ ते ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. फूलटाईम जॉब, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९२२५९२९५९५

**ऑफिस कामासाठी** कॉम्प्युटरचे ज्ञान तसेच टॅली अकौंटींगचे व एक्सेलचे पूर्ण ज्ञान असलेले अनुभवी फूलटाईम लेडीज पाहिजे. संपर्क-९१७५८३०४६६, ७५८८९५३८५१

**दिवाणजी कामासाठी** माणूस पाहिजे. वडगाव बाजार समिती, सांगली रोड, इचलकरंजी. फोन-८८३०५६३८८०

**ऑफिस कामासाठी** मुले पाहिजेत. सहारा एंटरप्रायजेस, इचलकरंजी. फोन-९५९५२५७०७०, ९७४३२५५५८०

**अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत.** इचलकरंजी, शहापूर, तारदाळ, हातकणंगले, कोरोची ड्युटी १२ तास तसेच घरकामकरिता महिला पाहिजे. त्वरीत संपर्क-९०६७९८५२३३

**नामांकित पिझ्झा शॉपमध्ये** पार्टटाईम/फूलटाईम कामासाठी मुले पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क-९८२२५८०५६६, इचलकरंजी.

**पाहिजेत.** इचलकरंजीस्थित नामांकित कंपनीकरिता १) ड्रायव्हर- ट्रान्सपोर्ट लायसन्स आवश्यक. २) हेल्पर- १० वी, १२ वी पास/नापास आकर्षक पगार, पीएफ+ईएसआयसी ची सोय. संपर्क-९६८९१७५११०, ८५५२०३४००९

**इचलकरंजीतील** अग्रगण्य ३० वर्षीय सुवर्णपेढी मध्ये महिला व पुरूष यांच्यासाठी सुवर्णसंधी. कॉम्प्युटर ऑपरेटर सेल्सपर्सन, आकर्षक पगार+वार्षिक बोनस, शिक्षण-पदवीधर+१२ वी गरजूंनी आपल्या पुर्ण माहितीसह आधार, पॅन व फोटोसह समक्ष भेटा. श्री जिनेंद्र ज्वेलर्स, रूणवाल टॉवर, इचलकरंजी. ९४२१२०३९५१

**S.V. Trendz मध्ये** आकर्षक नोकरीच्या संधी. सेल्स इंजिनिअर, सर्व्हिस इंजिनिअर, प्रॉडक्ट रिप्रेझेंटेटिव्ह, सर्व्हिस हेल्पर, वेल्डर, प्लंबर. अनुभवी तसेच फ्रेशर उमेदवारांना संधी, आकर्षक वेतन व उत्तम करिअर ग्रोथ. सर्व्हीस पदांसाठी शैक्षणिक पात्रतेची अट नाही. उमेदवाराचे वय १८ पूर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनी त्वरीत संपर्क साधावा. संपर्क-७७६७०००६२७, ७७६७००००२७. कार्यालयाचा पत्ता-S.V. Trendz पार्वती इंडस्ट्रिज, यड्राव.

**पेपर रोल लॅमिनेशन** तयार करणेसाठी कारखान्यात ऑपरेटर-जेंटस-२ जागा. हेल्पर-२ (जेंटस) त्वरीत जागा भरणे आहेत. (CNC, VMC, ITI केलेल्यांना प्राधान्य.) (आकर्षक पगार) मो. ९९२१५३२०१८, ८०८७३६७४१८, भेटणेची वेळ-दु. ४ ते ६.

**सुवर्णसंधी** (Work from Home) वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी, इतर सर्वांसाठी घर. मोबाईल किंवा ऑफिसमधून काम करा. (वय-१८+) ७४९८००३७८३

**पाहिजे.** बिअरबार + रेस्टॉरंटमध्ये फूलटाईम व पार्टटाईम वेटर पाहिजेत. संपर्क-७७३८३८२६९२

**नामवंत मॅकॅनिकल** कंपनीमध्ये क्वॉलिटी व डिझाईन विभागासाठी सुपरवायझर पाहिजेत. १५,००० ते ३०००० पर्यंत पगार व सर्व सोयी. (Pay Shift) इचलकरंजी. ८९५६१६९६९६

**नामवंत कंपनीमध्ये** भरती सुरू. १० वी/१२ वी चे शिकाऊ ऑपरेटर व जॉब इन्स्पेक्टर-१०, बी.कॉम/टॅली झालेले सुपरवायझर व हेल्पर (पे शिफ्ट) साठी पाहिजेत, इचलकरंजी. ९१७५९६७७६७

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजे. ड्युटी ८ तास. वेळ दु.३.०० ते ११.००, कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. मो. ८३२९०२८१४४.

**सीएनसी मशिनसाठी** अनुभवी/शिकावू कामगार पाहिजे. पत्ता - ईदगाह मैदानमागे, इचलकरंजी. मो. ९६३७२२३३५३.

**श्री सिध्देश्वर इंजि.** वर्क्स, १८' फुटी लेथ मशिनवर डेव्हलपमेंट आणि प्रॉडक्शनसाठी अनुभवी टर्नर पाहिजे. हेल्पर हवा आहे. किमान १० वी पास/नापास. मो. ९४२३८६००९१/७३८७४५७४९०.

**हॉस्पिटल कामासाठी** नाईट शिफ्ट लेडीज नर्सिंग स्टाफ पाहिजे. गॅलेक्सी हॉस्पिटल, सुंदर बागेजवळ, इचलकरंजी. मो. ८१३०४३२१३२, ७०५८०८०७२१.

**अर्जंट पाहिजेत** इचलकरंजीमध्ये बागवान कन्स्ट्रक्शनमध्ये डीसीई इंजिनियर पाहिजेत. अनुभव असणे आवश्यक. मो. ९४२३२८६१४२,९९७०६१४५७६.

**पाहिजेत स्त्री/पुरूष** अनुभवी/शिकाऊ पुरूष हेल्पर, ऑरगन वेल्डर, सीओ२ वेल्डर, विशाल इंडस्ट्रीज, खोतवाडी. मो. ९१४६७६९६५६, ८९९९५००७७३.

**घरबसल्या ऑनलाईन** काम करण्याची संधी. मो. ९१७५३१६८८९.

**तारदाळ येथे** Airjet कारखान्यासाठी अनुभवी दिवाणजी पाहिजेत. भेटणेची वेळ १० ते २. Add.Gat No.660, Krishna Nagar, Near Suryavanshi Textile, Tardal.

**कापड दुकानात** कामासाठी शिकाऊ/अनुभवी लेडीज,जेन्टस् पाहिजे. आकर्षक पगार+कमिशन. संपर्क ९५९५००७५५५

**सिक्युरिटी गार्ड** पाहिजेत जागा ४ आकर्षक पगार+बोनस. संपर्क-७२१९२८६२८४, ९८६०८१४४६३, माने फौंड्री, इचलकरंजी.

**रेडिमेड कापड** दुकानासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे. पत्ता- श्री महालक्ष्मी कापड दुकान, हत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९८५०८५८६०२, ७६२०३५८४०८.

**साफल्य हॉस्पिटलकरीता** पाहिजे. एएनएम/जीएनएम २ नर्सिंग स्टाफ, रिसेप्शनिष्ट १. मो. ८८३०५४५९८२, ९२८४७५७८९९.

**Workers Required** For Machine Shop. CNC/VMC Operator-3, SPM Machine Operator-3, Quality Inspector-3, Quality Incharge-1, Helper (Gents) 2, Turner-2. Contact-9158434345, Shri Padmavati Auto Components, Korachi.

**पॅकींग कामासाठी** पुरूष व महिला पाहिजेत. येण्याजाण्यासाठी गाडीची सोय मोफत. पगार पुरूष पर डे ४२०/-, महिला ३५०/-. सोमवार सुट्टी, आठवड्याला पगार मिळेल. शिरोली. एमआयडीसी, कोल्हापूर. मो. ९०२२४१६०४०, ९३२२८८१५५८.

**जॉकी एक्सलुझिव्ह** इचलकरंजी आकर्षक पगारासह खालील जागांची भरती करत आहे. १)सेल्सपर्सन पुरूष-२ जागा २) महिला सेल्सपर्सन - २ जागा. मो. ९५०३५२१००४, ७२४९८४३२५६.

**दवाखान्यात कामासाठी** नर्सिंग स्टाफ व कंपौंडर कामासाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क - डॉ.परदेशी दवाखाना, जिव्हाजी मंदिरजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी.

**पाहिजेत शिट** मेटल वर्कशॉपमध्ये वेल्डर, हेल्पर पाहिजेत. परफेक्ट स्टील्स, कोरोची. मो. ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४.

**बारसाठी शिकाऊ**/अनुभवी वेटर पाहिजेत. पगार १३ ते १४ हजार महिना. संपर्क - ९८२२३४७६८९, ९८८१४४७४४९.

**अर्जंट पाहिजेत** रजिस्टर लेडीज फार्मासिस्ट, आकर्षक पगार, कागदपत्रासह समक्ष भेटा. श्रध्दा मेडिकल्स, डॉ.महेशकुमार बनकर हॉस्पिटल, पंचवटी टॉकीजशेजारी, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**जिममध्ये लेडीज** रिसेपनिस्ट पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक, गुड कम्युनिकेशन. संपर्क. आयएम फीट क्लब, ९८६०६६०९६९, ७४९८४३३०४०.

**नामांकित सायझिंगमध्ये** अनुभवी बॅक सायझर वार्पर भरणे आहे. मो. ९६७३३३५१३७, ९६०४०४२३४८.

**सेल्समन पाहिजे** टाईल्स शोरूममध्ये अनुभवी सेल्समन पाहिजे. सेल्स कामाकरीता संपर्क-कोल्हापूर शाम टाईल्स, एकसंबा, ता. चिकोडी ९५९५१२५५९५, ७६००३९८९८६.

**इचलकरंजीतील नामांकित** कपड्याच्या शोरूममध्ये सेल्ससाठी मुले आणि मुली पाहिजे आहेत. अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार, मो. ९९२१३८९५६७, ९०९०३८९६९६.

**गारमेंट व प्रिटींग कामासाठी** लेडीज ऑपरेटर पाहिजेत व पिशवी कटींगसाठी कटिंग मास्टर हेल्पर पाहिजेत. मो. ८७८८६४६३२५, शहापूर-स्टेशन रोड, ईदगाह मैदानाजवळ, इचलकरंजी.

**कोरोचीमधील नामांकित** अकॅडमीमध्ये ५ वी ते १० वी वर्गासाठी सर्व विषयासाठी शिक्षक भरणेचे आहे. संपर्क-७०२०४६९०२५.

**होलसेल औषध दुकानात** १०/१२ वी झालेली मुले/मुली पाहिजेत. पत्ता- सुशिल फार्मा एलएलपी, नाईट कॉलेजजवळ, इचलकरंजी. मो. ९०९६२६१२७२. संपर्क-११ ते १

**ऑफीस कामासाठी** कॉम्प्युटर (टॅली चा अनुभव असलेली लेडिज पाहिजे. मो. ७०२०२३८०१९,८७८८६४१६१७.

**गोडावूनसाठी ड्रायव्हर**+हमाल पिकअप बलोरा पाहिजे तसेच गोडावूनसाठी हमाल पाहिजे. संपर्क- जय किसान पशु खाद्य. मो. ९४२२०४४२९२.

**मनमोहन टेक्स्टाईल** खंजिरे इंडस्ट्रीज, शहापूर. त्वरीत वॉचमन नेमणे आहे. आकर्षक पगार दिला जाईल. ड्युटी ८ तास राहील. मो. ८५८५८३८०५२.

### * इतर *

**ढेकूण, पाल, मुंग्या,** वाळवी, झुरळासाठी वस्तू न काढता हर्बल जेल १००% गॅरंटी. प्रतिरूम ४९९/- फोन-९४२१६४६३५२, ९९२२६६७८९१

**विद्यार्थी आणि नोकरदारांची** रोजची जेवणाची चिंता संपली. घरापासून दूर असलात तरी आता मिळेल घरच्या चवीचा आधार फक्त रू. ८० मध्ये ताजे घरगुती टिफिन, वेळेवर सेवा, रोज नवीन मेनू, एकदा खाल तर रोज मागवाल याची खात्री. मो. ८७८८५६२१५१, ९८८१८६३०५७.

### * हॉटेल विषयक *

**परमिट रूम बारसाठी** वेटर व हेल्पर पाहिजे. संपर्क-७५८८६२०५०५, ९८५०५९६९६५

### * व्यवसाय विषयक *

**एक्स्ट्रा इन्कम** स्वरूपाची सुवर्णसंधी. सर्वांसाठी आपली नोकरी, व्यवसाय करून फक्त २ तास एक्स्ट्रा काम करून एक्स्ट्रा इन्कम मिळवू शकता. योगशिक्षक-नंदकुमार सर ९८५०६१५४२१.

### * भाड्याने देणे/घेणे *

**कबनूर कट्टा,** खाऊ गल्ली येथे गाळे भाड्याने देणे आहे. पहिले तीन महिने भाडे माफ/फ्री फॅक्टरी रोड, कबनूर. मो. ९०११००८५५५

**आरसीसी १ आरके** सर्व सोयीनियुक्त रूम भाड्याने देणे आहे. संपर्क-९४२२०४३५६२, ८३२९५२९९४८ (वेळ-६ ते ८)

**२ बीएचके** प्रशस्त सर्वसोयीनियुक्त पहिला मजला घर भाड्याने देणे. मॉडर्न हायस्कूलजवळ ''सत्यप्रिती'' प्रियदर्शिनी कॉलनी, इचलकरंजी. ९४२०००६९५४

**भाड्याने देणे आहे.** १३०० स्के. फूट ग्राऊंड फ्लोअर आणि फर्स्ट फ्लोअर-१५०० स्के. फूट बँक, पतसंस्था, ऑफिस व दवाखाना यासाठी. पत्ता- मंगलधाम रोड, मेन पोस्ट ऑफिसजवळ, इचलकरंजी. संपर्क-७५८८४६१०१४, ९०७५४०९५६४

**शेड भाड्याने देणे.** १५०० स्के. फुटाचे शेड २६ एचपी तिरंगा कॉलनी, गल्ली नं.५, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-७३८५६६९०६०

**फ्लॅट भाड्याने देणे आहे.** हत्ती चौक, इचलकरंजी येथील, ३ बीएचके, अद्ययावत, सर्व सोयीनियुक्त फूल फर्निश्ड, सोलर हॉट वॉटर, मॉड्युलर किचन, वायफाय, लिफ्ट इ. सुविधा. फक्त मारवाडी फॅमिलीसाठी उपलब्ध. संपर्क-९४२३२७५६८८

**१ बीएचके/२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त ग्राऊंड फ्लोअर बोअरसह भाड्याने देणे. गुरू कन्ननगर, इचलकरंजी. फोन-९४२०७७६२६८

**भाग्यलक्ष्मी कॉम्प्लेक्स** एएससी कॉलेजजवळ १० बाय १० गाळा नं.३ भाडेने देणेचे आहे. संपर्क-८३८००८००८६

**फोटो लॅबमध्ये** पार्टटाईम कामासाठी गरजू मुले पाहिजेत. कासट कलर लॅब, भाग्यरेखा टॉकीजसमोर, इचलकरंजी. ८३२९८८७८८१

**वन बीएचके फ्लॅट** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. विकासनगर, नवीन महानगरपालिकेसमोर, डेक्कन कंपौंडलगत. संपर्क-९८५०६७८३४०

**जनता बँकेपासून** जवळच आरसीसी २०० स्के. फूट सर्व सोयीनियुक्त दुकानगाळा, ऑफिस किंवा व्यवसायासाठी भाड्याने देणे. आरपी रोड, पद्मा लाँड्री, बिरदेव बँकेजवळ, इचलकरंजी. ७२४९४९०९६२

**१० बाय ६० मोकळी जागा** भाड्याने देणे आहे. पत्ता- नामदेव भवनला लागून इचलकरंजी. मो. ७५८८२६७३६१

**भाड्याने देणे.** खुली जागा, कोल्हापूर नाक्याजवळ, कबनूर हद्दीत ३६००० स्के. फूट संपर्क-९९२२३१४०४३

**१००० चौ. फूट** आरसीसी शेड भाड्याने देणे आहे. (क्लास, गारमेंट, बझार इ. साठी) तुळजाभवानी नगर, गल्ली नं. ३. मो. ९८२३६५६३७२

**शाकाहारी कुटंबासाठी** खोली भाड्याने देणे आहे. सुर्वेनगर, चंदूर रोड, इचलकरंजी. मो. ९४२१०३७१०८

**आरसीसी** ८ बाय २०=१६० स्क्वे.फूट दुकान गाळा भाड्याने देणे. शाहू कॉर्नर, तारा हॉटेलमागे, इचलकरंजी. मो. ९७६५६३८६९६.

**नवीन २ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे चौथा मजला, वास्तुशास्त्रानुसार. सर्व सोयीनीयुक्त, २४ तास पाणी, तांबे माळ, राधामोहन प्रोसेसजवळ, इचलकरंजी. ९९२१४८४१७८.

**महासत्ता चौक** येथे २ बीएचके दोन फ्लॅट भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनीयुक्त. मो. ९८२२२७७४४५.

**दुकान गाळा** ३९० स्क्वे.फूट व गोडावून ६५० स्क्वे.फूट भाड्याने देणे आहे. जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ८७९३८७८७९७.

**रेडी सेटअप फर्निचरसह** दवाखाना भाड्याने देणे आहे. दवाखान्याचे सर्व फर्निचर साहित्य विकणे आहे. मो. ७५१७६१३५१५.

**२८०० स्क्वे.** फूटचा सर्व सोयीनीयुक्त शेड भाड्याने देणे. पत्ता- लक्ष्मी इंडस्ट्रीज इस्टेट, अब्दूललाट, ता. शिरोळ. मो. ९८९०२१७१९५, ९९७५२६२०१९.

**फ्लॅट भाड्याने देणे** (फक्त शाकाहारींसाठी) ३ बीएचके, वेल फर्निश्ड, रॉयल पार्क हौसिंग कॉम्प्लेक्स मागील बाजूस, इचलकरंजी. ९४२२०४३६६७.

**आरसीसी रूम** १ बीएचके भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनीयुक्त. यशवंत कॉलनी जवळ, सातगोंडा पाटील मळा, इचलकरंजी. मो. ८७८८२८३६११.

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**



## टाकवडेत मूर्ती प्राणप्रतिष्ठापना उत्साहात

**टाकवडे,ता.११(प्रतिनिधी)**

**टाकवडे ता.शिरोळ येथील शंभो महादेव मंदिर येथे श्री गणपती माता पार्वती रेणुका मंदिरे येथे श्री रेणुका देवीची मूर्ती श्री नरसिंह मंदिर येथे नरसिंह मूर्ती प्राणप्रतिष्ठापना महोत्सव उत्साहात संपन्न झाला.**

परमपूज्य गुरु सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी सुरंगेश्वर संस्थान मठ कसबा नूल यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठापना सर्व विद्युत धार्मिक पूजा व होम हवन करण्यात आली. सर्व मूर्ती मिरवणुकीमध्ये धनगर ढोल हलगी वादन करंडोली बाहुल्यांचे प्रदर्शन देव देवतांची मूर्तीवंत सजावट झांज पथक बँड इत्यादी माध्यमांमध्ये मिरवणूक गावातून मंदिराकडे काढण्यात आली होती.याप्रसंगी परमपूज्य शिवाचार्य महास्वामीजींचें प्रवचन सहा दिवस महादेव मंदिर येथे अध्यात्मिक मार्गदर्शन श्रोत्यांना लाभले. सोमवार ११ मे रोजी परमपूज्य गुरु सिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास आम. डॉ राजेंद्र पाटील यड्रावकर तसेच स्वाभिमानी विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष सौरभ शेट्टी यांनी उपस्थिती दर्शवली. मूर्ती स्थापना उत्सव कमिटीच्यावतीने या कार्यकमांचे संयोजन करण्यात आले.

## रंगाच्या कंपनीला आग; कोट्यवधीचे नुकसान

**सातारा दि. (प्रतिनिधी)-**

**सातारा-मेढा रस्त्यावर नुने ता. सातारा येथील सुपर एन्टरप्रायझेस या रंगामध्ये वापरण्यात येणारे थिनर बनवणाऱ्या कंपनीला सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. धूराचे लोट, कानठिळ्या बसाव्यात असे स्फोट, आगीने क्षणार्धात धारण केलेला रूद्रावताराने परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेने कंपनीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे.**

याबाबत मिळालेली माहिती अशी, नुने फाट्यावर गेले अनेक वर्षांपासून सुपर एन्टरप्रायझेस ही कंपनी सुरू आहे. परिसरातील रहिवाशांना ही कंपनी रंगाची आहे असा समज होता. प्रत्यक्षात या कंपनीत रंगांत मिळण्यासाठी लागणारे थिनर बनवले जात होते. या कंपनीमधून अचानक दुर निघू लागला. क्षणार्धात धूर कंपनीत पसरू लागल्याने कर्मचाऱ्यांनी कंपनीतून धूम ठोकली. कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला.

आगीने क्षणार्धात रौद्ररूप धारण केले. आगी बरोबर धुराचे लोट बाहेर पडू लागले. दरम्यान अधूनमधून मोठं मोठ्या स्फोटाचे आवाजाने परिसर हादरला. मोठ्या प्रमाणात स्फोटामुळे भितीचे सावट निर्माण झाले. सातारा तालुका पोलीस ठाण्याचे पो. नि. निलेश तांबे, फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले.

परिसरातील रहिवाशी आणि प्रवाशांनी केलेल्या गर्दी हटविताना पोलिसांची दमछाक झाली. सातारा नगर पालिका, अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, किसनवीर साखर कारखान्याचे अग्निशमन दलाच्या जवानांनी दोन तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. या कंपनीला शॉर्ट सर्किटने आग लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## दमसाच्या ग्रंथ पुरस्कारासाठी निवड जाहीर

**कोल्हापूर ता. ११ (प्रतिनिधी)-दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२५ मधील ग्रंथ पुरस्कारासाठी रवींद्र ठाकूर, धनंजय बिजले, शशिकांत चौधरी, निलांबरी कुलकर्णी, चंद्रकांत बाबर, आदींच्या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. २४ मे २०२६ रोजी पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे.**

देवदत्त पाटील पुरस्कार (कादंबरी) विभागून धरणीमाय- शशिकांत चौधरी, भिंगुळवाणे दिवस - रमेश साळुंखे, शंकर खंडू पाटील पुरस्कारः स्त्रीप्रधान सर्वेपि सुखिन सन्तु निलांबरी कुलकर्णी (कथासंग्रह), अण्णा भाऊ साठे पुरस्कारः दाही दिशा-रवींद्र ठाकूर (कादंबरी), कृ.गो. सूर्यवंशी पुरस्कारः महामुद्रा-धनंजय बिजले (संकीर्ण), शैला सायनाकर पुरस्कारः माझ्यातल्या कवितेची हळूहळू होऊ लागली आहे वाफ-चंद्रकांत बाबर (कवितासंग्रह), चैतन्य माने पुरस्कार (प्रथम प्रकाशन) घुंगुरमाळा- महानंदा मोहिते आणि बालवाङ्मय पुरस्कार-संवाद-श्रीयांश हराडे यासह विषेश पुरस्काराने लेखकांना पुरस्कार वितरन सोहळ्यात गौरवण्यात येणार आहे. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्यावतीने कोल्हापूर, सांगली, सातारा,सोलापूर या जिल्ह्यांसह सीमाभागातील मराठी लेखकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. २०२५ या वर्षातील ग्रंथ पुरस्कारासाठी परीक्षक म्हणून भीमराव धुळूबुळू, प्रा. दि.बा.पाटील, गौरी भोगले, पाटलोबा पाटील यांनी काम पाहिले.

## बोरगावात १४ मे रोजी विराट हिंदू संमेलन

**बोरगांव, ता.११ (प्रतिनिधी)**

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सकल हिंदू समाज बोरगाव यांच्या वतीने गुरुवार १४ मे रोजी बोरगाव शहरात विराट हिंदू संमेलन होणार असल्याची माहिती पूर्वनियोजित बैठकीत देण्यात आली.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हुपरी तालुका मुख्य महामार्ग प्रमुख सुनील सुतार म्हणाले, आपला भारत देश हा हिंदू राष्ट्र आहे . राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. शंभर वर्षी पूर्वी स्थापन केलेल्या या संघाकडून संपूर्ण देशभरात हिंदू धर्मजागृती करण्यात येत आहे.बोरगाव येथेही १४ मे रोजी विराट हिंदू संमेलन होणार आहे .या संमेलनाचे सानिध्य सिद्धांत चक्रवर्ती १०८ कुलरत्न मुनी महाराज व हांचनाळ येथील परमपूज्य महेशानंद स्वामीजी लाभणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते राजशेखर हिरेमठ हे अध्यक्ष असणार आहेत.तर प्रमुख वक्त्या म्हणून सौ मैत्री गोडसे यांचे कुटुंब प्रबोधनावर व आरएसएस इचलकरंजी येथील प्रमुख भगतरामजी छाबडा यांचे पंचपरिवर्तन या विषयावर व्याख्यान होणार आहे. बोरगाव शहरा सह ८ गावातील आरएसएसचे प्रमुख व हिंदू समाजाचे कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे सांगितले.

हालशुगर संचालक शरद जंगटे म्हणाले, हे संमेलन राजकारण व जातपात विरहित असणार आहे. सकल हिंदू समाजाच्या वतीने या ठिकाणी संमेलन आयोजित केले असून सर्वांनी या संमेलनात उत्स्फूर्त सहभागी व्हावे. स्वामीजींच्या दिव्य सानिध्यात संमेलन होणार असून संमेलनापूर्वी शहरातून सवाद्य मिरवणूक शोभायात्रा निघणार आहे.

यामध्ये बारा घोडे, उंट ,रथ विविध पारंपारिक वाद्य असणार आहेत. प्रत्येक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी संपूर्ण शहरात रांगोळी काढणे भगवे ध्वज लावणे हे कार्य करणार असून संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असे सांगितले.

# छ. संभाजीराजे जयंतीनिमित्त टाकवडेत भारुडाचा कार्यक्रम

**टाकवडे,ता.११(प्रतिनिधी)**

**टाकवडे (ता.शिरोळ) येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव कमिटीतर्फे बुधवारी १३ मे रोजी सायंकाळी ७ वाजता समाज प्रबोधनात्मक ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड जनजागृती भारुड मंडळ आळंदी देवाची हा विनोदातून समाज प्रबोधनपर कार्यक्रम भारुड येथील श्री कल्लेश्वर हायस्कूलच्या पटांगणावर होणार आहे**

गुरुवारी १४ मे रोजी छ.संभाजी महाराज यांची मूर्ती पूजा होणार आहे. सकाळी दहा ते दोन या वेळेत केअर हॉस्पिटल (कोरोची) यांच्या संयुक्त विद्यमाने येथील शिवाजी महाराज चौक मराठा समाज भवनात आरोग्य शिबिर आयोजिलेआहे. सायंकाळी सात वाजता महाप्रसाद वाटप श्री करवीर सेवा सोसायटीमध्ये होणार आहे.कार्यक्रमाचा ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव कमिटीतर्फे करण्यात आले आहे.

* रत्नागिरी,ता.११– कोकण किनारपट्टीवर आलेल्या भीषण चक्रीवादळ आणि मुसळधार पावसामुळे मंडणगड तालुक्यातील महावितरणचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. १००हून अधिक वीजखांब जमीनदोस्त झाले आहेत.या नैसर्गिक आपत्तीमुळे महावितरणच्या उपविभागांतील विसापूर, मंडणगड आणि कुंबळे या तीन शाखांचा वीजपुरवठा पूर्णत: खंडित झाला होता.

# शक्तिपीठ महामार्ग आमच्या माथी नको

## प्रांताधिकाऱ्यांना घातले साकडे; भुदरगड तालुक्यात शेतकरी एकवटला


शक्तिपीठ विरोधात प्रांताधिकारी हरेश सुळ यांना निवेदन देताना संघर्ष समितीचे पदाधिकारी.

**गारगोटी,ता.११ (प्रतिनिधी)–**

**शेतकऱ्यांना आणि पर्यावरणाला उद्ध्वस्त करणारा आणि नको असलेला शक्तिपीठ महामार्ग आमच्या माथी मारू नका, असे साकडे सोमवारी भुदरगड तालुक्यातील शेतकऱ्यांनी व शक्तिपीठ विरोधी संघर्ष समितीने प्रांताधिकाऱ्यांकडे घातले.याबाबतचे निवेदन भुदरगड–आजराचे प्रांताधिकारी हरेश सुळ यांना दिले.**

सोमवारी भुदरगड तालुक्यातील शेतकरी गारगोटी येथील एसटी स्टॅन्ड जवळील साई मंदिराजवळ एकत्र जमले व त्यांनी तेथून चालत जाऊन प्रांताधिकारी कार्यालय गाठले व निवेदन दिले.

सार्वजनिक बांधकाम विभागाने ५ मे २०२६ रोजी शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्याची अधिसूचना जाहीर केली आहे.यात बाधित गावातील गट नंबर जाहीर झाले आहेत.नागपूर ते गोवा या शक्तिपीठ महामार्गामुळे हजारो हेक्टर पिकाऊ शेती व पर्यावरणाचा ऱ्हास होणार आहे. शेतकऱ्यांचा या महामार्गाला विरोध आहे.गेली दोन वर्ष १२ जिल्ह्यातील शेतकरी शक्तिपीठ महामार्ग नको म्हणून राज्य शासनासमोर टाहो फोडत असताना जमीन अधिग्रहण आदेश काढून शेतकरी बांधवांना देशोधडीला लावून पर्यावरणाची प्रचंड हानी करणारा शक्तिपीठ महामार्ग कधीही होऊ देणार नाही, असा निर्धार यावेळी करण्यात आला. यावेळी संदीप देसाई, एच. आर.पाटील, रवींद्र नागटिळे, मसनू कांबळे,सुरेश देसाई, कृष्णा भारतीय, सुनील लाढ, सुरेश मोरे, एकनाथ पाटील, रामचंद्र देसाई, शहाजी भोसले, तानाजी पाटील, वसंत पाटील उपस्थित होते.

# ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरूच ठेवावे लागणार

## मेजर मोहिनी गर्गे–कुलकर्णी

**इचलकरंजी,ता.११–**

**आपटे वाचन मंदिरच्या वसंत व्याख्यानमालेतील सातवे विचारपुष्प मेजर मोहिनी गर्गे–कुलकर्णी (निवृत्त) यांनी मोठ्या प्रभावी वक्तव्याने श्रोत्यांच्या समोर गुंफले.**



‘ऑपरेशन सिंदूर’ या विषयावर स्पष्ट बोलताना त्यांनी ‘ऑपरेशन सिंदूर’ बाबत सविस्तर शब्दात माहिती दिली, हे ऑपरेशन कायमस्वरूपी चालू ठेवावे लागणार आहे असे ठणकावून सांगितले.

तसेच शत्रूच्या दहशतवादाच्या विरुध्द लढणे गरजेचे आहे. त्यामुळे नागरिकांनी ही नेहमी सजग व सतर्क रहावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी त्यांच्या विचारांनी देश प्रेम व देशभक्तीची लहर श्रोत्यांच्या मनात निर्माण झाली. भारत माता की जय या घोषणेने नागरिकांनी परिसर दणाणून सोडला.

कार्यक्रमात उपाध्यक्ष काशिनाथ जगदाळे यांनी स्वागत केले. कार्यवाह प्रा. मोहन पुजारी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास सर्व संचालक यांच्यासह श्रोते उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोकअदालतीत साडेतीन हजार प्रकरणे निकाली

## १३ कोटी ५५ लाख रूपये दंड वसूल

**सांगली,ता.११ (प्रतिनिधी)–**

**राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणच्या निर्देशानुसार सांगली जिल्ह्यामध्ये घेण्यात आलेल्या लोकअदालतीत दावापूर्व ३१७३ प्रकरणे तडजोडीने तसेच सर्व न्यायालयातील मिळून ४३९ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण ३६१२ प्रकरणे निकाली करण्यात आली. या लोकअदालतीमध्ये १३ कोटी ५५ लाख ५९ हजार ७६२ रूपये रकमेची वसूली करण्यात आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव कांबळे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्ष अदिती उदय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश व्ही.डी. निंबाळकर, एस.एम. चंदगडे,एस.आर. पडवळ, सांगली बार असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकात माने व पदाधिकारी तसेच जिल्हा सरकारी वकील प्रमोद भोकरे उपस्थित होते.

या लोक अदालतमध्ये सांगली मुख्यालय येथे पॅनेलप्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश क्र. २. एस. एम. चंदगडे, जिल्हा न्यायाधीश क्र. ३ एस. आर. पडवळ, जिल्हा न्यायाधीश क्र. ५ एम. एम. पाटील, कौटुंबिक न्यायाधीश एस.जे.घरात, चौथे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एन.के.पाटील, ११ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर ए. आर. कल्हापुरे, १२ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व्ही. व्ही. खुलपे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी.के.करवंदे, निवृत्त न्यायाधीश एस.ए.उपाध्ये, ४ थे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर जे. एस. मकानदार, ५ वे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ओ.एस. शास्त्री यांनी काम पाहिले.

अ‍ॅड.विजय गाडेकर, अ‍ॅड.राजकुमार पाटील,अ‍ॅड. प्रभा दुर्गाडे, अ‍ॅड. पुरूषोत्तम बेंद्रे, अ‍ॅड. संजय रणसिंग, अ‍ॅड धनपाल येळमंते, अ‍ॅड. अर्चना उबाळे, अ‍ॅड. सर्जेराव मोहिते यांनी पॅनेल अ‍ॅडव्होकेट म्हणून काम पाहिले.

लोकअदालत यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव गि. ग. कांबळे यांनी संपूर्ण लोकअदालतीचे नियोजन केले.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अधिक्षक शंकरराव वानखेडे, वरिष्ठ लिपीक संतोष खंदारे, कनिष्ठ लिपीक नितीन आंबेकर, विजय माळी उपस्थित होते.

लोकअदालतवेळी पक्षकारांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. पुढील राष्ट्रीय लोक अदालत १२ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणार असून पक्षकारांनी यामध्ये सहभाग घेवून आपली प्रकरणे तडजोडीने मिटवून घ्यावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सांगलीतर्फे करण्यात आले आहे.

# आदर्श माध्यमिकचा शंभर टक्के निकाल

**विटा,ता.११(प्रतिनिधी)**

**येथील लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आदर्श माध्यमिक विद्यामंदिरचा इयत्ता दहावीचा निकाल सलग २५ व्या वर्षी १०० टक्के लागला आहे. विद्यालयातील एकूण ५६ विद्यार्थी मार्च २०२६ या एसएससी बोर्डाच्या परीक्षेसाठी बसले झाले होते. त्यापैकी ४२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. (९० टक्केपेक्षा जास्त गुण मिळणारे १० विद्यार्थी आहेत ) आणि १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत, अशी माहिती मुख्याध्यापक सुभाष धनवडे यांनी दिली.**

नंदिनी नागेश गडदरे याने ९७ टक्के गुण मिळवून प्रथम, श्लोक मानसिंग सूर्यवंशी याने ९५. ६० टक्के गुण मिळवून द्वितीय, गौरी रेवननाथ सूर्यवंशी हिने ९५.२० टक्के गुण मिळवून तृतीय, आकांक्षा हणमंत पवार हिने ९४.६० टक्के गुण मिळवून चतुर्थ तर यश केदार पवार याने ९३. ८० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळवला.

कोल्हापूर विभागीय एसएससी बोर्डामध्ये आदर्श माध्यमिक विद्यामंदिर ही एकमेव माध्यमिक शाळा आहे.गेली सलग २५ वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या विद्यार्थ्यांना संस्थेचे संस्थापक माजी आम. सदाशिवराव पाटील,संस्थेचे अध्यक्ष वैभव पाटील, पी. टी. पाटील आणि मुख्याध्यापक सुभाष धनवडे तसेच पालक यांचे प्रोत्साहन तर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन मिळाले.

# आलास–बुबनाळ विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५.६५ टक्के

**बुबनाळ,ता.११ (वार्ताहर)–**

**आलास (ता.शिरोळ) येथील कलाश्री बा.ग.पवार आलास – बुबनाळ विद्यालयाचा दहावीचा निकाल ९५.६५ टक्के लागला आहे.**

प्रशालेमध्ये ऋतुजा राजेंद्र उपाध्येने ९२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. ज्ञानेश्वरी लक्ष्मण निडगुंदेने ९१.८० टक्के गुण मिळवून द्वितीय तर स्वस्तिक मनोज दानोळे याने ९०.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. उमरफारुक रफिक जमादार याने ८९.८० टक्के मिळवून चतुर्थ तर प्रतिक्षा पिंटु कांबळे हिने ८९.२० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकावला. शाळेतील एकुण विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, प्रथम श्रेणीत १४, द्वितीय श्रेणीत ७ तर ४ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले. सर्व विद्यार्थ्यांना प्रशालेचे मुख्याध्यापक, विषय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णनः– जि. कोल्हापुर, ता.हातकणंगले, पैकी मौ. कबनूर ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतीचा क.ग.नं.८७२ क्षेत्र हे.०–२४ आर आकार रु. ३–०० पैसे यापैकी कराराने दिलेले क्षेत्र हे. ०–०४.७५ आर आकार रु.०–६० पैसे ची खुली जागा (५११२ चौ.फुट ) यांसी चतु:सिमा पुर्वेस ४० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस ओढा, दक्षिणेस–सौ.दिपाली म्हेतर यांची मिळकत, उत्तरेस–दत्तगुरु पेंडूलकर यांची मिळकत.

२) वर नमुद केलेली मिळकत ही श्री. श्रेणिक मणिकांत शहा,रा.गावभाग इचलकरंजी, फिरोजाबानू मिरासाहेब गैबान, श्री. लियाकत मिरासाहेब गैबान, श्री लतिफ मिरासाहेब गैबान, श्री.रिदवान मिरासाहेब गैबान, रा.विक्रमनगर इचलकरंजी व सौ. परवीन शकील गैबान, रा.जयसिंगपूर यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून मिळकत विक्री करणेचे ठरले आहे.सबब,वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, दावा, पोटगी अर्ज, आरक्षण, तारणगहाणदस्त अगर इतर कोणत्याही प्रकारची हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खाली नमुद केले पत्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस.

ता.११/०५/२०२६ इ.रोजीचे.

**अ‍ॅड.सुनिल सु. धुपदाळे**
**रा.१७/२९४ पुजारी मळा राजमातानगर इचलकरंजी**
**मो.नं. ९३२६०२२३८५**

# राज्यातील भटक्या विकास महामंडळाला शंभर कोटींचा निधी मंजूर–जी.पल्लवी

**निपाणी,ता.११(प्रतिनिधी)–**

**अशिक्षित भटक्या जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. भटक्या जमातींच्या मुलांसाठी राज्यात आठ विशेष वसतिगृह शाळा सुरू करण्यात येत असून, यंदाच्या अर्थसंकल्पात त्यापैकी चार शाळांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच भटक्या विकास महामंडळाला एकूण १०० कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री यांनी मंजूर केला असल्याची माहिती राज्य अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती भटक्या विकास महामंडळाच्या अध्यक्षा जी. पल्लवी यांनी दिली.**

भोज गावातील भटक्या समाजातील नागरिकांनी तालुका प्रशासन आपल्या समस्या सोडवत नसल्याची तक्रार राज्य महामंडळाकडे केली होती. या पार्श्वभूमीवर त्यांनी सोमवारी भोज गावाला भेट देऊन बैठक घेतली.

निपाणी येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत जी. पल्लवी पुढे म्हणाल्या, बहुतेक ठिकाणी भटक्या समाजाला शासकीय योजना व सुविधांची माहिती नसल्याचे आढळून येत आहे.त्यामुळे ग्रामपंचायत, नगरपालिका व नगरपरिषद हद्दीत राहणाऱ्या भटक्या समाजाच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी दर तीन महिन्यांनी त्यांच्या वस्तीत जाऊन विशेष जागृती कार्यक्रम घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

कार्यक्रमात समाजकल्याण विभागासह जिल्हा पातळीवरील विविध विभागांचा सहभाग


निपाणीत पत्रकार बैठकीत बोलताना जी.पल्लवी.

राहणार आहे. भटक्या समाजाच्या धार्मिक विधींसाठी समुदाय भवन उभारणे तसेच घरकुल बांधण्यासाठी २ लाख रुपयांची मदत दिली जात आहे. मंत्री सतीश जारकीहोळी यांनी त्यांच्या विभागातून भटक्या विकास महामंडळासाठी विशेष पॅकेज जाहीर केले आहे.

भटक्या वसाहतींमध्ये सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी देण्यात येत असून, जिल्ह्यातील सौंदत्ती येथे प्रायोगिक तत्वावर भटक्या जमातींसाठी वसाहत उभारण्यात येणार आहे.

सदर कार्य राज्याचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी.के.शिवकुमार, समाज कल्याण मंत्री एच.सी.महादेवप्पा, मंत्री सतीश जारकीहोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याचे जी. पल्लवी यांनी सांगितले.

यावेळी समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक संचालिका अर्चना साने, महामंडळाचे विशेष कर्तव्याधिकारी शशीधर, संयुक्त सचिव आनंद कुमार, अधीक्षक रविकुमार उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**मौजे तारदाळ येथील गट नं. ७४७ /ब/२३ पैकी प्लॉट नं. २३ चे क्षेत्र ९२ चौ.मी.** यासी चतु: सिमा– **पुर्वेस** – रामचंद्र हांडे यांची मिळकत, **पश्चिमेस** – रस्ता, **दक्षिणेस** – प्लॉट नं. २२, **उत्तरेस**–याच प्लॉट नं. पैकी उर्वरीत मिळकत, सदरची मिळकत ही **अक्षय नागेश गुंडला रा.शहापूर** यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी आमचे अशिलांचे कडून संचकार रक्कम '' स्वीकारून त्यांना **संचकारपत्र** करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात **चेतना नागरी पतसंस्था, शहापूर** या पतसंस्थेव्यतिरिक्त कोणाचाही कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता.११/०५/२०२६

**अ‍ॅड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

इचलकरंजी महा नगरपालिका हद्दीतील मौजे शहापुर येथील गट नंबर ४३४ पैकी प्लॉट नं २ चे क्षेत्र २३१–६९ चौरस मीटर म्हणजेच २४९२–९८ चौरस फुटची खुली मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस– १० फुट रूंदीचा समाईक रस्ता, पश्चिमेस–सुनिता कदम यांची मिळकत,दक्षिणेस–किशन तारळेकर यांची मिळकत, उत्तरेस– दत्ता यलमार यांची मिळकत सदरची मिळकत ही लता रघुनाथ वीर (रा.ठाणे) यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचा खरेदीपूर्व करार रोहीत मनोहर ढगे रा.इचलकरंजी यांना करून दिलेला आहे व त्यांनी आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना सदर मिळकतीचा करारपत्र करून दिलेला आहे.सदर मिळकती, संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर कागदपत्रासह लेखी तकार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस.

ता.१२/०५/२०२६.

**अ‍ॅड.शिवकुमार सुखदेव लकडे**
**पत्ता:– ३/१५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर**
**मो.नं. ९८८१०१४७२५**

## जाहीर नोटीस

**मिळकतीचे वर्णन– मौजे कोरोची** गावचे हद्दीतील मिळकतीचा **क.ग.नं.६३८/६३९/१ क्षेत्र हे.३–९१–३० आर,आकार रु.९–१० पैसे** पैकी ऑनलाईन ७/१२ उताऱ्याप्रमाणे संपूर्ण क्षेत्र हे.०–००–९३ आर याचा प्लॉट नं. ६/१ एकूण क्षेत्र १००० चौ. फुट ९२–९३ चौ.मी. ची खुली प्लॉट मिळकत सर्व. याचा कोरोची ग्रामपंचायत मिळकत नं.७५६४ असा नमुद आहे. यांसी चतु:सिमा – **पूर्वेस** – २० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस –सदर गट नं. पैकी प्लॉट नं. १ व २ ची मिळकत, **दक्षिणेस** – श्रीमती कुसुम कोंतीकल यांची मिळकत, **उत्तरेस** – सदाशिव अतिगीडद व सुनंदा यादवाड यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही **श्री. महादेव वीरभद्र अतिगीदड, रा. इचलकरंजी** यांची असुन यांनी ती आमचे अशीलांचे लाभात भरीव संचकार स्विकारून करारपत्र करून दिलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कोणतीही तक्रार अगर हरकत असलेस सात (७) दिवसात खाली दिले पत्त्यावर लेखी पुराव्यासह तक्रार नोंदवावी म्हणून दिली जाहीर नोटीस

ता.११/०५/२०२६.

**अ‍ॅड.सुनिल द.भोसले**
**राजाराम स्टेडियम, गाळा नं.२६, इचलकरंजी.**
**मो.नं. ९८६०८०७४८०**

## जाहीर नोटीस

**मौजे कबनूर येथील गट नंबर ६७१ पैकी अ) प्लॉट नंबर ४ चे क्षेत्र ९७ – ९३ चौ. मिटर** ची मिळकत यासि चतु:सिमा– **पुर्वेस** – प्लॉट नं. ३, **पश्चिमेस** – प्लॉट नं. ५. **दक्षिणेस** – ओघळ, **उत्तरेस** – २० फुट रस्ता. **ब) प्लॉट नंबर १५ चे क्षेत्र ७५–५८चौ.मिटर** ची मिळकत यासि चतुः सिमा पुर्वेस – रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नं. १२. दक्षिणेस – प्लॉट नं १६, उत्तरेस– प्लॉट नं १४. क) प्लॉट नंबर १६ चे क्षेत्र ७५–५८ चौ. मिटर ची मिळकत यासि चतुः सिमा पुर्वेस रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नं. ११. दक्षिणेस – प्लॉट नं १७, उत्तरेस – प्लॉट नं १५. सदर अ, ब, क मिळकत **दिव्याराणी वैभव गणाचारी व ईतर रा. इचलकरंजी** यांचे कब्जे मालकीची मिळकत त्यांनी सदर मिळकतीचे करारपत्र **१) श्री. जयदिप प्रकाश इंगवले. २) श्री. विनायक विलासराव इंगवळे. रा. दोघे . कबनूर ३ ) श्री. श्रेयश पिरगोंडा पाटील. ४) श्री. पिरगोंडा मलगोंडा पाटील रा.दोघे.इचलकरंजी** यांना व त्यांनी आमचे आशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारुन करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही

ता.११/०५/२०२६

**अ‍ॅड.आनंद प्रकाश पटवा**
**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी**
**मो.नं. ९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

१) मिळकतीचे वर्णन – शिवनाकवाडी येथील क. गट नंबर ४२४ यापैकी क्षेत्र हे ०.२०.०० आर . पॉ ., आकार रू.०. ३० पै ची शेतजमीन मिळकत यांसी चर्तुः सिमा – पुर्वेस–कुलकर्णी यांची मिळकत, पश्चिम– कैश बागवान यांची मिळकत, दक्षिण– उत्तम काटकर यांची मिळकत व उत्तर– आनंदा काटकर यांची मिळकत. येणेप्रमाणे चर्तु:सिमेतील शेतजमीन मिळकत त्यातील तदंगभूत वस्तुसह व इजमेंटरी हक्कासह सर्व यासच यापुढे सदर मिळकत असे संबोधले आहे.

२) वर नमुद मिळकत ही संध्याराणी प्रकाश घुणके रा– शिरदवाड यांच्या मालकी वहिवाटीची असुन सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून त्यांनी आमचे अशिलांना मिळकत विक्री करणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्वीकारलेली आहे व करारपत्र लिहून दिले आहे . आमचे अशिल हे ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

३) तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क सबंध, बोजा, तारण, दावा, मनाई, वगैरे हक्क असलेस ते त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून सात (७) दिवसाचे आत खाली नमुद पत्त्यावर लेखी अस्सल कागदपत्रानिशी कळवावे. मुदतीत कोणाचीही तकार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

ता.११/०५/२०२६

**अ‍ॅड.अल्ताफहुसेन एम.मुजावर**
**३/९४९/१,पिराचा मळा,गावभाग इचलकरंजी**
**मो.नं.९८५०८४२१२३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,मिळकतीचे वर्णन :– हातकणंगले येथील क.ग.नं.३०९ याचे एकूण क्षेत्र ६ हे. ९६ आर, आकार ६ रु. ५६ पै. यापैकी श्री. गोविंद परबत पटेल, श्री. गौतम देवजी पटेल यांचे मालकीचे क्षेत्र ० हे. ४१ आर व श्री. धर्मेंद्र भानजी पटेल, श्री.रवीलाल प्रेमजी पटेल व श्री. प्रविणकुमार नानजी पटेल यांचे मालकीचे क्षेत्र ० हे. ६२.७५ आर यासी एकत्रीत चतु:सिमा पुर्वेस श्री. देसाई यांची मिळकत, पश्चिमेस श्री. गांधी यांची मिळकत, दक्षिणेस– श्री. नर्मदे यांची मिळकत, उत्तरेस– रस्ता.येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत श्री. गोविंद परबत पटेल, श्री. गौतम देवजी पटेल, श्री. धर्मेंद्र भानजी पटेल, श्री. रवीलाल प्रेमजी पटेल व श्री. प्रविणकुमार नानजी पटेल यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा दिलेला आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे.

सबब वर नमुद मिळकतीवर कोणाचा काही कायदेशीर हक्क, करार, दावा, कर्ज, लिज, दान, जप्ती आदेश, अ‍ॅक्वीझिशन व रिझर्व्हेशन इ. कसलाही हक्कसंबंध असलेस तो त्यांनी ७ (सात) दिवसात खाली नोटीस प्रसिध्द करणार यांना लेखी स्वरुपात कागदपत्रासहीत कळवावा. मुदतीत कोणाची काही हरकत न आलेस मिळकत निर्वेध समजून व्यवहार पुरा केला जाईल म्हणून प्रसिध्द केली नोटीस. ता.

**अ‍ॅड.धीरज पृथ्वीराज पारख**
**१०/५, पवन रेडिमेड, तारा हॉटेल जवळ, इचलकरंजी**
**मो.नं. ९९२२०९९५६७**

## जाहीर नोटीस

**तमाम लोकांना कळविणेत येते की,**

आमचे अशिल **श्री अरुण रावसाहेब पाटील, रा. अब्दुललाट** यांनी दिले माहितीवरुन व दाखविले कागदपत्रावरुन जाहीर नोटीस देणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :** शहर इचलकरंजी येथील रि.स.नं. २२५/२, क्षेत्र हे. ०.६० आर, आकार रु. ७.४४ पैसेची पुरे सर्व्हे नंबरची जमिन त्यापैकी हे.०.१६ आर, आकार रु. १. ९८ पैसेची जमिन यासी चतु:सिमा पुर्वेस – श्री पाटील यांची शेत जमिन, पश्चिमेस – जाणे येणेचा सरकारी रस्ता, दक्षिणेस– रि.स.नं. २२५/३ ची सदानंद दळवाई यांची जमिन व उत्तरेस– आनंदा भोरे यांची जमिन. येणेप्रमाणे चतु:सिमेतील.

वर्णन केलेली मिळकत व त्यामधील तदंगभूत वस्तुसह सर्व जमीन

२) वर वर्णन केलेली जमिन ही **शोभा रमेश पुजारी व आनंदी सुरेश पुजारी रा. २/१०९६/५, चांदणी चौक, इचलकरंजी** यांचे मालकी वहिवटीची असून त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना विक्री करणेचा करार केला असून या व्यवहारापोटी संचकार रक्कम ही स्विकारली आहे. तसे त्यांनी सदरची मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा दिला आहे.

**३)** तरी सर्वांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सदर मिळकतीवर कोणाचा कर्जबोजा, गहाण, तारण, करार, मदार, वहिवाटीचा किंवा पोटगी, अ‍ॅटॅचमेंट वगैरे कांही हक्क असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाचे आत आमचे अशिलांचे वर दिले पत्यावर संपर्क साधून आपल्या हक्काची कागदपत्रासह खात्री पटवावी. वरील मुदतीत कोणाची कसलीही तक्रार न आलेस मुदतीनंतर आमचे अशिल खरेदीचा व्यवहार करतील. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस सही

तारीख ११/०५/२०२६.

**अ‍ॅड.बी.ए.देसाई**
**२/४७/१, राजलक्ष्मी अपार्टमेंट, दत्त मंदीर समोर, नदीरोड, इचलकरंजी, मोबा.नं.९८५०८२९४३२**



बालाजी ऑलिंपियाड अकॅडमीच्या दहावी परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मदन कारंडे,महेश कोळीकाल व इतर मान्यवर.

## श्री बालाजी ऑलिंपियाड अकॅडमीचा १०० टक्के निकाल

इचलकरंजी,ता.११–

**येथील श्री बालाजी ऑलिंपियाड अकॅडमी इचलकरंजीचा सन २०२५–२६ चा एसएससीचा निकाल १०० टक्के इतका लागला असून समर्थ संतोष पाटील याने ९६.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, सृजन सुनिल मानकर याने ९६.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, श्रवण संतोष कुरुंदवाडे याने ९५.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.**

अनुष्का सुहास तारळेकर हिने ९४.२३ टक्के गुण पटकावून चौथा तसेच श्रेयश संतोष करडे व हर्षवर्धन दिलीप पोवार यांनी ९३.६० टक्के गुण मिळवून प्रशालेत पाचवा क्रमांक मिळवून अकॅडमीचे नाव उज्वल केले. या सर्व विद्यार्थ्यांना अकॅडमीच्या सर्व विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले तर अकॅडमीचे चिफ को–ऑर्डिनेटर डी.वाय नारायणकर यांची प्रेरणा लाभली.सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष मदनराव कारंडे ,सेक्रेटरी महेश कोळीकाल,मुख्याध्यापिका सौ.एम.एस, रावळ, उपमुख्याध्यापक डी.वाय. नारायणकर व एच.ओ. डी.सौ. प्रियांका चौगुले यांनी पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी अकॅडमीतील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर वृंद उपस्थित होते.

## राज्यस्तरीय गझल संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसाद कुलकर्णी

इचलकरंजी ता. ११–



**छत्रपती संभाजीनगर येथे रेणुका गझल मंचच्या वतीने होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय गझल संमेलनाच्या अध्यक्षपदी नामवंत गझलकार प्रसाद माधव कुलकर्णी यांची निवड झाली आहे. हे संमेलन रविवार ता.१७ मे २०२६ रोजी होणार आहे. या संमेलनाचे उद्‌घाटक ज्येष्ठ गझलकार बापू दासरी ( नांदेड) हे आहेत.**

या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.शेख इक्बाल मिन्ने (छ.संभाजीनगर) आणि प्राचार्य सतीश देवपूरकर (पुणे) हे लाभले आहेत.या संमेलनाच्या विविध सत्रांमध्ये संजय पवार (छ.संभाजीनगर),गौतम सुर्यवंशी (परभणी),रेखा तांबे (वडोदरा),डॉ.राज रणधीर (जालना), बाळासाहेब गिरी (नाशिक), सुवर्णा मुळजकर (परभणी),डॉ.प्रशांत पाटोळे(पुणे),अंजली दीक्षित पंडित (छ.संभाजीनगर),प्रतिभा विभूते (पुणे) यांच्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातील गझलकार सहभागी होणार आहेत,असे रेणुका गझल मंचचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. रे.भ.भारस्वाडकर (छ.संभाजीनगर)आणि समन्वयक आत्माराम कदम (मुंबई ),संयोजन समितीचे कार्याध्यक्ष शैलेंद्र भणगे, अध्यक्ष संजय पवार आणि कोषाध्यक्ष दत्तात्रय ठुबे यांनी जाहीर केले आहे.



रामभाऊ जगताप हायस्कूलच्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका सौ.गीता खोचरे, मुकूंद फाटक व इतर.

## रामभाऊ जगताप हायस्कूलचा निकाल १०० टक्के

इचलकरंजी,ता.११–

**आदर्श शिक्षण मंडळ संचलित, रामभाऊ जगताप हायस्कूलचा माध्यमिक शालांत परिक्षेचा निकाल १०० टक्के लागला. सारा निवास मिणेकर ९१.४०टक्के , चि. संकेत ज्ञानेश्वर हावळ ९०.४०टक्के , प्रणव महेश शितोळे ८९.०० टक्के मिळवून गुणानुक्रमे आले.**

आदिती भंडारे मराठी ९६, सारा मिणेकर, प्रेरणा हर्षेवाल हिंदी ९५, सानवी दोपारे इंग्रजी ९३, प्रणव शितोळे गणित ९६, संकेत हावळ विज्ञान ८८, मंथन परीट समाजशास्त्र ९० असे गुण मिळवून विषयात प्रथम आले.या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष मुकुंद फाटक, उपाध्यक्ष संजय होगडे, उपाध्यक्ष पवन लोकरे, कार्याध्यक्ष रमेश मर्दा, विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष डी. एम. बिरादार, गोवर्धन बोहरा, सौ.शकुंतला जाधव,कार्यवाह सौ.मीनाक्षी तंगडी, सर्व संचालक मंडळ,आदर्श विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. गीता खोचरे, हायस्कूलचे मुख्याध्यापक अशोक शिंदे, सर्व शिक्षक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले.

# चांदी उद्योजकांना 'अधिक' महिन्याची आस

## परंपरेमुळे बाजारपेठेत चैतन्य येण्याची चिन्हे

हुपरी,ता.११ (महेश कळंत्रे)–

**जागतिक घडामोडींमुळे चांदीच्या दराने गाठलेली उच्चांकी पातळी आणि त्यातून आलेली मंदीची छाया आता 'अधिक मासा'मुळे दूर होताना दिसत आहे. गेल्या वर्षभरापासून मागणी घटल्याने चिंतेत असलेल्या हुपरीच्या चांदी उद्योगाला धार्मिक परंपरांच्या जोरावर पुन्हा एकदा झळाळी मिळाली आहे.**

**परंपरेचा 'रुपेरी' साज**

हिंदू संस्कृतीत तीन वर्षांतून एकदा येणाऱ्या अधिक महिन्यात जुनी जोडवी बदलून नवीन घेण्याची प्रथा आहे. चांदीचे दर वधारलेले असूनही जोडवी, वेडणी, बिछवा व मासोळी यांसारख्या दागिन्यांच्या



खरेदीसाठी महिलांची गर्दी वाढत आहे. ग्राहकांचा कल ओळखून कारागिरांनी आकर्षक व कमी वजनाचे नवनवीन डिझाइन्स बाजारात आणले आहेत.

**जावयाचा मान आणि 'वाण'**

महाराष्ट्रात अधिक महिन्यात जावयाला चांदीचे ताट,वाटी, पेला किंवा नाणी 'वाण' म्हणून देण्याची पद्धत आहे. दरवाढीमुळे बजेट कोलमडले असले तरी, परंपरा जपण्यासाठी कमी वजनाच्या वस्तू आणि पूजेच्या साहित्याला मागणी वाढली आहे. तसेच दीपदानासाठी चांदीचे निरंजन व समईंची आगाऊ नोंदणी होत असल्याने बाजारपेठेत चैतन्य आहे.

**कारागिरांना मोठा दिलासा; रात्रंदिवस काम सुरू**

लग्नसराईतही अपेक्षेप्रमाणे उलाढाल न झाल्याने कारागीर अडचणीत होते. मात्र, अधिक महिन्यासाठी एक महिना आधीच ऑर्डर्स आल्यामुळे कारागीर सध्या रात्रंदिवस जोडवी तयार करण्यात मग्न आहेत. कारखान्यांमध्ये पुन्हा एकदा मोठी लगबग पाहायला मिळत आहे.

वाढलेल्या दरांचा फटका ग्राहकांच्या खिशाला बसू नये, यासाठी हुपरीच्या बाजारपेठेत यंदा मोठा बदल झाला आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार यावर्षी पहिल्यांदाच ५ ग्रॅमची जोडवी तयार केली जात आहेत. कमी वजनातही आकर्षक नक्षीकाम उपलब्ध झाल्याने या दागिन्यांना विशेष मागणी आहे.

> 'चांदीच्या वाढत्या भावामुळे ग्राहक लांब होता, मात्र अधिक महिन्यातील धार्मिक खरेदीमुळे बाजारपेठेत वर्दळ वाढली आहे. जावयाला वाण आणि दीपदानासाठी दिव्यांना मोठी मागणी असून,या हंगामात हुपरीत मोठी उलाढाल होईल,असा विश्वास आहे.''
>
> **श्री. मोहन खोत**
> (अध्यक्ष, हुपरी चांदी हस्तकला उद्योग विकास फाउंडेशन)

## कविता कुपवाडे यांना पीएच.डी

सांगली,ता.११(प्रतिनिधी)–



**मिरज तालुक्यातील सावळी येथील प्राध्यापक कविता विजय कुपवाडे–वंटे यांना शिवाजी विद्यापीठातर्फे नुकतीच पीएच.डी पदवी मिळाली आहे.**

प्रा. कुपवाडे यांनी 'पश्चिम महाराष्ट्रातील नाट्य चळवळीचा इतिहास विसावे शतक' या विषयावर इतिहास अभ्यास, संशोधन करून प्रबंध सादर केला होता.प्रा. कुपवाडे यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण इचलकरंजी येथे झाले आहे. पीएचडीसाठी त्यांना डॉ. प्रमोदकुमार ओलेकर, शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभाग प्रमुख डॉ.अवनीश पाटील,डॉ. भारतभूषण माळी,डॉ.कविता गंगराणी तसेच सांगलीतील ज्येष्ठ नाट्यकर्मींचे मार्गदर्शन मिळाले. डॉक्टरेट मिळाल्याबद्दल सावळी ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# नृसिंहवाडीत लग्न,उपनयन सोहळे उरकून घेण्यासाठी गर्दी

## अधिक मासामुळे सनई चौघड्यांचे मंजुळ स्वर महिन्यानंतर कानी पडणार

नृसिंहवाडी,ता.११(वार्ताहर)

**ज्येष्ठ अधिक मासास रविवारी ता.१७ मे पासून सुरुवात होत असून हा अधिक मास १५ जूनपर्यंत असल्याने या काळात लग्न, उपनयन, वास्तुशांती मुहूर्त नसल्याने अधिक मासापूर्वीच लग्न, उपनयन सोहळे उरकून घेण्यासाठी नृसिंहवाडी येथे व्हराडी मंडळी गर्दी करत असून फोटोग्राफर सनई चौघडा,घोडेवाले, बॅन्ड व्यावसायिक तसेच हॉटेल मंगल कार्यालय यांना सुगीचे दिवस आले आहेत.या अधिक मासामुळे सनई चौघड्याचे मंजुळ स्वर एक महिन्यानंतर कानी पडणार आहेत.**

दर तीन वर्षानंतर अधिक मास येत असतो.धार्मिक भाषेत याला पुरषोत्तम मास म्हटले जाते.भगवान विष्णूला समर्पित हा महिना असून या काळात ३३ ब्राह्मण सवाष्ण बटु भोजन घालण्यास विशेष महत्व आहे तसेच घरातील ज्येष्ठ जावई यांना वाण ही देण्यात येते.या काळात येथे होणारे शांत विधी तसेच नारायण बली त्रिपिंडी श्राध्द सारखे विधी करण्यास कोणतेही बंधन नाही, असे ज्योतिष विषारद सुकृत पुजारी यांनी सांगितले असून कर्मकांड विधीमध्ये भगवान विष्णूची पुजा करून पिंडदान करण्यासाठी हा काल योग्य असल्याचे नमुद केले.

सध्या मे महिना सुरू असून शाळा हायस्कूल यांना सुट्ट्या लागल्या आहेत. यामुळे नृसिंहवाडीमध्ये गर्दी होत असून उपनयन, लग्न मुहूर्तावर अनेक भाविक,व्हराडी मंडळी यांची लगबग सुरु असून येथे होणारे लग्न विधी,उपनयन, संस्कार शास्त्रोक्त पध्दतीने केले जातात तसेच येथे होणारे सुग्रास भोजन व्यवस्था व क्षेत्र महत्व यामुळे गर्दीचे प्रमाण वाढले आहे.

१७ मे ला अधिक मास सुरु होणार असून १५ जुनपर्यंत हा महिना असून या काळत लग्न,उपनयन मुहूर्त नसतात तसेच जून महिन्यात शाळा सुरू होतात यामुळे लगीनघाई लवकरच उरकावी याकडे कल असून या काळात शुभकार्य आवरण्यासाठी भाविक गर्दी करत असून १५ जूननंतर सनई चौघड्यांचे मंजुळ स्वर पुन्हा कानावर ऐकू येणार आहेत.

## न्यू इंग्लिश स्कूल यळगूडचा निकाल ९८.१४ टक्के

यळगूड,ता.११(वार्ताहर)–

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांचे मार्फत मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी. बोर्ड परिक्षेमध्ये यळगुड येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, यळगुड मधील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. सदर परीक्षेत प्रविष्ट झालेल्या ५४ विद्यार्थ्यांपैकी ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले व विद्यालयाचा निकाल ९८.१४ टक्के इतका लागला.**



हर्षल खोत राजनंदिनी झुंजार सानवी कुंभार

सेमी इंग्रजी माध्यमातून विद्यालयाचा विद्यार्थी हर्षल बाबासाहेब खोत याने ९३. ६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक, कु.राजनंदिनी बाळकृष्ण झुंजार हिने ९२.६० टक्के मिळवून द्वितीय क्रमांक ,कु.सानवी शांतिनाथ कुंभार हिने ९०.८०टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. तसेच मराठी माध्यमातून प्रथमेश सागर शिंदे याने ७८.२० टक्के गुण मिळवून प्रथम , इंद्रजीत सूर्यकांत कोळी याने ६९.४०टक्के गुण मिळवून द्वितीय व वैष्णवी प्रकाश साळुंखे हिने ६६.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.सदर परिक्षेत प्रविष्ट झालेल्या ५४ विद्यार्थ्यांपैकी ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना संदीप पोवार, सौ.धनश्री कोळी , सौ.स्मिता कोळी ,अर्चना झंझोळे,कु.पल्लवी पाटील, सौ.माधुरी पाटील यांचे मार्गदर्शन तर लेखनिक श्री.माळी,सेवक पुजारी यांचे सहकार्य लाभले.विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्या. माणिक कोरे यांनी अभिनंदन केले.

## वाळवे खुर्द येथे रंगला शाहिरीचा जागर

बिद्री,ता.११(प्रतिनिधी)–

**वाळवे खुर्द ता.कागल ) येथे ही रात्र शाहिरांची या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नामवंत शाहिरांनी त्यांच्या कलेचे सादरीकरण करुन उपस्थितांची वाहवा मिळविली.**

लोककलाकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विलास पाटील–बेलवळेकर यांच्या हस्ते शाहिरी कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. सहभागी शाहिरांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी सरपंच संगीता बोडके,हणमंत सुतार, जगदीश पाटील, भरत पाटील, संजय पाटील आदी उपस्थित होते.


आजच मंगळवार दि. १२ मे २०२६ रोजी रात्री ठीक ९ वाजता
श्रध्दा इन्स्टिट्यूट हॉल, मंगळवार पेठ, रिक्रिएशन हॉलजवळ, इचलकरंजी.
मनोरंजन मंडळ, इचलकरंजी | श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन
रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल
मनोरंजन व प्रबोधन (वर्ष ४८ वे)
व्याख्यानमाला २०२६



मा. अतुल कहाते, पुणे
(प्रसिद्ध लेखक, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र तज्ज्ञ)
AI चे अदभूत विश्व
प्रायोजक TJS सोनेरी क्षणांसाठी मे. तुळजाराम सुरचंद शहा
सहप्रायोजक
शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, यड्राव | शुभम डायनिंग, इचलकरंजी
कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, हुपरी
दि लक्ष्मी को-ऑप. प्रोसेसर्स लिमिटेड, इचलकरंजी
लक्ष्मीदत्त मंडप प्रा. लिमिटेड, इचलकरंजी (अभिजीत व अविनाश विनायक होगाडे)
गुरुकुल शिक्षण समुह, अ. लाट - इचलकरंजी | डी. एम. कस्तुरे चॅरिटेबल फौंडेशन
बालमुकुंद रामाकिसन तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट, इचलकरंजी
किरण गॅस एजन्सीज, इचलकरंजी - एच.पी.गॅस वितरक
चौगुले डेअरी प्रॉडक्टस्, इचलकरंजी - अभय दूध | स्वीटस् | बेकरी | नमकीन
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सह. बँक लि.(शेड्यूल्ड बँक) इचलकरंजी
रसिकांनी मित्र परिवारासह जरूर यावे ही आग्रहाची विनंती !



श्रीहरी
शुक्रवार, ता. ८/०५/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
गलत संबंधी
जबदस्त रोमॅंटीक हिंदी चित्र दुपारी ७ वा.
A मेहबूब प्रौढांसाठी



श्रीदत्त
शुक्रवार, ता. ८ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
रोड शो डायरी
A फक्त प्रौढांसाठी A



पंचवटी DOLBY DIGITAL PLUS 7.1 महिलांच्या वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा
नवीन प्रोजेक्टरसहीत फुल्ल एच.डी.
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
bookmyshow
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
रोज ४ खेळ सकाळी ११.३०
दुपारी ३ सायं. ६.३० व रात्री १० वा.








५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
वाढत्या गर्दीचा २ आठवडा
रोज ४ खेळ *११.३० *३ *६.१५*९.३० वा.






कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.१ पा.
दु.१२ वा., दु.३.३० वा., सायं.६.३० वा.,






गुरु शुक्रवार ता.८ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ ११.३० * ३ * ६.३० व १० वा.
महिला व बच्चे कंपनीसह शिवप्रेमींच्या
प्रचंड गर्दीचा २ रा आठवडा






RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow




राजा शिवाजी (मराठी)
10:00 AM, 11:30 AM
12:30 PM, 01:45 PM
03:15 PM, 05:15 PM
07:00 PM, 09:00 PM
10:15 PM
मॉर्टल कोम्बॅट II (हिंदी)
04:30 PM
" भूत बंगला "- हिंदी
07:15 PM
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच



फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11




राजा शिवाजी
(MAR) (U/A)
10.30am, 12.00,
02.00, 03.30,
05.30, 07.00,
09.00, 10.30pm
आता पहा राजा शिवाजी मूवी खास कमी केलेल्या दरात

# चांदोलीच्या पर्यटनाला मद्यपी पर्यटकांचा त्रास

## पोलिस व वन विभागाचे दुर्लक्ष;उपाययोजना आवश्यक

चांदोली,ता.११(वार्ताहर)-

**चांदोली परिसरातील पर्यटन दिवसेंदिवस वाढत असताना सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. सुटीच्या दिवशी तसेच आठवड्याच्या शेवटी म्हणजेच शनिवार, रविवार येथे पर्यटकांची मोठी गर्दी होत असून काही मद्यपी पर्यटकांच्या बेजबाबदार वर्तनामुळे स्थानिक नागरिक व इतर पर्यटक त्रस्त होत आहेत.**




वारणा नदी परिसरात व धरणालगतच्या भागात दररोज अनेक पर्यटक पार्टी करण्याच्या निमित्ताने येत आहेत. मात्र यातील काही पर्यटकांच्या मद्यप्राशन करून गोंधळ घालणे, काचांच्या बाटल्या फोडून परिसर अस्वच्छ करणे, तसेच धोकादायक कृत्ये करणे अशा प्रकारांमध्ये वाढ होऊ लागली आहे. यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून अनेकांना दुखापती झाल्याच्या घटनाही घडू लागल्या आहेत.या परिसरात पोलिस व वन विभागाचे दुर्लक्ष असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. येथे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसल्याने पर्यटकांकडून नियमांचे उल्लंघन सर्रास होत आहे.

धरण परिसरात फुटलेल्या काचांचा खच साचला असून त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे.यापूर्वीही येथे अनेक दुर्घटना घडल्या आहेत. त्यामुळे सुमारे २२ लाख रुपये खर्चून उखळू चेक नाक्यावर पोलिस चौकी बांधण्यात आली आहे. मात्र ही चौकी नावापुरती उरली आहे. धरणाच्या पायथ्याला सांगली पोलिस चौकी आहे. धरण परिसरात कोणतीही दुर्घटना घडली की, शाहूवाडी की कोकरूड पोलिस असा हद्दीचा प्रश्न निर्माण केला जातो. दोघांच्या दुर्लक्षामुळे येथील पर्यटनाला बेशिस्तीचे ग्रहण लागले आहे.

**चांदोली पर्यटन सुरक्षिततेसाठी या उपाययोजनांची गरज**

धरण परिसर, वारणा नदीकाठ व पर्यटनस्थळी कायमस्वरूपी पोलिस बंदोबस्त ठेवावा. उखळू चेक नाक्यावरील पोलिस चौकी तातडीने पूर्णवेळ कार्यरत करावी. शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी विशेष पोलिस गस्त वाढवावी. मद्यप्राशन करून गोंधळ घालणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी. मद्यपान व काचांच्या बाटल्यांवर बंदी लागू करावी.वन विभाग व पोलिसांनी संयुक्त नियंत्रण पथक तयार करावे. पर्यटनस्थळी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सतत देखरेख ठेवावी. धोकादायक ठिकाणी इशारा फलक व सुरक्षा सूचना लावाव्यात. पर्यटकांसाठी हेल्पलाईन क्रमांक व आपत्कालीन मदत केंद्र सुरू करावे. नियमित स्वच्छता मोहीम राबवावी.

# नवे सांस्कृतिक राजकारण आणावे लागेल

## संभाजी भगत; विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन उत्साहात

सातारा,ता.११(प्रतिनिधी)-

**ऐतिहासिक सातारा शहरात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेले १५ वे विद्रोही साहित्य संस्कृती संमेलन यशस्वीपणे पार पडले.**

या संमेलनाच्या समारोप सत्रात संमेलनाचे अध्यक्ष लोकशाहीर संभाजी भगत,कॉ.सुबोध मोरे, अॅड.वर्षाताई देशपांडे,वाहरु सोनवणे, अविनाश कदम आणि कॉ.धनाजी गुरव यांची भाषणे झाली. देशातील नवं आणि पर्यायी सांस्कृतिक राजकारण स्त्रियांच्या खांद्यावरुन येणार आहे. नव्या युगाचं नवं सांस्कृतिक राजकारण सर्व समाजवादी, आंबेडकरवादी इत्यादींना सोबत घेण्यासाठी समिती करुन नेत्यांना भेटणार आहे. नवं सांस्कृतिक राजकारण आपल्या सर्वांना मिळूनच आणावं लागेल, असे प्रतिपादन संभाजी भगत यांनी केले. यावेळी लोकशाहीर संभाजी भगत यांनी ये हिटलर के साथी हे गीत सादर केलं.

**विचारधारा संपलेल्या पक्षांना विचार दिला पाहिजे-अॅड.वर्षाताई देशपांडे**

एकमेकांसोबत असणारी मंडळी आपण सोबत आलोत ही चांगली गोष्ट आहे. आपल्याच मुलांचा आज बुद्धीभेद केला जातोय, त्यांना आमच्या समोर उभे केले जात आहे. या मुलांना परत आणण्यासाठी त्यांच्या पालकांकडे जावे लागेल. पालकांशी बोलून त्यांना आपल्या वारशाची जाणीव करुन देऊन मुलांना परत आणले पाहिजे, असे वर्षाताई देशपांडे यांनी म्हटले.

**विद्रोही चळवळ कृतीशील करुया –अविनाश कदम**

विद्रोही चळवळीची पद्धत बदलायला पाहिजे का याचा विचार केला पाहिजे. सांस्कृतिक राजकारण कसं केलं पाहिजे, चळवळ तळागाळात कशी पोहोचेल, रस्त्यावरचा, वस्त्यांवरचा माणूस चळवळीत कसा येईल यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे.लोक स्वतःहून चळवळीत कृतीशील सहभागी होतील यासाठी संकल्प करुया, असं विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे प्रवक्ते अविनाश कदम यांनी म्हटले.

यावेळी वाहरुभाऊ सोनवणे, धनाजी गुरव, कॉ.सुबोध मोरे यांनी मार्गदर्शन केले. कॉ.गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. नुकत्याच झालेल्या पुस्तकावरुन झालेल्या वादानंतर त्यांनी शिवाजी कोण होता? हे पुस्तक लाखो वाचकांपर्यंत आणि शिवप्रेमींपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला आहे. यानिमित्ताने प्रशांत आंबी यांचा सत्कार करण्यात आला.

**विकास लवांडे यांच्यावरील शाईफेकीचा निषेध**

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या माध्यमातून खरे विचार मांडण्याचे काम विकास लवांडे यांनी केले.जातीयवादी वक्त्यान त्यांच्यावर शाईफेक केली आहे त्या भ्याड कृतीच्या निषेधाचा ठराव १५ वे विद्रोही साहित्य संमेलनाच्यावतीने करण्यात आला.

समारोप सत्रात संमेलन संयोजन समितीचे डॉ. प्रशांत पन्हाळकर, अॅड.राजेंद्र गलांडे, दिनकर दळवी, अॅड.सत्यवान कमाने, प्रा. डॉ.आर.के.चव्हाण, आयु. हणमंत सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. संमेलनातील विविध ठराव कॉ.धनाजी गुरव यांनी मांडले, ते मंजूर करण्यात आले. या ठरावांची अंमलबजावणी व्हावी यासाठी कालमर्यादा घालून त्यासाठी प्रयत्न करावेत, त्याची अंमलबजावणी न झाल्यास आंदोलनाचा मार्ग निवडला पाहिजे, असा ठराव यावेळी करण्यात आला.

# मलकापूरला झोपडीपट्टीमुक्त करणार-आ.भोसले

कराड,ता.११(प्रतिनिधी)-

**केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने मलकापूरला झोपडीमुक्त विकासाचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही आ.डॉ.अतुल भोसले यांनी दिली.**

मलकापूर (ता.कराड) पालिकेतर्फे आगाशिवनगर येथे प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून पक्की घरे उपलब्ध करून देण्यासाठी अतिक्रमण नियमितीकरण प्रक्रियेंतर्गत झोपडीपट्टी वासीयांचे अर्ज भरण्याच्या उपक्रमाचा प्रारंभ झाला. त्यावेळी आ.डॉ.भोसले बोलत होते. तहसीलदार कल्पना ढवळे, नगराध्यक्ष तेजस सोनवले, उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे, बांधकाम सभापती हणमंतराव जाधव, नियोजन सभापती सूरज शेवाळे, आरोग्य सभापती धनंजय येडगे, महिला व बालकल्याण सभापती गीतांजली पाटील,उपसभापती गीत साठे, मुख्याधिकारी कपिल जगताप, सुहास कदम, प्रमोद शिंदे, कल्पना रैनाक, ज्योत्स्ना शिंदे, राजश्री जगताप, डॉ.स्वाती थोरात, दीपाली पवार, सीमा सातपुते, सुनीता पोळ, विद्या थोरवडे, दिनेश रैनाक आदी उपस्थित होते.

आ.डॉ.भोसले म्हणाले, नागरिकांनी २८ वर्षे घरांची प्रतीक्षा केली आहे. त्यांना सुसज्ज दालन हक्काचे घर मिळावे, हा संकल्प आहे. त्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला जाणार आहे.पुढील दोन वर्षांत झोपडपट्टीवासीयांना हक्काची घरे मिळावीत, यासाठी कटिबद्ध आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करू.



उपनगराध्यक्ष शिंदे म्हणाले, आगाशिवनगर परिसरातील जागेच्या प्रशासकीय प्रक्रियेमुळे नागरिकांना यापूर्वी अडचणी येत होत्या. मात्र,आता पालिकेच्या माध्यमातून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. वाढीव कुटुंबाप्रमाणे गृहसंकुल प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात येईल.नगराध्यक्ष सोनवले यांनीही मनोगत व्यक्त केले.ज्ञानदेव साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. गुणवंत भोसले यांनी आभार मानले.

# नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ द्यावा

## आम.देशमुख; सांगाव येथे महसूल शिबीर उत्साहात

शिराळा,ता.११(प्रतिनिधी)-

**शिराळा तालुक्यातील सागांव येथेशिराळा तहसील कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने "छ.शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर" उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये १५ पेक्षा अधिक महसुली सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.**

यावेळी बोलताना आम. सत्यजित देशमुख यांनी महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना नागरिकांची कामे वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील राहावे, असेही त्यांनी सांगितले.



छ.शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीरप्रसंगी उपस्थित आम.सत्यजित देशमुख, नगराध्यक्ष ममता वराडकर, तहसिलदार शामला खोत-पाटील व इतर मान्यवर.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मालवण नगराध्यक्षा ममता वराडकर होत्या. व्यासपीठावर तहसिलदार शामला खोत-पाटील, सरपंच अस्मिता पाटील,नायब तहसिलदार अस्लम जमादार, कृषी अधिकारी किरण पवार तसेच महसूल, कृषी, आरोग्य, महावितरण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यामध्ये सहाय्यक महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, महसूलसेवक, लाभार्थीमान्यवर,पदाधिकारी, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कसणी परिसरातील पुनर्वसन रखडल्याने ग्रामस्थांत तीव्र नाराजी

ढेबेवाडी,ता.११(प्रतिनिधी)-

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन क्षेत्रातील कसणीखालील वाड्या-वस्त्यांच्या पुनर्वसनचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, मंत्रालयात झालेल्या बैठकीतील ठरावांची अद्याप अंमलबजावणी न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**

वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून पुनर्वसन प्रक्रिया नेमकी कुणी थांबवली, याची चौकशी करून ती तातडीने सुरू करावी, अशी मागणी होत आहे.मानव-वन्यप्राणी संघर्षाचा सर्वाधिक फटका बसणाऱ्या कसणी परिसरातील धनगरवाडा, सतीचीवाडी मस्करवाडी, बौद्धवस्ती आणि निनाईवाडी या वाड्यांच्या विशेष पुनर्वसनाबाबत १७ जुलै २०२५ रोजी मंत्रालयात बैठक झाली होती. बैठकीनंतर वन्यजीव विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात आले; मात्र कोल्हापूर कार्यालयाकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नसल्याची माहिती समोर आली आहे.या भागात वाघ, बिबटे, गवे, रानडुक्कर, माकडे व इतर वन्यप्राण्यांचा मोठा वावर असून शेती, पशुधन व फळपिकांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे अनेकांना शेती पडीक ठेवावी लागत असून, उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे पुनर्वसन रखडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



आष्टा:वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांचे स्वागत करताना डॉ.अण्णासाहेब डांगे,अॅड.चिमण डांगे,विश्वनाथ डांगे व मान्यवर.

# डॉ.डांगे शिक्षण संकुलास मंत्री संजय सावकारे यांची भेट

आष्टा,ता.११(प्रतिनिधी)-

**संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या आष्टा येथील डॉ. अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुलास महाराष्ट्राचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी सदिच्छा भेट दिली.**

शिक्षण, संस्कार, शिस्त आणि आधुनिकतेचा सुंदर संगम साधणाऱ्या या संकुलाला दिलेल्या भेटीदरम्यान त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती घेतली तसेच संकुलातील विविध विभागांना भेट देऊन पाहणी केली.यावेळी महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री व संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब डांगे यांच्या हस्ते मंत्री सावकारे यांचे स्वागत व सत्कार झाला. यावेळी संस्थेचे सचिव अॅड.राजेंद्र उर्फ चिमण डांगे, सहसचिव विश्वनाथ डांगे, विविध शाखांचे प्राचार्य,विभागप्रमुख, शिक्षकवृंद, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

# निसर्ग संस्कार शिबिरास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

कराड,ता.११(प्रतिनिधी)-

**मोबाईलला सुट्टी अन् निसर्गाशी गट्टी हा संदेश घेऊन येथे निवासी निसर्ग संस्कार शिबिर झाले. शहरातील सुमारे ५० विद्यार्थी त्यात सहभागी झाले.**

एन्व्हायरो फ्रेंड्स क्लब, छत्रपती शिवाजी उद्यान ग्रुपच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आली.वन्यजीव अभ्यासक रोहन भाटे, अॅड.संभाजीराव मोहिते, डॉ.सुधीर कुंभार, डॉ.एस.एस.पाटील, एम.बी.शिंदे, डॉ.अमोल पाटील, रमेश पवार, दत्तप्रसाद कदम, वर्षाराणी पवार, राजेंद्र कदम यांनी पक्षी, फुलपाखरू, प्राणी आदींची माहिती दिली.यशस्वितेसाठी अध्यक्ष प्रा.जालिंदर काशीद, ए.आर.पवार आदींनी परिश्रम घेतले.

# सांगलीत 'चांदणे शब्द सुरांचे' कार्यक्रम उत्साहात

## आकाशवाणीच्या मान्यताप्राप्त कलाकारांच्या सुमधूर सादरीकरणाला रसिकांचा प्रतिसाद

सांगली,ता.११(प्रतिनिधी)-

**आकाशवाणी या देशव्यापी संस्थेच्या नव्वद वर्षपूर्तीनिमित्त आकाशवाणी सांगलीच्या वतीने चांदणे शब्द सुरांचे हा विशेष रंगमंचीय कार्यक्रम नुकताच पार पडला. सांगलीच्या लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या अॅड. केशवराव आप्पाजी चौगुले सभागृहातील या कार्यक्रमात यशश्री जोशी, ओंकार कुष्टे आणि श्रीरंग जोशी या आकाशवाणीच्या मान्यताप्राप्त कलाकारांनी मूळ आकाशवाणीच्या निर्मित विविध लोकप्रिय गीते तसेच काही नवीन गीते सादर करुन रसिकांची वाहवा मिळवली.**

चांदणे शब्द सुरांचे, काय मागू, जखडून




टाकतो, सकाळीच तू, अशा आशयसंपन्न नवीन गीतांना गायकांनी दिलेले भाव स्वर आणि साथीदार वादकांनी समरसून केलेली साथ रसिकांना सुखावून गेली. शुक्रतारा, चांदणे शिंपीत जाशी, जयोस्तुते ही आजही लोकप्रिय असलेली वैविध्यपूर्ण गीते, संतवाणीतील भीमसेन जोशी यांनी अजरामर केलेले अभंग या सर्व सुरुवातीला आकाशवाणीच्या माध्यमातून सादर झाल्या होत्या.

प्रशांत भाटे-सिंथेसायझर,केदार सांभारे- हार्मोनियम, विनायक हसबनीस-तबला, मयूर जोशी-तालवाद्ये यांची साथ-संगत श्रोत्यांच्या स्मरणात राहिली. शशांक लिमये यांनी आकाशवाणी या संस्थेच्या वाटचालीचा इतिहास ओघवत्या निवेदनातून मांडला. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार मंगेश मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सहाय्यक केंद्र संचालक तथा कार्यक्रम प्रमुख श्रीनिवास जरंडीकर, कार्यक्रम अधिकारी श्रीमती तेजा दुर्वे आणि प्रसारण अधिकारी मुकसित मुजावर उपस्थित होते.लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या मॅनेजमेंट कौन्सिलचे अध्यक्ष शांतिनाथ कांते, उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील आणि श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. लाडगांवकर यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला तांत्रिक मार्गदर्शन श्रीमती अर्चिता ठेरे यांचे लाभले. बाजीराव काशिद आणि सुखदेव बागल यांनी तांत्रिक सहकार्य केले.राकेश शिंदे, सचिन कोळी,लक्ष्मण सोनवणे यांनी रंगमंच व्यवस्थापन केले. महेश भिसे आणि महेश इनामदार यांनी कार्यक्रमानंतर श्रोत्यांशी संवाद साधला.प्रमोद भोसले,लक्ष्मण शेवाळे, संभाजी पवार, वरदा हसबनीस, शुभांगी चव्हाण, मधुरा पुजारी, राहुल पाटील, समृद्धी कुलकर्णी, अरुणा निकम आणि अर्चना निपाणीकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

# फलटण तालुक्याचा दहावीचा निकाल ९२.४४ टक्के

फलटण,ता.११(वार्ताहर)-

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे कोल्हापूर विभागाच्या माध्यमातून फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) फलटण तालुक्यातून ३ हजार ९९६ विद्यार्थी बसले त्यापैकी ९१४ उच्च गुणवत्ता श्रेणीत, १ हजार २६६ प्रथम श्रेणीत, १ हजार ०९८ द्वितीय श्रेणीत आणि ४१६ उत्तीर्ण श्रेणीत असे एकूण ३ हजार ६९४म्हणजे ९२.४४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.**

**फलटण तालुक्यातील विद्यालय निहाय निकाल–**

मुधोजी हायस्कूल, फलटण ९३.७२ टक्के, साखरवाडी माध्यमिक विद्यालय, साखरवाडी ९८.०९ टक्के, यशवंतराव चव्हाण हायस्कूल, फलटण ७९.७८ टक्के, सौ.वेणुताई चव्हाण हायस्कूल, तरडगाव ९४.६९ टक्के, ज्योतिर्लिंग हायस्कूल, पवारवाडी (आसू) ८१.७३ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल, निंबळक ८३.३३ टक्के, सरदार वल्लभभाई हायस्कूल, साखरवाडी ९१.०७ टक्के, सौ.वेणुताई चव्हाण गर्ल्स हायस्कूल, फलटण ८७.१४ टक्के, छत्रपती शिवाजी हायस्कूल पंचक्रोशी वाखरी ९५.४५ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल, आदर्की बुद्रुक ९१.८३ टक्के, श्री जितोबा विद्यालय, जिंती ९६.१५ टक्के, मालोजीराजे शेती विद्यालय, फलटण ९३.४० टक्के, महात्मा फुले हायस्कूल, सासवड ९६.९२ टक्के, उत्तरेश्वर हायस्कूल, विडणी ८९.७७ टक्के, श्री जानाई हायस्कूल, राजाळे ९५.६१ टक्के, श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय, गिरवी ९०.४७ टक्के, जयभवानी हायस्कूल तिरकवाडी ९३.१३ टक्के, श्रीमान एस. जी. सूर्यवंशी विद्यालय, तांबवे ९६.७७ टक्के, कै.संजय गांधी विद्यालय, गुणवरे ९१.६६ टक्के, सरस्वती माध्यमिक विद्यालय, बिबी ९३.४२ टक्के, हनुमान माध्यमिक विद्यालय, गोखळी ८२.७५ टक्के, फलटण हायस्कूल, फलटण ७५.०० टक्के, श्रीमंत शिवाजीराजे इंग्लिश मिडियम स्कूल, जाधववाडी (फ) १०० टक्के, हिंगणगाव माध्यमिक विद्यालय, हिंगणगाव ९५.६५ टक्के, काळज हायस्कूल, काळज ८६.९५ टक्के, तरडफ माध्यमिक विद्यालय, तरडफ ८३.३३ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल, निंभोरे ९६.६६ टक्के, मॉडर्न हायस्कूल, बरड ८०.७६ टक्के, वाठार हायस्कूल, वाठार निंबाळकर ८७.५० टक्के, जावली हायस्कूल, जावली १०० टक्के, मठाचीवाडी विद्यालय, मठाचीवाडी १०० टक्के, श्रीमती प्रेमलाताई चव्हाण हायस्कूल, फलटण ८०.०० टक्के, शिवशंकर माध्यमिक विद्यालय, सासकल ६८.७५ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल, पाडेगाव १०० टक्के, सिद्धेश्वर हायस्कूल, पिंप्रद ९६.०० टक्के, खुंटे हायस्कूल, खुंटे ९२.८५ टक्के, क्रांतीसिंह नाना पाटील हायस्कूल, सरडे ८०.४८ टक्के,श्री गाडगे महाराज माध्यमिक आश्रम शाळा, ताथवडा ९८.४७ टक्के, ढवळ हायस्कूल, ढवळ ९०.२४ टक्के, सालपे माध्यमिक विद्यालय, सालपे ९२.८५ टक्के, श्री संत डी.एम.विद्यालय, नांदल १०० टक्के, सरलष्कर श्रीमंत बाबाराजे खर्डेकर विद्यालय, हणमंतवाडी ९४.११ टक्के, ज्योतिर्लिंग माध्यमिक विद्यालय, फडतरवाडी ८८.२३ टक्के, आदर्की माध्यमिक विद्यालय, आदर्की खुर्द ९४.११ टक्के, श्री ज्योतिर्लिंग इंग्लिश स्कूल, चव्हाणवाडी ९०.०० टक्के, पंचक्रोशी माध्यमिक विद्यालय, कुरवली खुर्द ९०.९० टक्के, भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, राजुरी ८२.१४ टक्के, श्रीराम खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, मुंजवडी ८८.२३ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल, सुरवडी ९२.१० टक्के, श्रीमान शेठ धन्यकुमार रतनचंद गांधी विद्यालय, धुळदेव ९८.०३ टक्के, कमला निंबकर बालभवन, फलटण १०० टक्के, श्रीमंत सगुणामाता माध्यमिक विद्यालय, दालवडी ६९.५८ टक्के, सहकार महर्षी हणमंतराव पवार हायस्कूल, फलटण ९८.९६ टक्के, आंदरुड माध्यमिक विद्यालय, आंदरुड ९५.४५ टक्के, लेट मल्हारराव सस्ते विद्यालय, सस्तेवाडी ९७.०१ टक्के, चौधरवाडी हायस्कूल, चौधरवाडी ९५.४५ टक्के, रावडी माध्यमिक विद्यालय, रावडी ९५.४५ टक्के, होळ माध्यमिक विद्यालय, होळ १०० टक्के, आचार्य बाळशास्त्री जांभेकर माध्यमिक विद्यालय, फलटण ८८.५७ टक्के, सौ. मथुबाई सावंत विद्यालय, उपळवे ७९.३१ टक्के, शरद प्रतिभा माध्यमिक विद्यालय, शिंदेवाडी ९१.३० टक्के, श्री वडले माध्यमिक विद्यालय, वडले १०० टक्के, सुशीलादेवी लालासाहेब पाटणकर माध्यमिक विद्यालय, वाजेगाव ९७.२९ टक्के, पाच पांडव माध्यमिक आश्रम शाळा, अलगुडेवाडी ९५.८३ टक्के, श्री संत गाडगे महाराज माध्यमिक आश्रम शाळा खराडेवाडी ९३.७५ टक्के, माध्यमिक आश्रम शाळा, सांगवी ५८.८२ टक्के, निरगुडी हायस्कूल, निरगुडी ८७.८७ टक्के, दुधेश्वर माध्यमिक विद्यालय, दुधेबावी ८५.७१ टक्के, माध्यमिक विद्यालय, साठे ७५.०० टक्के, अॅम्बिशन इंग्लिश मिडियम स्कूल, आदर्की बुद्रुक १०० टक्के, ब्रिलियंट अकॅडमी इंग्लिश मिडियम स्कूल, फलटण १०० टक्के, बी. जे. इंग्लिश मिडियम स्कूल १०० टक्के, नियोजित प्रायमरी सेकंडरी उच्च माध्यमिक स्कूल १०० टक्के, प्रोग्रेसिव्ह कॉन्व्हेंट स्कूल, (कोळकी) फलटण १०० टक्के, राष्ट्रबंधू राजीवजी दीक्षित गुरुकुल पिंप्रद १०० टक्के, हाजी अब्दुल रज्जाक उर्दू हायस्कूल अॅंड ज्युनिअर कॉलेज, फलटण १०० टक्के, ब्ल्यू इंग्लिश मिडियम स्कूल अॅंड ज्युनियर कॉलेज, गुणवरे १०० टक्के, प्रोग्रेसिव्ह कॉन्व्हेंट स्कूल अॅंड ज्युनियर कॉलेज, गुणवरे १०० टक्के.

# शेतीपंपांना दिवसा वीजपुरवठा करा

मसूर,ता.११(प्रतिनिधी)-

**कराड तालुक्यातील अनेक भागांत शेतीसाठी दिवसा वीजपुरवठा दिला असताना मसूरसह हेळगाव परिसरातील शेतकऱ्यांना रात्रीचा वीज पुरवठा का? असा संतप्त सवाल येथील शेतकऱ्यांनी केला आहे. शेतीपंपांना दिवसा वीज मिळावी, यासाठी अन्याय आंदोलनाचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.**

सध्या उन्हाळ्याचा तीव्र झळा, पाण्याची टंचाई आणि पिके करपण्याचे संकट अशा दुहेरी-तिहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. अशातच रात्रीच्या वेळी वीजपुरवठा दिला जात असल्याने शेतकऱ्यांच्या जीवितालाच धोका निर्माण झाला आहे.मसूरसह हेळगाव परिसरात बिबट्या, रानडुक्कर, गवे तसेच इतर हिंस्र प्राण्यांचा वावर वाढला आहे. याशिवाय सर्पदंशाच्या घटनाही वारंवार घडत असून, संबंधित यंत्रणांकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे. कराड तालुक्यात इतर भागांना दिवसा वीज दिली जात असताना केवळ मसूर आणि हेळगाव परिसरातील शेतकऱ्यांवरच अन्याय का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.दिवसा वीजपुरवठ्याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास महावितरण कार्यालयावर मोर्चा, रास्तारोको आणि तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. शेतकऱ्यांचा अंत पाहू नका; दिवसा वीज द्या, अन्यथा संघर्ष अटळ आहे, असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनासह लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. केवळ आश्वासने न देता प्रत्यक्षात दिवसा वीजपुरवठ्याचा निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकऱ्यांचा संताप वाढून तीव्र आंदोलन होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# आळतेत बत्तीस लाखाच्या गुटख्यासह मुद्देमाल जप्त



**हातकणंगले ता.११ (प्रतिनिधी ) आळते (ता.हातकणंगले) येथे गेल्या महिन्यात केलेल्या गुरख्याच्या कारवाईतील आरोपींचा शोध घेत असताना हातकणंगले पोलिसांना पुन्हा त्याच ठिकाणी १७,लाख९१हजार रुपयेचा प्रतिबंधीत सुगंधीत तंबा्खू वाहने व अन्य साहित्य असा एकुण ३२ लाख ६० हचार रुपये किंमतीचा मुद्देमाल सापडला असून शहनवाज मन्सुर पठाण (वय.२९ रा.आर.ए. मसालाजवळ अहिल्यानगर सांगली) याला पोलीसांनी मुद्देमालासह ताब्यात घेतले असून दुसरा मुख्य आरोपी राजेश नारसिंघा पांडव (वय. ४५ रा. गावडे मळा रामलिंग रोड आळते) याचा शोध सुरू आहे .**

जयसिंगपूरचे उपविभागिय पोलीस आधिकारी अमोल ठाकूर यांना मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार पोलीसांनी हि कारवाई केली असून संबंधीत दोन आरोपींच्या विरोधात१ भारतीय न्याय संहिता सह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत .या कारवाईत प्रतिबंधीत बनावट एम सेंटेड टोबॅको गोल्ड ची एकुण ३० बॉक्स सुगंधीत तंबाखू, प्रतिबंधीत बनावट तुलसी सुगंधीत तंबाखूचे एकुण ७ बॉक्स ,एक इनोव्हा कार, एक माल वाहतुक टाटा इन्ट्रा टेम्पो, सुगंधीत तंबाखू वाहतुक करणेसाठी वापरणेत येणारी ॲक्टीव्हा मोपेड, एक मोबाईल, सिसीटीव्ही डी.व्ही.आर असा एकुण ३२,लाख६० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपी राजेश नारसिंघा पांडव (वय. ४५ रा. गावडे मळा रामलिंग रोड आळते) यांचे कब्जातुन गावडे मळा रामलिंग रोड आळते येथे असले बंद पत्र्याचे शेडमध्ये आरोपीत राजेश नारसिंघा पांडव याचे मालकीचे असलेले बंद पत्र्याचे शेडमध्ये सदर गुन्ह्यातील प्रतिबंधीत अन्न पदार्थांचा साठा मिळुन आलेने गुन्हा दाखल केला आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल बसु ,अपर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव यांचे पोलीस पथकाने केली.

# हुपरी अतिक्रमणमुक्त करण्यासाठी पालिकेचा ॲक्शन मोड



हुपरी, ता. ११(वार्ताहर )–

**हुपरी शहराचा विस्तार आणि वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, नगरपरिषद प्रशासनाने सोमवारी शहरात धडक अतिक्रमण विरोधी मोहीम राबवली. मुख्याधिकारी अजय नरळे आणि पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली असून, धडक मोहिमेमुळे वर्षानुवर्षे अतिक्रमणांच्या विळख्यात अडकलेल्या रस्त्यांना अखेर मोकळी वाट मिळाली आहे.**

या मोहिमेची सुरुवात माळभागातील लक्ष्मीदेवी स्कूल समोरील भंगार हटवून करण्यात आली. त्यानंतर पथकाने शिवमूर्ती परिसर ते अपेक्षा हॉटेल आणि नगरपरिषद कार्यालय ते इंग्रोळे कॉर्नर या मुख्य रस्त्याकडे वळवला. दिवसभरात जेसीबीच्या सहाय्याने सुमारे २० ते २५ ठिकाणचे अनधिकृत पत्रे, छपऱ्या, पायऱ्या आणि सिमेंटचे कट्टे जमीनदोस्त करण्यात आले. तसेच, वाहतुकीला अडथळा ठरणारे विनापरवाना साईन बोर्ड आणि डिजिटल फलक प्रशासनाकडून जप्त करण्यात आले आहेत.

कारवाई दरम्यान काही ठिकाणी अतिक्रमणधारकांनी प्रशासनाशी हुज्जत घालत विरोध दर्शवल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलीस प्रशासनाने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या चोख बंदोबस्तात नगरपरिषदेने ही मोहीम शांततेत पार पाडली. विशेष म्हणजे, प्रशासनाचा आक्रमक पवित्रा पाहून अनेक व्यावसायिकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घेण्यास सुरुवात केली.शिवमूर्ती च्या डाव्या बाजूचे ३० फूट अतिक्रमण उद्यापर्यंत हटवण्याच्या स्पष्ट सूचना मुख्याधिकारी नरळे यांनी संबंधित धारकांना दिल्या आहेत.

या मोहिमेत मुख्याधिकारी अजय नरळे, पोलीस निरीक्षक सत्यवान हाके यांच्यासह अभियंता प्रियांका भाट, प्रशांत तराळ, ज्योती पाटील, अश्विनी पाटील, मिरासो शिंगे, निखिल चव्हाण, उदय कांबळे, सौरभ बेडगे, विनोद कांबळे, मंगेश कांबळे तसेच पोलीस प्रशासन व नगरपरिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**दै.महासत्ताच्या वृत्ताची दखल**

हुपरी येथील लक्ष्मीदेवी गर्ल्स स्कूलच्या प्रवेशद्वारासमोर आणि संरक्षक भिंतीलगत असलेल्या भंगाराच्या विळख्याबाबत दै.महासत्ताने विद्येच्या मंदिराला भंगाराचा आणि कचऱ्याचा विळखा या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मुख्याध्यापिकांनी दिलेले निवेदन आणि विद्यार्थिनींच्या आरोग्याचा प्रश्न लावून धरला होता. याची गंभीर दखल घेत मुख्याधिकारी अजय नरळे यांनी आजच्या मोहिमेचा श्रीगणेशाच या शाळेसमोरील भंगार हटवून केला. वर्षानुवर्षे रखडलेला हा प्रश्न दै.महासत्ताच्या बातमीमुळे मार्गी लागल्याने शिक्षक, पालक आणि विद्यार्थिनींमधून समाधान व्यक्त होत आहे.

# प्रोसेसिंग यूनिट बंद असल्यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ

## सकारात्मक तोडगा काढा अन्यथा आंदोलन : मालवणकर



इचलकरंजी, ता.११

**शहरातील प्रोसेसिंग यूनिट बंद असल्यामुळे कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे.याबाबत पुढील ७ दिवसात सकारात्मक तोडगा काढावा अन्यथा आंदोलन छेडले जाईल असा इशारा कोल्हापूर शिवसेना जिल्हा संघटक मोहन मालवणकर यांनी प्रांतकार्यालयाला दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.**

निवेदना पुढे म्हटले आहे की, ले ऑफ मोबदला - कामगार कायद्यानुसार कारखाना मालकाच्या किंवा इतर तांत्रिक कारणामुळे बंद राहिल्यास ५०% पगार मिळणे बंधनकारक आहे. प्रशासनाने मालक वर्गाला हे आदेश द्यावे. कामगारांना आर्थिक सवलत किंवा धान्य स्वरुपात मदत मिळावी. लाभ - बेरोजगार झालेल्या विमाधारक कामगाराना अटल विमित व्यक्ती कल्याण योजना अंतर्गतबेटोजगारी भत्ता मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा .याबाबत पुढील ७ दिवसात यावर कोणताही सकारात्मक तोडगा निघाला नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनावर विजकुमार स्वामी, सौ.सुदर्शना कांबळे, योगेश कांबळे, किसन तिरपनकर, आनंदा मोरे, राकेश चंद्रकुडे अजित परीट, संभाजी माळी, विकास जगताप अमर गेजगे, मनोज ठोके यांच्या सह्या आहेत.

# डीकेटीईच्या ८ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड



इचलकरंजी, ता. ११(प्रतिनिधी)

**येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल डिप्लोमामधील ५, बी.टेक. टेक्स्टाईलमधील ३ अशा ८ विद्यार्थ्यांची देशातील अग्रगण्य, जागतिक स्तरावरील वेलस्पन या वस्त्रोद्योग कंपनीत आकर्षक पॅकेजवर निवड झाली आहे.**

वेलस्पन कंपनी टेरी टॉवेल्स, शीटींग फॅब्रिक्स, नॉनवोव्हन फॅब्रिक्स, फलोरीन्स मटेरिएल यांसारख्या विविध उत्पादन क्षेत्रांत आघाडीवर आहे. दरवर्षीप्रमाणे या कंपनीने डीकेटीई कॅम्पसला भेट देवून विविध टप्प्यांतून विद्यार्थ्यांची तांत्रिक गुणवत्ता, संवाद कौशल्य आणि उद्योगाभिमुख दृष्टीकोन तपासून अंतिम निवड केली. यामध्ये डिप्लोमा विभागातून सोहम सुल, आझाद जामदार, पार्थ खाडे, अजयकुमार उपासे, श्रृतिका पाटील आणि बी.टेक टेक्स्टाईलमधील सानिका पाटील, विनंती चव्हाण, सायली खैरनार यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांचे डीकेटीई संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे, संचालिका प्रा.डॉ.एल.एस.आडमुठे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## परमपूज्य श्री श्री रविशंकरजी यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

इचलकरंजी,ता.११

**आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक,शांतीदूत परमपूज्य गुरूदेव श्री.श्री रविशंकरजी यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंग इचलकरंजी यांच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

सकाळी ७ ते ८वाजता लॉग सुदर्शन क्रिया या कार्यक्रमाचे नामदेव भवन येथे आयोजन करण्यात आले आहे,सकाळी ९वाजता लायन्स क्लब येथे रक्तदान शिबिर आयोजीत करण्यात आले आहे.तसेच सांयकाळी ७ वाजता गुरूपूजा सत्संग व प्रसाद आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंगचे वरिष्ठ प्रशिक्षक विनायक मुरदंडे, स्वंयसेवक नमिता हुल्ले,राहूल रायनाडे, नारायण जोशी, डॉ. गीता दरूरे, विशाल पाटील, विजय सांळुखे, गोपाल चांडक, उत्तम गुरव यांनी केले आहे.

# गांजा विक्रीसाठी आलेल्या एकास अटक

## ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



टोप ता.११ (प्रतिनिधी)

**शिरोली औद्योगिक वसाहतीतील जाफरानी काट्याजवळ बेकायदेशीररित्या गांजा विक्रीसाठी आलेल्या एकास शिरोली पोलिसांनी पकडून त्याच्याकडून १ किलो ७० ग्रॅम गांजा, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ७६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत संशयितास पोलिसानी ताब्यात घेतले.**

शिरोली येथील रविकांत सर्जेराव गाडेकर (वय ३३, रा. विलासनगर, हनुमान मंदिराजवळ, माळवाडी, शिरोली पुलाची) हा रविवार सायंकाळच्या सुमारास शिरोली पुलाची गावच्या हद्दीत जाफरानी काट्याजवळ अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित रविकांत गाडेकर याला ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे २१ हजार ४०० रूपये किमतीचा १ किलो ७० ग्रॅम गांजासह ५ हजार किमतीचा व्हिवो मोबाईल , ५० हजार किमतीची बजाज प्लॅटीना मोटारसायकल क्रमांक व एक काळ्या रंगाची सॅक असा एकूण ७६ हजार ४०० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल ऋषिकेश प्रकाश पाटील यांनी फिर्याद दिली असून गाडेकर याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही कारवाई शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल नजीर शेख, सुहास संकपाळ, ऋषिकेश पवार, ऋषिकेश पाटील, सुनील गोरे आणि चालक पोलीस कॉन्स्टेबल इंद्रजीत खडके यानी केली .

## अल्पवयीन मुलीशी गैरवर्तनप्रकरणी काकास अटक

सरूड, ता. ११ (प्रतिनिधी)

**शाहूवाडी तालुक्यातील गावात अल्पवयीन मुलीशी काकाने गैरवर्तन केल्याने शाहूवाडी पोलिसांनी अटक केली आहे.**

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायदा (पॉक्सो) अंतर्गत शाहूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी कुटुंबातील दोन अल्पवयीन मुली मावशीकडे सुट्टीसाठी आल्या होत्या. यावेळी घरातील खोलीत झोपलेल्या मुलींशी संशयित काकाने गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. संबंधित मुलींनी हा प्रकार आपल्या आईला सांगितल्यानंतर आईने शाहूवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रार मिळताच पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून संशयितास ताब्यात घेतले. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली असून न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास शाहूवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अतुल सोनोने करीत आहेत.



## डॉ.आंबेडकर व शाहू पुतळा परिसर सुशोभीकरण करणार;आम.आवाडे

इचलकरंजी,ता.११

**स्टेशन रोडवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शाहू पुतळा परिसरातील पूर्ण कृती पुतळा सुशोभीकरण्यासाठी डॉ.आमदार राहुल आवाडे यांना माजी उपनगराध्यक्ष रवि रजपुते यांनी निवेदन दिले.**

त्या निवेदनामध्ये. पुतळ्याच्या मागे बौद्ध स्थायी कमान उभी करणे. कमानीमध्ये अशोक चक्र बसवणे.पुतळ्याच्या समोर उजव्या व डाव्या बाजू सिंह स्तंभ उभारणे पुतळा भोवती.विद्युत रोषणाई.चार बाजूस भारतीय संविधान शिल्प,बौद्ध धम्म सीमा शिल्प,मांणगाव बहिकृत हितकरणी शिल्प,चवदार तळे आंदोलनाचे शिल्प,शिल्पांची माहिती रस्त्याच्या चारही बाजूस संपूर्ण परिसर दिसेल अशा पद्धतीचे मोठे लाईट.तसेच कामगार चाळ व कोर्टासमोरील पुतळा ही सुशोभीकरण करावा. अशा आशयाचे निवेदन देण्यात आले.त्यावेळेस डॉ.राहुल आवाडे यांनी,शिवतीर्थ सारखे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर व शाहू पुतळा परिसर सुशोभीकरण करणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी माजी उपनगराध्यक्ष रवी रजपुते, स्टँडिंग कमिटी चेअरमन बंडा मुळीक,नगरसेवक राजू बोंद्रे, नितेश पवार,दिलीप मुथा,दीपक रावळ,शाम लाखे, व इतर मान्यवर उपस्थित होते.

# युवकांनी शॉर्टकटचा मोह टाळा: निंबाळकर

इचलकरंजी,ता. ११

**प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष आणि समस्यांचे स्वरुप वेगवेगळे असते मात्र त्या कधी संपत नाहीत. त्यामुळे प्रत्येकाला लढा हा द्यावाच लागत असल्याने करिअर हे आपल्या कौशल्याच्या आधारे निवडा. यशासाठी शॉर्टकटचा मोह टाळा. प्रयत्नांना कोणताही पर्याय नसल्याने सतत प्रयत्न करत रहा, असे प्रतिपादन आयपीएस वैभव निंबाळकर (डीआयजी, सीआरपीएफ, पुणे) यांनी केले.**

जांभळी (ता. शिरोळ) येथील जीवनविद्या मिशन ज्ञानसाधना केंद्राच्यावतीने आयोजित करिअर आणि जीवनाचा चॅटजीपीटी मंत्र या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

परमेश्वराने प्रत्येकाला कर्मस्वातंत्र्य दिले असले तरी आपण जीवनात काय निवडायचे हे आपल्या हातात असते. मात्र त्याचे परिणाम आपल्या नियंत्रणात नसतात, असे स्पष्ट करत निंबाळकर यांनी योग्य संगती, सकारात्मक विचार आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांमधूनच उज्वल भविष्य घडते. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आरोग्य जपावे, व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करून स्वतःला सतत अद्ययावत ठेवण्याचे आवाहन केले. आयुष्यभर विद्यार्थी बनून शिकत राहणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. वेळेचे महत्त्व ओळखून योग्य वेळी योग्य गोष्टींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

करिअर घडवताना कृतज्ञतेची भावना अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगुन निंबाळकर यांनी कृतज्ञतेने भरलेले आणि भारवलेले मन चांगल्या गोष्टी आपोआप आकर्षित करते. चांगल्या कर्मातूनच चांगल्या घटना घडतात. जसा विचार, तसा जीवनाला आकार मिळतो. त्यामुळे नेहमी सकारात्मक विचार करा आणि सर्वांसाठी विचार करण्याची वृत्ती जोपासा.

आजच्या स्पर्धात्मक आणि अनिश्चित वातावरणात मानसिक, शारीरिक आणि अध्यात्मिक संतुलन राखणे आवश्यक आहे.

यावेळी व्यासपीठावर श्रद्धा अकॅडमीचे ए.आर. तांबे, गोरखनाथ डाके, जीवनविद्या मिशन ज्ञानसाधना केंद्र जांभळी शाखेचे सचिन निंबाळकर उपस्थित होते.

# खुनाचा कट रचणाऱ्या टोळीच्या पोलीस कोठडीत वाढ

**सांगली, ता. ११(प्रतिनिधी )– मिरजेतील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष संजय भोकरे यांच्या खुनाचा कट रचणाऱ्या टोळीचा मुख्य सूत्रधार सचिन कुमार आवळे (वय ४५, रा. सांगलीवाडी) याच्यासह चौघांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसाची वाढ करण्यात आली आहे.**

मिरजेतील भोकरे अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ मोकळी जमीन आहे. या जमिनीच्या काही भागावर संशयित सचिन आवळे याने आपला दावा सांगितला आहे. संजय भोकरे हे संस्थेचे अध्यक्ष असल्याने जमीन ताब्यात घेण्यास अडथळा निर्माण होत होता. भोकरेंना संपवले तरच ही जमीन सहज घशात घालता येईल, या विचारातून आवळेने खुनाचा कट रचला होता. आवळे याने विराज बटाले याला आर्थिक आमिष दाखवले. बुटाले याने भोकरेंच्या हत्येसाठी गणेश लोखंडे आणि संग्राम फडतरे यांना देशी बनावटीची दोन पिस्तुले आणण्यासाठी पैसे पुरवले. पिस्तुले आल्यानंतर तिघांनी सरावही केला. त्यानंतर तिघांनी खुनाचा कट रचला. भोकरे यांच्यावर पाळत ठेवली होती. खुनापूर्वीच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला खबऱ्यामार्फत माहिती मिळाल्याने कट उधळला.

पोलिसांनी यापूर्वीच गणेश लोखंडे, विराज बुटाले आणि संग्राम फडतरे या तिघांना अटक केली होती. तिघांची सोमवारपर्यंत पोलिस कोठडी होती. रविवारी सूत्रधार सचिन आवळे याला पोलिसांनी अटक केली.

चौघांना सोमवारी न्यायालयासमोर हजर केले असता दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. उपनिरीक्षक सागर होळकर तपास करत आहेत.


## बिरदेव सहकारी बँक लि. इचलकरंजी

### जाहिर नोटीस

बँकेच्या सर्व खातेदार, ठेवीदार, कर्जदार, जामिनदार आणि सर्व सबंधिताना कळविणेत येते की, बँकेकडील दि.३१/०३/२०१४ अखेरचे जुने/कालबाहय रेकॉर्ड नाश/नष्ट करणेत येणार आहे. तरी ज्यांना वरील नमुद कालावधीपर्यंतची माहिती वा व्यवहारांचे खाते उतारे, बंद कर्ज खात्याचे दस्तऐवज तसेच बँकेकडे सादर केलेली अस्सल कागदपत्र हवी असल्यास त्याच्या पोहोच पावतीसह त्या बाबतचा मागणी अर्ज लेखी स्वरुपात दि. १०/०६/२०२६ पूर्वी सादर करणेत यावा. अन्यथा मुदतीअंती प्राप्त अर्जाचा अथवा विनंतीचा/तक्रारींचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.११/०५/२०२६

मॅनेजर
**बिरदेव सहकारी बँक लि. इचलकरंजी.**



**फार्म झेड**
**(पहा सब–रूल (११ (ड–१) रूल १०७ प्रमाणे)**

### स्थावर मिळकतीचा ताबा नोटीस

खाली सही करणार वसुली/विक्री अधिकारी बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी पत्ता १२/४७५, आर. पी. रोड, पद्मा लॉंड्रीजवळ, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी दिनांक २९–०६–२०२५ इ. रोजीची मागणी नोटीस कर्जदार, सहकर्जदार व त्यांचे जामिनदार यांना देवूनही वसुली दाखलेप्रमाणे रक्कम रूपये ६,८२,२९५/– व दि. १९–१२–२०२५ पासूनचे व्याज रक्कम भरणेबाबत कळविले होते.

कर्जदार श्री.अमोल कुमार ऐनापूरे, रा.ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर, सहकर्जदार कुमार सिध्दाप्पा ऐनापूरे, रा.ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर व त्यांचे जामिनदार यांना वरील मागणी नोटीसीत नमूद रक्कम रू. ६,८२,२९५/– व त्यावरील व्याज वसुली खर्च अशी सदरची मागणी नोटीस मिळवूनही रक्कम भागवलेली नाही. त्यामुळे वसुली/विक्री अधिकारी बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेले स्थावर मिळकत दि. ०९–०३–२०२६ इ. रोजीच्या आदेशाने जप्त झाली आहे.

सदर प्रमाणे कर्ज हे बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी या बँकेची देय रक्कम भागविणेचे ठरले असलेने प्रस्तुतच्या नोटीसीने श्री. अमोल कुमार ऐनापूरे, रा.ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर, सहकर्जदार कुमार सिध्दाप्पा ऐनापूरे, रा. ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर यांना व तमाम जनतेस कळविणेत येते की, खाली सही करणार वसुली/विक्री अधिकारी बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती कब्जा त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे रूल १०७ (११ (ड–१) प्रमाणे प्राप्त अधिकारानुसार आज दिनांक : १४–११–२०२५ इ. रोजी प्रतिकात्मक कब्जा घेतला आहे.

कर्जदार श्री. अमोल कुमार ऐनापूरे, रा.ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर, सहकर्जदार कुमार सिध्दाप्पा ऐनापूरे, रा.ऐनापूरे मळा,मु.पो.चंदूर व तमाम लोकांना या ताबा नोटीसीने जागृत करणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद स्थावर मिळकतीबाबत कोणीही, कसलाही, खरेदी–विक्री व तबदीलीचा व्यवहार करू नये. कोणी तसा बेकायदेशीर व्यवहार केलेस सदरचा व्यवहार हा बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी या बँकेच्या देय रक्कम दि. १०–०५–२०२६ अखेर रू. ७,२२,१३९/– आणि त्यावरील पुढील व्याज वसुली खर्चासह सदर मिळकतीवर बोजा राहील.

**परिशिष्ट**

**स्थावर मिळकतीचे वर्णन :–**

जिल्हा परिषद जिल्हा व तुकडी कोल्हापूर तालुका व तालुका पंचायत समिती, हातकणंगले पोटतुकडी इचलकरंजी मा. सहाय्यक निबंधक वर्ग–२, इचलकरंजी यांचे हद्दीतील मौजे चंदूर येथील सहकर्जदार श्री. अमोल कुमार ऐनापूरे, रा.ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर, सहकर्जदार कुमार सिध्दाप्पा ऐनापूरे, रा. ऐनापूरे मळा, मु.पो. चंदूर यांचे मालकीच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :– मौजे चंदूर येथील गट नं.५७६, क्षेत्र ०.१२.०० आर पैकी क्षेत्र ०.२८.०० आर ची शेती मिळकत यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे :–

**१. पुर्वेस – श्री. ऐनापूरे यांची मिळकत**
**२. पश्चिमेस – ३० फुट रूंदीचा रस्ता**
**३. दक्षिणेस – श्री. आण्णाप्पा व विलास शिंदे यांची मिळकत.**
**४. उत्तरेस – श्री. सुरेंद्र ऐनापूरे यांची मिळकत.**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असे.
ता. ११–०५–२०२६
ठिकाण : इचलकरंजी.

**श्री. एम. एम. आजरेकर**
वसुली/विक्री अधिकारी
म.स.सं.अधिनियम १९६० चे कलम १५६
व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये
बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर





# आरसीबीच्या कोचवर दंडात्मक कारवाई

नवी दिल्ली,ता.११–

**आरसीबीने मुंबई इंडियन्सविरुद्ध दोन विकेट्सने विजय मिळवला. या सामन्यादरम्यान नियमांचे उल्लंघन केल्यामुळे कोचला मात्र फटका बसला आहे. आरसीबीचे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांना दंड ठोठावण्यात आला असून, त्यांच्या सामना शुल्कात १५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. या हंगामात आतापर्यंत केवळ खेळाडू किंवा संघाच्या कर्णधारांनाच दंड ठोठावण्यात आला होता.मात्र आयपीएल २०२६ मधील संघाच्या मुख्य प्रशिक्षकांना देण्यात आलेली ही पहिलीच शिक्षा आहे.**

आरसीबीच्या डावाच्या १८ व्या षटकादरम्यान कोच अँडी फ्लॉवरचा चौथ्या पंचांसोबत जोरदार वाद झाला. निवेदनात म्हटले आहे की, अँडी फ्लॉवरने आपला गुन्हा कबूल केला आहे. आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३ अंतर्गत त्यांना दोषी ठरवण्यात आले.हा संपूर्ण प्रकार कृणाल पांड्याच्या संबंधित एका वादग्रस्त बाउंड्रीच्या निर्णयानंतर घडला. मुंबई इंडियन्सचा गोलंदाज अल्लाह गझनफरच्या गोलंदाजीवर कृणालने चेंडू लाँग-ऑनच्या दिशेने खेळला. तिथे असलेल्या नमन धीरने सीमारेषेजवळ चेंडू पकडला. तिलक वर्मादेखील तिथे उपस्थित होता. पण नमनचा सीमारेषेबाहेर तोल जाणार हे कळताच त्याने चेंडू फेकला, पण तिलक तो चेंडू टिपू शकला नाही.

दरम्यान, नमनचा एक बूट चुकून दुसऱ्या बुटाला लागून सीमारेषेवरील कुशनला लागला असावा, त्यामुळे षटकार देण्यात आला पाहिजे असे अँडीचे म्हणणे होते. पण, रिप्लेमध्ये दिसले की, प्रयत्नादरम्यान नमन धीरने कुशनला स्पर्श केला नव्हता. कृणालला क्रॅम्प येत असल्यामुळे त्याने धावण्याचा प्रयत्न केला नाही. याचा अर्थ तो निर्धाव चेंडू होता. सामन्यानंतर, फ्लॉवर यांनी चौथ्या पंचांशी रागाने बोलण्याची आपली चूक कबूल केली आहे आणि सामनाधिकारी अमित शर्मा यांनी दिलेली शिक्षा स्वीकारली आहे.

# पंजाबचा पराभवाचा चौकार

धरमशाला,ता.११ –

**दिल्ली कॅपिटल्सने अनपेक्षित विजयाची नोंद करताना इंडियन प्रीमियर लीगच्या प्ले ऑफच्या शर्यतीतील स्थान कायम राखले. पंजाब किंग्जला सलग चौथ्या पराभवाचा सामना करावा लागला. दिल्ली कॅपिटल्सने १२ सामन्यांत पाचवा विजय मिळवून तालिकेत सातव्या क्रमांकावर झेप घेतली. सीएसके, आरआर,केकेआर यांना प्ले ऑफची संधी मिळू शकते.**

## दिल्ली कॅपिटल्सचा थरारक विजय

## प्लेऑफचे गणित बिघडले



प्रियांश आर्यने पहिल्याच षटकात २२ धावा कुटून जी सुरुवात करून दिली होती, ती पाहता पंजाबने २५० धावांपर्यंत पोहोचायला हवे होते. पण, दिल्लीच्या माधव तिवारी व मुकेश कुमार यांनी मधल्या षटकांत चांगला मारा करून पंजाबची धावगती संथ केली. माधवने नवव्या षटात प्रियांशला बाद केले. प्रियांशने ३३ चेंडूंत २ चौकार व ६ षटकारांसह ५६ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यर व कूपर कॉनली यांच्या ८२ धावांच्या भागीदारीने पंजाबला पुनरागमन करून दिले.

कूपर २७ चेंडूंत ३८ धावांवर माघारी परतला आणि त्यालाही माधवने माघारी पाठवले. त्यानंतर मिचेल स्टार्कने सलग दोन चेंडूंत विकेट्स घेतल्या. पण, श्रेयस मैदानावर उभा राहिला आणि ३६ चेंडूंत ५ चौकार व ३ षटकारांसह ५९ धावांची खेळी केली. त्याला शुर्यांश शेडगेच्या ८ चेंडूंत २१ धावांची साथ मिळाली आणि पंजाबला ५ बाद २१० धावांपर्यंत पोहोचवले.कर्णधार अक्षर पटेलने ट्रिस्तान स्तब्सला (१२ धावांवर रन आऊट) सोबतीला घेऊन २३ चेंडूंत ४१ धावा जोडल्या. ४ फलंदाज ७४ धावांवर माघारी परतल्यानंतरही अक्षर खचला नाही. तो आणि डेव्हिड मिलर ही जोडी मैदानावर उभी राहिली आणि त्यांनी ३४ चेंडूंत ६३ धावा जोडून मॅच फिरवली. मार्कस स्टॉयनिसच्या षटकात १४ धावा कुटल्यानंतरही अक्षरला मोह आवरता आला नाही. तो ३० चेंडूंत ८ चौकार व २ षटकारांसह ५६ धावांवर झेलबाद झाला.

मिलर २८ चेंडूंत ३ चौकार व ४ षटकारांसह ५१ धावांवर माघारी परतला, परंतु त्याने सामने २१ चेंडूंत ४१ असा जवळ आणून ठेवला होता. १८ चेंडूंत ३६ धावा हव्या असताना आशुतोष व माधव तिवारीने १९ धावा कुटल्या आणि सामना १२ चेंडूंत १७ धावा असा आणखी जवळ आणला. आशुतोष १० चेंडूंत २ चौकार व २ षटकारांसह २४ धावा करून बाद झाला. दिल्ली कॅपिटल्सने ३ विकेट्स व ६ चेंडू राखून सामना जिंकला आणि १० गुणांसह सातव्या स्थानी झेप घेतली. पंजाबविरुद्धचा विजय दिल्लीसाठी फार फायद्याचा नसला तरी या विजयाने चेन्नई सुपर किंग्ज (१२), राजस्थान रॉयल्स (१२) व कोलकाता नाइट रायडर्स ( ९) यांना टॉप फोअरमध्ये येण्याची संधी निर्माण केली आहे.



# २०२७ वन डे वर्ल्ड कपच्या थेट पात्रतेसाठी चढाओढ

नवी दिल्ली,ता.११–

**आयसीसी वन डे क्रमवारीत भारतीय संघ अव्वल स्थानावर कायम असून २०२७ वन डे वर्ल्ड कपच्या थेट पात्रतेची शर्यत अधिक रंगतदार झाली आहे. दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे हे यजमान देश असल्यामुळे त्यांना स्पर्धेसाठी थेट प्रवेश मिळाला आहे.**

२०२७ ची वन डे वर्ल्ड कप स्पर्धा ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२७ मध्ये खेळवली जाईल. २००३ नंतर पहिल्यांदाच ही स्पर्धा आफ्रिका खंडात परतत आहे. यावेळी संघसंख्या १० वरून वाढवून १४ करण्यात आली आहे. आयसीसीच्या ३१ मार्च २०२७ च्या क्रमवारीतील अव्वल ८ संघ थेट पात्र होतील. उर्वरित ४ जागांसाठी पात्रता फेरीत सामने होतील. नामिबिया यजमान असूनही त्यांना पात्रता फेरीतून यावे लागेल. भारतीय संघाने दुसऱ्या स्थानावरील न्यूझीलंडवर (११३ गुण) केवळ पाच गुणांची आघाडी घेतली आहे, तर ऑस्ट्रेलियाने (१०९ गुण) तिसरे स्थान कायम राखले आहे. भारताची रेटिंग एका अंकाने किंचित घसरली असून, आता त्यांच्या नावावर ११८ गुण आहेत.

वार्षिक क्रमवारी अद्ययावत करताना, मे २०२५ पासून खेळल्या गेलेल्या सामन्यांचे १०० टक्के रेटींग दिले जाते, तर मागील दोन वर्षांच्या निकालांना ५० टक्के रेटींग दिले जाते. दक्षिण आफ्रिका संघाने १०२ गुण मिळवून पाकिस्तानला ( ९८) पाचव्या क्रमांकावर ढकलले आहे. अव्वल १० मधील उर्वरित संघांमध्ये काही बदल झालेला नाही. श्रीलंका (९६), अफगाणिस्तान (९३) आणि इंग्लंड (८९) हे अव्वल आठ संघ आहेत.

बांगलादेश ८४ गुणांसह नवव्या स्थानावर आहे, तर वेस्ट इंडिज आता ७४ गुणांवर आहे.दरम्यान, आयर्लंडने (५४) झिम्बाब्वेला (५३) मागे टाकत ११ वे स्थान पटकावले आहे, तर अमेरिकेने स्कॉटलंडला मागे टाकत १३ व्या स्थानावर झेप घेतली आहे. अमेरिकेने ४६ गुणांसह स्कॉटलंडच्या ४४ गुणांच्या तुलनेत चांगली कामगिरी केली आहे. संयुक्त अरब अमिरातीनेही १६ गुणांसह कॅनडाला मागे टाकत १९ वे स्थान मिळवले आहे.

**२०२७ च्या वन डे वर्ल्ड कप स्पर्धेसाठी ही क्रमवारी महत्त्वाची आहे. ३१ मार्च २०२७ रोजीच्या आयसीसी क्रमवारीतील अव्वल आठ संघ, तसेच वर्ल्ड कप स्पर्धेसाठी थेट पात्र ठरणार आहे. यजमान दक्षिण आफ्रिका आणि झिम्बाब्वे, यांनी थेट पात्रता मिळवली आहे. दक्षिण आफ्रिका अव्वल आठ स्थानांवर कायम राहिल्यास नवव्या स्थानावर असलेल्या संघाला वर्ल्ड कपचे तिकीट मिळेल. सध्या बांगलादेश नवव्या क्रमांकावर आहे आणि विंडीज १०व्या. त्यामुळे या दोन संघांमध्ये एका स्थानासाठी चढाओढ पाहायला मिळू शकते.**



गुजरात येथील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या सोमनाथ मंदिराच्या ९० मीटर उंच भव्य कळसाला, देशभरातील ११ तीर्थक्षेत्रांमधील पवित्र जलाने अभिषेक घालण्यात आला. हे भव्य मंदिर सनातन धर्म आणि संस्कृतीवरील अढळ श्रद्धेचे प्रतीक मानले जाते. दरम्यान,सोमनाथ मंदिराच्या ७५ वा वर्धापनदिनानिमित्त मंदिरावर विमानाद्वारे सुर्यकिरणांचे सादरीकरण झाले.तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंदिरातील शिवलिंगाचे मनोभावे दर्शन घेतले तसेच नंदीचेही दर्शन घेतले.


# हार्दिक पंड्या-मुंबई इंडियन्समध्ये बिनसले?

## संघाला अनफॉलो केल्याची चर्चा

मुंबई,ता.११ –

**मुंबई इंडियन्स आयपीएल २०२६ मधील प्लेऑफमधून बाहेर पडल्यानंतर हार्दिक पंड्याच्या संघातील भवितव्याबाबत नव्या चर्चांना उधाण आले आहे. सोशल मीडियावर चाहत्यांनी लक्षात आणून दिले की हार्दिकने इन्स्टाग्रामवरून मुंबई इंडियन्सला अनफॉलो केल्याचे दिसत आहे. या चर्चांनी जोर धरला असून संघातील वातावरण बिघडल्याच्या अफवांनाही हवा मिळाली.**

रायपूरमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून झालेल्या पराभवानंतर मुंबई इंडियन्स अधिकृतपणे प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडली. त्यानंतर काही काळासाठी हार्दिकच्या इन्स्टाग्राम प्रोफाइलवर तो फक्त १५० अकाउंट्सना फॉलो करत असल्याचे दिसत होते आणि त्यामध्ये मुंबई इंडियन्सचे नाव नसल्याचे चाहत्यांच्या निदर्शनास आले.मात्र काही मिनिटांतच चाहत्यांनी आणखी एक गोष्ट हेरली की, हार्दिकच्या फॉलोइंगची संख्या पुन्हा १५१ झाली होती आणि त्यामध्ये मुंबई इंडियन्सचे नाव पुन्हा दिसू लागले. पण सोशल मीडियावरील हा काही मिनिटांचा बदलही अफवांना खतपाणी घालण्यासाठी पुरेसा ठरला. काही क्षणांतच विविध चर्चा



आणि तर्कवितर्क लावण्यात आले.हार्दिक पंड्याच्या मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमनानंतर आणि आयपीएल २०२४ आधी त्याची कर्णधारपदी नियुक्ती झाल्यापासूनच चाहत्यांमध्ये मतभेद निर्माण झाले होते. हार्दिकशी संबंधित प्रत्येक वादग्रस्त घडामोड सोशल मीडियावर बारकाईने पाहिली जात आहे.तांत्रिकदृष्ट्या पाहिलं तर काही काळासाठी तरी हार्दिक पंड्याने मुंबई इंडियन्सला अनफॉलो केल्याचे दिसत होते. सोशल मीडियावर चाहत्यांच्या हे निदर्शनास येताच काही वेळात पुन्हा बदल झाला. मुंबई इंडियन्सचा पराभव झाल्यानंतर अनेक सोशल मीडिया युझर्सनी हार्दिकच्या फॉलोइंग लिस्टमधून मुंबई इंडियन्स गायब असल्याचे स्क्रीनशॉट शेअर केले होते. मात्र काही मिनिटांतच मुंबई इंडियन्सचे अकाउंट पुन्हा हार्दिकच्या फॉलो लिस्टमध्ये दिसू लागले. त्यामुळे हे चुकून झालेले अनफॉलो होते, तांत्रिक बिघाड होता की पराभवानंतरच्या निराशेतून घडलेली कृती होती, याबाबत सोशल मीडियावर वेगवेगळे तर्क लावले जाऊ लागले.

# आरसीबीच्या टीम डेव्हिडवर कारवाई

रायपूर,ता.११–

**आयपीएल २०२६ मध्ये आरसीबीचा स्फोटक फलंदाज टीम डेव्हिड याच्यावर अखेर बीसीसीआयने कारवाई केली. मुंबई इंडियन्सविरुद्ध रायपूर येथे झालेल्या सामन्यात कथित आक्षेपार्ह हावभाव केल्याप्रकरणी त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली.**



या विजयासह आरसीबीने या १४ गुणांसह गुणतालिकेत अव्वल क्रमांकावर झेप घेतली. पण, ११ सामन्यांतील आठव्या पराभवामुळे स्पर्धेबाहेर फेकला गेला आहे. प्ले ऑफच्या शर्यतीतून लखनौ सुपर जायंट्सनंतर मुंबई इंडियन्सही बाहेर पडले आहेत. या सामन्यात आरसीबीच्या डग आऊटमध्ये जल्लोष पाहायला मिळाला आणि त्याचवेळी टीम डेव्हिडने अश्लील हावभाव केले. त्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.टीम डेव्हिडला या कृतीची मोठी किंमत मोजावी लागली. बीसीसीआयने त्याच्यावर आयपीएल आचारसंहितेतील कलम २.६ अंतर्गत गुन्हा नोंदवत सामन्याच्या मानधनातील ३० टक्के रक्कम दंड म्हणून आकारली आहे. तसेच त्याच्या खात्यात दोन डिमेरिट गुणही जमा करण्यात आले आहेत.

# वेताळमाळ उपांत्य फेरीत

कोल्हापूर, ता.११ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिका आयोजित महापौर चषक फुटबॉल स्पर्धेत वेताळमाळ तालीम मंडळने सम्राटनगर स्पोर्ट्‌सवर ४-० असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मंगळवारी १२ रोजी शिवाजी तरुण मंडळ विरूध्द उत्तरेश्वर प्रासादिक वाघाची तालीम मंडळ हा सामना दुपारी चार वाजता होईल.**

या सामन्यात वेताळमाळ तालीम मंडळने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत एकतर्फी वर्चस्व राखले. पूर्वार्धात संदेश कासारने २४ व्या मिनिटाला तीन-चार खेळाडूंना चकवा देत गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. गोलची परतफेड करण्यासाठी सम्राट नगरच्या खेळाडूंचे प्रयत्न अयशस्वी ठरले. उत्तरार्धात वेताळमाळच्या खेळाडूंनी अधिक वेगवान खेळ करत सम्राटनगरच्या बचावफळीवर सतत दबाव ठेवला. शोएब बागवानने ४२ व्या मिनिटाला दुसरा गोल केला. त्यानंतर सर्वेश वाडकरने दिलेल्या अचूक पासवर आकाश माळीने ४७ व्या मिनिटाला गोल नोंदवला. अवघ्या तीन मिनिटांनी सर्वेश वाडकरने स्वतः गोल करत संघाची आघाडी ४-० अशी भक्कम केली.वेताळमाळकडून सर्वेश वाडकर, आकाश माळी, संदेश कासार, राहुल पाटील आणि योक्षिम अवुंगशी यांनी वेगवान चढाया करत प्रभावी खेळ केला. सम्राटनगरचा गोलरक्षक ओमकार माने याने वेताळमाळच्या काही चढाया परतावून लावल्या.सम्राटनगर स्पोर्ट्‌सकडून अभिषेक सिंग, निरंजन कामते, यासिन नदाफ, कार्तिक जाधव, असिल बागवान, आदित्य जाधव आणि मोहित घोरपडे यांनी प्रयत्न केले. त्यांना अखेरपर्यंत एकही गोल करता आला नाही. अखेर पूर्णवेळेत ४-० गोलची आघाडी राखत वेताळमाळने सामना जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

# डब्ल्यूएफआयच्या कारणे दाखवा नोटीसला प्रतिसाद देत विनेश फोगाट गोंडामध्ये दाखल

नवी दिल्ली, ता.११–

**भारतीय कुस्ती महासंघाच्या राष्ट्रीय खुल्या मानांकन स्पर्धेत सहभागी होण्यास नकार देऊनही, महिला कुस्तीपटू विनेश फोगाट गोंडा येथे दाखल झाली. विनेशचे पुनरागमन म्हणून पाहिली जाणारी ही स्पर्धा गोंडा येथे आयोजित केली जात आहे.**



काही दिवसांपूर्वी, डब्ल्यूएफआयने विनेशला कारणे दाखवा नोटीस बजावली होती, ज्यात म्हटले होते की नियमांनुसार ती २६ जून २०२६ पर्यंत कोणत्याही स्पर्धेत भाग घेण्यास अपात्र आहे. महासंघाने असा युक्तिवाद केला की, विनेशने पॅरिस ऑलिम्पिकनंतर निवृत्ती घेतली होती आणि आता ती निवृत्तीतून परत येत असल्याने, तिला आवश्यक नोटीस कालावधी पूर्ण करावा लागेल. महासंघाने असाही युक्तिवाद केला की तिच्यावरील शिस्तभंगाची कारवाई पूर्ण होईपर्यंत ती सहभागी होऊ शकत नाही.

अयोध्या येथे दाखल होताच, विनेशने डब्ल्यूएफआयच्या कारणे दाखवा नोटीसला प्रतिसाद दिला. जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेच्या (वाडा) नियम ५.६.१ चा हवाला देत, तिने असा युक्तिवाद केला की, निवृत्त खेळाडूंसंबंधीचे वाडाचे नियम तिला लागू होत नाहीत, कारण तिने जूनमध्येच युनायटेड वर्ल्ड रेसलिंगला तिच्या पुनरागमनाबद्दल कळवले होते. आपल्या प्रतिसादात, विनेशने सांगितले की, तिने जागतिक संस्थेला तिच्या पुनरागमनाबद्दल खूप आधीच कळवले होते आणि त्यामुळे, तिने तिच्या पुनरागमनासंबंधीच्या सर्व आवश्यक नियमांचे पालन केले होते.

# ऑस्ट्रेलियाचा पाक, बांगलादेश दौऱ्यांसाठी संघ जाहीर

मेलबर्न, ता.११–

**ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानविरुध्दच्या एकदिवसीय मालिकेसाठी आणि मे-जून २०२६ मध्ये होणाऱ्या बांगलादेश दौऱ्यासाठी मर्यादित षटकांच्या सामन्यांकरिता आपला संघ जाहीर केला आहे. मिचेल मार्श संघाचे कर्णधारपद भूषवणार आहे. या दौऱ्यासाठी अनेक नवीन क्रिकेटपटूंची निवड करण्यात आली आहे, तर अनुभवी वेगवान गोलंदाज पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड यांना सर्व संघांमधून वगळण्यात आले आहे.**

वेगवान गोलंदाज बिली स्टॅनलेक आणि रायली मेरेडिथ यांचे एकदिवसीय संघात पुनरागमन झाले आहे. युवा खेळाडू ऑलिव्हर पीक, लियाम स्कॉट आणि जोएल डेव्हिस यांचा ऑस्ट्रेलियन संघात प्रथमच समावेश करण्यात आला आहे. पीकची निवड केवळ पाकिस्तानविरुध्दच्या एकदिवसीय मालिकेसाठी झाली आहे, तर स्कॉटचा बांगलादेश दौऱ्यासाठीच्या एकदिवसीय संघातही समावेश करण्यात आला आहे. डेव्हिसचा बांगलादेश दौऱ्यासाठीच्या टी-२० संघात समावेश करण्यात आला आहे.

२०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये खेळणारे ट्रॅव्हिस हेड, कूपर कॉनोली, बेन ड्वार्शियस आणि झेवियर बार्टलेट हे पाकिस्तान मालिकेनंतर बांगलादेश दौऱ्यासाठी संघात सामील होतील. हे खेळाडू अनुक्रमे ऑलिव्हर पीक, बिली स्टॅनलेक, रायली मेरेडिथ आणि मॅट शॉर्ट यांची जागा घेतील.



विशेष म्हणजे, एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त झालेल्या ग्लेन मॅक्सवेलचाही टी-२० संघात समावेश करण्यात आलेला नाही. निवड समितीचे अध्यक्ष, जॉर्ज बेली म्हणाले, नवीन क्रिकेटपटूंना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये संधी मिळताना पाहणे नेहमीच उत्साहवर्धक असते. अनुभवी आणि युवा क्रिकेटपटूंचे हे मिश्रण या दौऱ्यांवर संघाला संतुलन प्रदान करेल.

**पाकिस्तानविरुध्द ऑस्ट्रेलियाचा एकदिवसीय संघ**

मिचेल मार्श (कर्णधार), ॲलेक्स कॅरी, नॅथन एलिस, कॅमेरॉन ग्रीन, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुनेमन, मार्नस लॅबुशेन, रायली मेरेडिथ, ऑलिव्हर पीक, मॅथ्यू रेनशॉ, तनवीर संघा, लियाम स्कॉट, मॅट शॉर्ट, बिली स्टॅनलेक आणि ॲडम झाम्पा.

**बांग्लादेशविरुध्द ऑस्ट्रेलियाचा एकदिवसीय संघ**

मिचेल मार्श (कर्णधार), झेवियर बार्टलेट, ॲलेक्स कॅरी, कूपर कॉनोली, बेन ड्वार्शियस, नॅथन एलिस, कॅमेरॉन ग्रीन, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुनेमन, मार्नस लॅबुशेन, मॅथ्यू रेनशॉ, तनवीर संघा, लियाम स्कॉट आणि ॲडम झाम्पा.

**बांगलादेशविरुध्द ऑस्ट्रेलियाचा टी २० संघ**

मिचेल मार्श (कर्णधार), झेवियर बार्टलेट, कूपर कॉनोली, टिम डेव्हिड, जोएल डेव्हिस, नॅथन एलिस, कॅमेरॉन ग्रीन, ॲरॉन हार्डी, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, स्पेन्सर जॉन्सन, मॅथ्यू कुहनेमन, रायली मेरेडिथ, जोश फिलिप, मॅथ्यू रेनशॉ आणि ॲडम झाम्पा.